# मराठवाडा

५ सकाळ नांदेड, मंगळवार, ५ जून २०१८



औरंगाबाद : जल्लोष साजरा करताना नूतन अध्यक्ष प्रकाश सोळुंके, उपाध्यक्ष आमदार अमरसिंह पंडित, शेख सलीम, आमदार सतीश चव्हाण, अभिजित आवरगावकर, अविनाश येळीकर, प्रभाकर पालोदकर, अनिल नखाते, त्रिंबकराव पाथ्रीकर आदी.

# 'मशिप्र'च्या अध्यक्षपदी पुन्हा सोळुंके

## उपाध्यक्षपदी अमरसिंह पंडित, तर सरचिटणीसपदी सतीश चव्हाण

**सकाळ वृत्तसेवा**

औरंगाबाद, ता. ४ : मराठवाडा शिक्षणप्रसारक मंडळाच्या (मशिप्र) केंद्रीय कार्यकारिणीच्या निवडणुकीत अध्यक्षपदी माजी मंत्री प्रकाश सोळुंके, उपाध्यक्षपदी विधान परिषद सदस्य अमरसिंह पंडित यांची, तर सरचिटणीसपदी आमदार सतीश चव्हाण यांची निवड झाली. यानिमित्ताने पुन्हा एकदा श्री. सोळुंके, चव्हाण यांनी आपले वर्चस्व सिद्ध करीत विरोधी गटाला मोठ्या फरकाने पराभूत केले. नवीन सदस्यांच्या नेमणुकीवरून विरोधकांनी ऐनवेळी रंगत आणण्याचा केलेला प्रयत्नदेखील अपयशी ठरला.

देवगिरी महाविद्यालयात सोमवारी (ता. चार) सकाळी दहा वाजता निवड प्रक्रिया पार पडली. शैक्षणिक व राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या निवडणुकीकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते. गेल्या अनेक वर्षांपासून मराठवाडा शिक्षणप्रसारक मंडळावर माजी सरचिटणीस मधुकरराव मुळे यांची सत्ता होती; पण १० जुलै २०१३ मध्ये झालेल्या निवडणुकीत त्यांचा पराभव करून आमदार चव्हाण, सोळुंके, पंडित यांनी वर्चस्व प्रस्थापित केले होते. ते सोमवारी झालेल्या निवडणुकीत



प्रकाश सोळुंके



अमरसिंह पंडीत



सतीश चव्हाण

पुन्हा सिद्ध झाले. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत सोळुंके यांना २७७, तर त्यांचे विरोधक पानसंबळ यांना केवळ ५२ मते मिळाली. उपाध्यक्षपदी पंडित (२७९) व शेख सलीम शेख अहेमद (२७७) यांची निवड झाली. सरचिटणीसपदी २८० मते घेऊन चव्हाण, सहचिटणीसपदी प्रभाकर पालोदकर व अनिल नखाते २७९, तर कोषाध्यक्षपदाचे उमेदवार अविनाश येळीकर २७९ मते घेऊन विजयी झाले.

चव्हाण गटाने संस्थेच्या सदस्यांमध्ये तब्बल १८२ नवीन सदस्यांचा समावेश केला. यामुळे सर्वसाधारण सदस्यांची संख्या ३४३ पर्यंत पोचली. निवडणूक जाहीर झाल्यानंतर नवीन सदस्यांना मतदानाचा अधिकार देण्यात येऊ नये, यासाठी विरोधी गटाने धर्मादाय आयुक्तांकडे याचिका दाखल केली; मात्र त्यांना दिलासा मिळाला नाही. त्यामुळे निवडणुकीत जुन्या-नवीन सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला.

**अन्य कार्यकारिणी अशी**

कोषाध्यक्ष डॉ. अविनाश येळीकर, कार्यकारिणी सदस्यपदी मोहन सावंत, लक्ष्मणराव मनाळ, हेमंत जामकर, अभिजित आवरगावकर, भारत साळुंके, विजय सोळंके, दत्तात्रय पाटील, भीमराव जाधव, आप्पासाहेब पाटील, डॉ. प्रकाश भांडवलदार, विश्वास पाटील, त्र्यंबकराव पाथ्रीकर, विवेक भोसले, कल्याण तुपे आदींचा यात समावेश आहे.

**विरोधकांनी नव्या सदस्यांच्या नेमणुकीवरून रंगत आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, मागील पाच वर्षांत मंडळात केलेले नावीन्यपूर्ण बदल, शैक्षणिक प्रगती, विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेल्या उच्च प्रतीच्या सुविधा यांमुळे जुन्यासह नवीन सदस्यांनी आमच्यावर विश्वास दाखवला. हा विश्वास आम्ही सार्थ ठरवू.**

**- आमदार सतीश चव्हाण, सरचिटणीस, म.शि.प्र.मंडळ.**

# संमिश्र

१ सकाळ नांदेड, शुक्रवार, २९ जून २०१८


## मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद

### पाहिजेत (विनाअनुदान - Non Grant)

(मा.शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे पद भरती परवानगी
आदेश क्र. शिउसंऔ/उमावि-1/एके/2017-18/8351/67, दि. 18 जून 2018
खालील तक्त्यातील विनाअनुदानित पदांकरिता प्रस्तुत जाहिरातीत नमुद केलेल्या अटींची पूर्तता
करणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.
जाहिरात जा.क्र. म.शि.प्र.मं./2018-19/692, दि. 28/06/2018
विनाअनुदानित तत्वावरील शिक्षकांची रिक्त पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदनाम | पूर्णवेळ रिक्त पदे |
|---|---|---|
| 1 | कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक / उच्च माध्यमिक विद्यालय शिक्षक | 58 |

प्रस्तुत जाहिरातीमध्ये पदभरतीबाबतचा संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची
पध्दत, आवश्यक अर्हता आरक्षण इत्यादी बाबतच्या सविस्तर तपशीलासाठी मंडळाच्या
www.mspmandal.in व www.mspmandal.co.in या संकेतस्थळावरील
Advertisement व Apply Online लिंकवर सविस्तर जाहिरात तथा Online
अर्ज करण्याची सुविधा दि. 16/07/2018 रोजी 23.59 वाजेपर्यंत उपलब्ध करून
देण्यात आलेली आहे. मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व
जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

टिप : जाहिरातीत नमुद केलेली पदसंख्या व आरक्षण कमी अधिक होऊ शकते.

अध्यक्ष / सरचिटणीस
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद

ठिकाण : औरंगाबाद
दिनांक : 28/06/2018.

लोकमत औरंगाबाद, बुधवार, दि.२० जून २०१८ २

आहे. ... हात आहे.

म.शि.प्र. मंडळाचे

## श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

## पाहिजेत थेट मुलाखत (Walk In Interview)

**संदर्भ :-** मा. विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड यांचे नाहरकत प्रमाणपत्र
१) जा.क्र. विशिसंस/ उशि/नांवि./अनु.-२/सीएचबी/२०१८-१९ २०८६ दि. १४/०६/२०१८
२) जा.क्र. विशिसंस/ उशि/नांवि/अनु-२/सीएचबी/२०१८-१९ २१३७ दि. १८/०६/२०१८

शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ करीता खालील विषयांसाठी तात्पुरत्या स्वरुपात घड्याळी तासिकेप्रमाणे अधिव्याख्यातांची खालील पदे भरणे आहेत.

**(अ) वरिष्ठ विभाग: अनुदानित : पदवी** उर्दू (२), इंग्रजी (१), शारीरिक शिक्षण (३), संगीत (४), संगणकशास्त्र (३), भौतिकशास्त्र (२), रसायनशास्त्र (४), वनस्पतीशास्त्र (३), वाणिज्य (१) लोकप्रशासन (२), समाजशास्त्र (३)

**विनाअनुदानित: (पदवी)** बी.बी.ए. (४), बी.सी.ए. (२), बी.एस्सी. सी.एस (२), भुगोल (२)

**कायम विनाअनुदानित: पदव्युत्तर** इंग्रजी (३), राज्यशास्त्र (२), समाजशास्त्र (२), इतिहास (२), वाणिज्य (२) भौतिकशास्त्र (२), वनस्पतीशास्त्र (२), प्राणीशास्त्र (२), रसायनशास्त्र (२), सुक्ष्मजीवशास्त्र (२) संगणकशास्त्र (२)

**शैक्षणिक अर्हता:** चांगली शैक्षणिक कारकीर्द (Good Academic Record) व पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५ टक्के मागासवर्गीयांसाठी ५० टक्के गुण आणि नेट/सेट/पीएचडी आरक्षण शासकीय नियमाप्रमाणे राहील.

**(ब) कनिष्ठ विभाग व एच.एस.सी. व्होकेशनल (एम.सी.व्ही.सी.)**

**१) कनिष्ठ :** इलेक्ट्रॉनिक्स (२), संगणकशास्त्र (२), पीकशास्त्र (२), पाली (१),

**२. एमसीव्हीसी:** अकाऊंटिंग ॲण्ड ऑडीटिंग (अकौंटींग फायनानशियल ऑडीट मॅनेजमेंट) शिक्षक (१) व निदेशक (१) हॉर्टिकल्चर शिक्षक (१), बेकरी ॲन्ड कन्फेक्शनरी (फुड टेक्नॉलॉजी) शिक्षक ०१

**शैक्षणिक अर्हता:** शैक्षणिक अर्हता व आरक्षण शासकीय नियमाप्रमाणे राहील

**(क) शिक्षकेतर :**

**१) महिला वार्डन :** पदसंख्या (१) (महाविद्यालयातील विद्यार्थिनी वसतीगृहासाठी तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधन तत्वावर )

**अर्हता :** पदवीधर व शिस्तप्रिय महिलेस प्राधान्य

**२) तबला वादक:** पदसंख्या (१) (संगीत विभागासाठी तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधन तत्वावर)

**अर्हता :** बी.ए. संगीत विशारद

**(D) UGC CPE Scheme** - Required trained coaches for Athletics, Yoga Badmintion, Taekwondo, Weight lifting/ Power lifting under UGC CPE Scheme

**Qulification:** IUT /National/Intrnational Sports Players/ NIS Coach

**मुलाखत : वरिष्ठ विभाग (अ) दिनांक २८/०६/२०१८ (गुरुवार) सकाळी १०.०० वा.**
**दिनांक : उर्वरित पदांसाठी (ब,क्र व ड ) दि. २९/०६/२०८ (शुक्रवार ) सकाळी १०.०० वा.**

| | | | |
|---|---|---|---|
| मा. श्री प्रकाशराव सोळंके | मा.आ.श्री सतीशराव चव्हाण | मा.श्री. हेमंतराव जामकर | डॉ. बी.यु. जाधव |
| अध्यक्ष | सरचिटणीस | प्रमुख स्था. सं.स. | प्राचार्य |
| म.शि.प्र. मंडळ, औरंगाबाद | | | श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी |

शुक्रवार, दि. १३ जुलै २०१८
देशोन्नती
२

# शिवाजी महाविद्यालयात भित्तीपत्रकाचे विमोचन

**परभणी :** येथील शिवाजी महाविद्यालयात समाजशास्त्र विभागाच्या वतीने जागतीक लोकसंख्या दिनानिमित्त तयार करण्यात आलेल्या 'लोकसंख्यावाढ कारणे व उपाय' या भित्तीपत्रकाचे विमोचन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्या डॉ. विजया नांदापुरकर यांच्याहस्ते करण्यात आले.

यावेळी समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ.तुकाराम फिसफिसे, प्रा.व्ही. एल. सुर्यवंशी, प्रा.सारिका शेट्टे, प्रा.अहिल्या अंजनडोहकर, प्रा.स्वाती देशमुख, प्रा.अर्चना बेग यांच्यासह विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. या भित्तीपत्रकाचे संपादन आश्वीनी चापके, मनिषा दुधाटे या बी.ए.द्वितीय वर्षाच्या विद्यार्थीनींनी केले. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थीनींनी लोकसंख्यावाढी सारख्या गंभीर समस्येवर भित्तीपत्रक तयार केल्याबद्दल कौतुक केले. भित्तीपत्रक तयार करण्यासाठी विभाग प्रमुख डॉ. तुकाराम फिसफिसे यांचे मार्गदर्शन लाभले.



**परभणी :** शिवाजी महाविद्यालयात जागतीक लोकसंख्या दिनानिमित्त काढण्यात आलेल्या भित्तीपत्रकाचे विमोचन प्राचार्य डॉ.बी.यु. जाधव यांच्याहस्ते करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्या डॉ. विजया नांदापुरकर, प्रा.डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा. अहिल्या अंजनडोहकर, प्रा. सारीका शेटे व इतर.

सकाळ

नांदेड, शुक्रवार
१३ जुलै २०१८
४

TODAY परभणी



परभणी : येथील श्री शिवाजी महाविद्यालयात समाजशास्त्र विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले.

## 'शिवाजी'त भित्तीपत्रकाचे विमोचन

परभणी, ता. १२ : येथील श्री शिवाजी महाविद्यालयात समाजशास्त्र विभागाच्या वतीने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त तयार करण्यात आलेल्या 'लोकसंख्यावाढ कारणे व उपाय' या भित्तीपत्रकाचे विमोचन मंगळवारी (ता.११) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्या डॉ. विजया नांदापुरकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा.व्ही. एल. सूर्यवंशी, प्रा. सारीका शेट्टे, प्रा.अहिल्या अंजनडोहकर, प्रा.स्वाती देशमुख, प्रा.अर्चना बंग यांच्यासह विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. या भित्तीपत्रकाचे संपादन आश्विनी चापके, मनीषा दुधाटे या बी. ए. व्दितीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी केले. त्यांना डॉ.तुकाराम फिसफिसे यांचे मार्गदर्शन लाभले.

परभणी देशोन्नती

शनिवार, दि. ४ ऑगस्ट २०१८

M.S.P. Mandal's

# Shri Shivaji College, Parbhani

(Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)
NAAC Accreditation : A+ Grade (Third Cycle)
UGC : College With Potential for Excellence
Phone : 02452 - 226085, 221649

## REGISTRATION

open for UGC Sponsored

## BACHELOR OF VOCATIONAL (B.Voc) COURSES IN

1. **Retail Operation** - 50 seats, XII Science, Arts, Commerce, HSCVC (HSC Vocational) Passed
2. **Food Technology** - 50 seats, XII Science, HSCVC (HSC Vocational) Passed

**About the Course (s) :**

1. Full Time graduate degree of Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.
2. Approved by UGC, New Delhi
3. Run under the guidelines of National Skill Quality Framework (NSQF)
4. Skill Oriented Courses.
5. Service opportunities in Industry, Private and Government sector.
6. Fees as per guidelines of UGC.

**Note :** Students can register themselves along with a registration fees of Rs. 100/- or can contact Shri Shivaji College, Parbhani during office hrs. ie. 10am to 5pm at the earliest. All scholarships are applicable as governments rule.

For more Information contact Dr. S.N. KESHATTI, Nodal Officer on Mo. No. 9422743448

| **Dr. B.U. Jadhav** | **Shri Hemantrao Jamkar** | **Shri Satishrao Chavan** | **Shri Prakashdada Solanke** |
| --- | --- | --- | --- |
| Principal, Shri Shivaji College, Parbhani. | Head, LMC, Shri Shivaji College, Parbhani | Secretary, M.S.P. Mandal, Aurangabad | President, M.S.P. Mandal, Aurangabad |

सकाळ

नांदेड, सोमवार
३० जुलै २०१८

४

TODAY

# परभणी

## शिवाजी महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम

परभणी, ता. २९ : विद्यापीठ अनुदान आयोगाने श्री शिवाजी महाविद्यालयात फूड टेक्नॉलॉजी, रिटेल ऑपरेशन्स या दोन अभ्यासक्रमांना मंजुरी दिली आहे. बॅचलर ऑफ व्होकेशनल सायन्स अंतर्गत हे अभ्यासक्रम चालू शैक्षणिक वर्षात सुरू करण्यात येणार आहेत, अशी माहिती प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी दिली. अन्न तंत्रज्ञान अभ्यासक्रमासाठी बारावी विज्ञान; तर रिटेल ऑपरेशनसाठी कला, विज्ञान, वाणिज्य शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थांना प्रवेश घेता येतील. अन्न तंत्रज्ञान अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून विद्यार्थांना बिस्किट मेकिंग कोल्ड स्टोरेज, रिफाईंड टेंबर, ज्युसर कॅबिनेट ड्रॉप, दाल मिल, ऑईल मिल, हार्वेस्टिंग, टेक्नालॉजी आदीं युनिटमध्ये नोकरीच्या संधी मिळणार आहेत. रिटेल ऑपरेशन अभ्यासक्रमानंतर मेडिकल, मॉल्समध्ये सेल्समन, मॅनेजर आदी ठिकाणी संधी उपलब्ध होणार आहेत, असे प्राचार्य डॉ. जाधव यांनी सांगितले.

देशोन्नती
नांदेड / शनिवार, दि. २८ जुलै २०१८

# श्री शिवाजी महाविद्यालयात फुड टेक्नॉलॉजी, रिटेल ऑपरेशन्स अभ्यासक्रम

**शहर प्रतिनिधी / २७ जुलै**

**परभणी :** विद्यापीठ अनुदान आयोगाने श्री शिवाजी महाविद्यालयास फुड टेक्नॉलॉजी व रिटेल ऑपरेशन्स या दोन अभ्यासक्रमांना मंजुरी दिली आहे. बॅचलर ऑफ व्होकेशनल सायन्स अंतर्गत हे अभ्यासक्रम चालु शैक्षणीक वर्षात सुरु करण्यात येणार असल्याची माहिती महाविद्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने नॅशनल स्किल कॉलिफीकेशन फ्रेम या योजनेअंतर्गत भारतातील युवकांना कौशल्यपूर्ण शिक्षणाच्या माध्यमातुन नौकऱ्या मिळवुन देण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. त्यासाठी देशातील गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या अ प्लस दर्जा असणाऱ्या महाविद्यालयांना प्रोशनल सायन्सचे अभ्यासक्रम देण्याचा निर्णय घेतला. यामध्ये परभणीच्या श्री शिवाजी महाविद्यालयास अन्नतंत्रज्ञान, रिटेल ऑपरेशन या दोन अभ्यासक्रमासाठी मंजुरी देण्यात आल्याची माहिती प्राचार्य बाळासाहेब जाधव यांनी दिली.

अन्नतंत्रज्ञान अभ्यासक्रमासाठी बारावी विज्ञान तर रिटेल ऑपरेशन्ससाठी कला, विज्ञान, वाणिज्य शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येतील. दोन्ही अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी ५० प्रवेशाची मर्यादा आहे. अन्नतंत्रज्ञान या तीन वर्षीय अभ्यासक्रमात बिस्कीट मेकींग, कोल्डस्टोरेज, रिफाईन टेंबर, ज्युस कॅबीनेट ड्राप,, दालमिल, ऑईलमील आदी युनिटमध्ये नौकऱ्यांची संधी मिळणार आहे. तर रिटेल ऑपरेशननंतर मेडिकल, मॉल्स, सेल्समन आदी ठिकाणी नौकऱ्या मिळु शकतात. या अभ्यासक्रमातंर्गत प्रात्यक्षीकांसाठीची सर्व यंत्रणा विद्यापीठ अनुदान आयोग पुरविणार असून गुणवत्तापूर्ण शिक्षण, प्रशिक्षण देण्यासाठी महाविद्यालय कटीबध्द असल्याचे प्राचार्य डॉ. जाधव यांनी सांगितले.

दि. २ ऑगस्ट २०१८

गोदातीर समाचार

# शिवाजी महाविद्यालयात फुड टेक्नॉलॉजी, रिटेल ऑपरेशन्स अभ्यासक्रमांना मंजूरी

परभणी/प्रतिनिधी

विद्यापीठ अनुदान आयोगाने श्री.शिवाजी महाविद्यालयात फुड टेक्नॉलॉजी, रिटेल ऑपरेशन्स अभ्यासक्रमांना मंजूरी दिली आहे. बॅचलर ऑफ व्होकेशनल सायन्स अंतर्गत हे अभ्यासक्रम चालू शैक्षणिक वर्षात सुरू करण्यात येणार आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाने नॅशनल स्कील क्वॉलीफिकेशन फ्रेम (एन.एस.क्यू.एफ.) या योजनेंतर्गत भारतातील युवकांना कौशल्यपूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून नोकऱ्या मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या नॅकचा अ प्लस दर्जा मिळविलेल्या महाविद्यालयांना व्होकेशनल सायन्सचे अभ्यासक्रम देण्याचा निर्णय घेतला. यामध्ये परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाला अन्न तंत्रज्ञान, रिटेल ऑपरेशन्स या अभ्यासक्रमांना मंजूरी देण्यात आली असल्याची माहिती प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी दिली आहे.

अन्न तंत्रज्ञान अभ्याक्रमासाठी बारावी विज्ञान तर रिटेल ऑपरेशन्ससाठी कला, विज्ञान, वाणिज्य शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल. दोन्ही अभ्यासक्रमासाठी ५० प्रवेश मर्यादा आहे. अन्न तंत्रज्ञान अभ्यासक्रम तीन वर्षाचा असून विद्यार्थ्यांना बिस्कीट मेकींग कोल्ड स्टोरेज, रिफाईंड टेंबर, ज्युसर कॅबीनेट ड्रॉप, दाल मील, ऑईल मील, हार्वेस्टींग टेक्नॉलॉजी आदीमध्ये नोकरीची संधी मिळणार आहे. रिटेल ऑपरेशन अभ्यासक्रमानंतर मेडिकल, मॉल्समध्ये सेल्समन, मॅनेजर आदी संधी उपलब्ध होणार आहेत.

विविध कंपन्यांनी हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची भरती करावी असा नियमही शासनाने केला आहे. दोन्ही अभ्यासक्रम तीन वर्ष पदवीचे आहेत. प्रात्यक्षिकासाठी सर्व यंत्रणा विद्यापीठ अनुदान आयोग पुरविणार असल्याचे प्राचार्य जाधव यांनी सांगितले आहे.

पुण्य नगरी
गुरूवार, २ ऑगस्ट २०१८ | परभणी- हिंगोली

# प्रा.टेकाळे यांचा सत्कार



परभणी -येथील श्री शिवाजी महाविद्यालयाचे ग्रंथपाल तथा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ ग्रंथालय माहितीशात्र अभ्यास केंद्राचे केंद्र संयोजक प्रा.रामदास टेकाळे यांना स्वा.रा.ती.मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांनी नुकतीच ग्रंथालय व माहितीशात्र विषयात पीएच.डी.पदवी बहाल केली आहे. त्याबद्दल त्यांचा माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी कालीदास देवकते, संदीप चव्हाण, विष्णू बोंबले, संदीप काळे, संजय गारकर, शैलेस चव्हाण, व्ही.के.पाटील, विकास बाहेकर, के.पी.धनवे, एम.एस.देशमुख, बी. आर.पोखरकर, के.टी.ढाकरे, के.आर. होनराव, बी.पी.बारहाते, डी.एल.सपाटे, एम.आर.गारकर, के.व्ही. मगर यांची उपस्थिती होती.

सकाळ
नांदेड, शुक्रवार
३ ऑगस्ट २०१८
२
TODAY परभणी

## प्रा.रामदास टेकाळे यांचा सत्कार

परभणी ता. २ : येथील श्री शिवाजी महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.रामदास टेकाळे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांनी नुकतीच ग्रंथालय व महितीशात्र विषयात पीएच. डी पदवी बहाल केली आहे. त्याबद्दल त्यांचा माजी विद्यार्थी यांच्याकडून सत्कार करण्यात आला.

या वेळी कालिदास देवकते, संदिप चव्हाण, विष्णू बोंबले, संदिप काळे, संजय गारकर, शेलेस चव्हाण यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी ग्रंथालयातील कर्मचारी व्ही. के. पाटील, विकास बाहेकर, के. पी. धनवे, एम. एस. देशमुख, बि. आर. पोखरकर, के. टी. ढाकरे, के. आर. होनराव, बि. पी. बारहाते, डी. एल. सपाटे, एम. आर. गारकर, के. व्ही. मगर यांची उपस्थिती होती.

सकाळ

नांदेड, बुधवार
१ ऑगस्ट २०१८

४

TODAY परभणी

## प्रा. रामदास टेकाळे यांना पीएच. डी

परभणी, ता. ३१ : श्री शिवाजी महाविद्यालयातील ग्रंथपाल प्रा. रामदास टेकाळे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठाने पीएच. डी पदवी प्रदान केली. प्रा. टेकाळे यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात युज ऑफ इलेक्ट्रानिक रिसोर्स बाय रिसचर्स अँन्ड फॅकल्टीज ऑफ अग्रीकल्चर युनिव्हसिटीज इन महाराष्ट्रा या विषयावर विद्यापीठाकडे आपला शोध प्रबंध सादर केला. यासाठी त्यांना सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. दया दळवे यांनी मार्गदर्शन केले.

दि. ३० जुलै २०१८

गोदातीर समाचार

## प्रा. रामदास टेकाळे यांना पीएच.डी.



**परभणी**-श्री शिवाजी महाविद्यालयातील ग्रंथपाल प्रा. रामदास भगवानराव टेकाळे यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी. प्रदान केली आहे. प्रा. टेकाळे यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात 'युज ऑफ इलेक्ट्रॉनिक रिसोर्सेस बाय रिसर्चर्स अँन्ड फॅकल्टीज ऑफ अग्रीकल्चर युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्र' या विषयावर विद्यापीठाकडे शोध प्रबंध सादर केला होता. यासाठी त्यांनी सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. दया दळवे (औरंगाबाद) यांनी मार्गदर्शन केले. प्रा. टेकाळे यांचे श्री शिवाजी महाविद्यालयाचे अध्यक्ष हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

देशोन्नती

शनिवार, दि.२८ जुलै २०१८
epaper.·deshonnati.com

## थोडक्यात

# रामदास टेकाळे यांना पीएचडी



**परभणी :** येथील श्री.शिवाजी महाविद्यालयातील ग्रंथपाल प्रा.रामदास भगवानराव टेकाळे यांना स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएचडी प्रदान केली आहे. प्रा.टेकाळे यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात युज ऑफ इलेक्ट्रॉनिक रिसोर्सेस बाय रिसर्च ॲन्ड फॅकल्टीज ऑफ अग्रीकल्चर युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्रा या विषयावर आपला शोध प्रबंध सादर केला होता. त्यांना डॉ.दया दळवे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा.टेकाळे यांचे महाविद्यालयाचे अध्यक्ष हेमंतराव जामकर, प्राचार्य बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर आदींनी अभिनंदन केले आहे.

लोकमत औरंगाबाद, शनिवार, दि.२८ जुलै २०१८

## हॅलो परभणी

### महत्त्वाचे

# टेकाळे यांना पीएच.डी.

परभणी- येथील श्री शिवाजी



महाविद्यालयातील ग्रंथपाल प्रा. रामदास भगवानराव टेकाळे यांना नुकतीच नांदेड [illegible]थील स्वारातीम विद्यापीठाने पीएच.डी. प्रदान केली आहे. टेकाळे यांनी प्रा.डॉ. दया दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली 'युज ऑफ इलेक्ट्रॉनिक रिसोर्सेस बाय रिसर्च अँन्ड फॅकल्टीज ऑफ अॅग्रीकल्चर युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्रा' या विषयावर शोधप्रबंध सादर केला होता.

पुण्य नगरी ■ शनिवार, २८ जुलै २०१८ ■ परभणी

# टेकाळे यांना पीएच.डी. प्रदान

परभणी-येथील शिवाजी महाविद्यालयातील ग्रंथपाल रामदास भगवानराव टेकाळे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडने नुकतीच पीएच. डी. प्रदान केली आहे. त्यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात 'युज ऑफ इलेक्ट्रॉनिक रिसोर्सेस बाय रिसर्च अॅन्ड फॅक्ल्टीज ऑफ अॅग्रीकल्चर युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्र' या विषयावर शोध प्रबंध सादर केला. त्यांनी सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. दया दळवे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रबंध सादर केला. त्यांच्या या यशाबद्दल सर्वस्तरातून स्वागत होत आहे.

परभणी

पुढारी शनिवार, २८ जुलै २०१८

## रामदास टेकाळे यांना पीएच.डी.प्रदान

**परभणी :** येथील श्री शिवाजी



महाविद्यालयातील ग्रंथपाल प्रा.रामदास भगवानराव टेकाळे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयात पीएच. डी. पदवी प्रदान केली आहे. यूज ऑफ इलेक्ट्रॉनिक रिसोर्सेस बाय रिसर्चर्स अॅन्ड फॅकल्टीज ऑफ अॅग्रीकल्चर युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्रा या विषयावर विद्यापीठास शोध प्रबंध सादर केला होता. औरंगाबादच्या सरस्वती भवन महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. दया दळवे यांनी त्यांना मार्गदर्शन केले. संस्थाध्यक्ष हेमंत जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

परभणी TODAY सकाळ

शुक्रवार

१७ ऑगस्ट २०१८

कमाल 23.3°/21.

SHRI SHIVAJI COLLEGE LIBRARY PARBHANI

म.शि.प्र. मंडळाचे

## श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

### पाहिजेत थेट मुलाखत (Walk in Interview)

संदर्भ : मा. विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड यांचे नाहरकत प्रमाणपत्र जा.क्र. विशिसंस/ उशि/ नांवि/ अनु-२/ २०१७-१८/ ३०११ दि. १४-०८-२०१८

शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ करिता खालील विषयांसाठी तात्पुरत्या स्वरूपात घड्याळी तासिकेप्रमाणे अधिव्याख्यातांची खालील पदे भरणे आहेत...

वरिष्ठ विभाग : पदवी (अनुदानित) वनस्पतीशास्त्र (३), वाणिज्य (३)

शैक्षणिक अर्हता : चांगली शैक्षणिक कारकीर्द (Good Academic Record) व पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५ टक्के (मागासवर्गीयांसाठी ५० टक्के गुण) आणि नेट/ सेट/ पीएच.डी. आरक्षण शासकीय नियमाप्रमाणे राहील.

मुलाखत दि. : २३-०८-२०१८ (गुरुवार) सकाळी १०.०० वा.

| मा.श्री. प्रकाशराव सोळंके | मा.आ. श्री. सतीशराव चव्हाण | मा. श्री हेमंतराव जामकर | डॉ. बी.यु. जाधव |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | सरचिटणीस | प्रमुख, स्था.सं.स. | प्राचार्य |
| म.शि.प्र. मंडळ, औरंगाबाद | | श्री. शिवाजी महाविद्यालय, परभणी | |

पुण्य नगरी

रविवार, ५ ऑगस्ट २०१८ | परभणी- हिंगोली

# प्रा.हानवते नेट उत्तीर्ण

जिंतूर - प्राध्यापक पदासाठी घेण्यात आलेल्या नेट परीक्षेत येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागातील प्रा.प्रकाश उत्तमराव हानवते यांनी इंग्रजी विषयात यश संपादन केले आहे. यापूर्वी ते सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. त्यांच्या यशाबद्दल स्वागत होत आहे.

देशोन्नती रविवार, दि. ५ ऑगस्ट २०१८



परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. रामदास टेकाळे यांना स्वा.रा.ती.म. विद्यापीठाने माहिती शास्त्र विषयात पीएचडी पदवी बहाल केल्याबद्दल त्यांचा सत्कार करतांना कालिदास देवकते, संदिप चव्हाण, विष्णु बोंबले, संदिप काळे व इतर.



रोहिणी बोर्डे या विद्यार्थीनीने बिकट परिस्थितीवर मात करत दहावी परीक्षेत ९७.२० टक्के गुण प्राप्त केले. याबद्दल सोमवारी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांनी तिचा सत्कार केला. यावेळी रोहिणीची आई निर्मला बोर्डे, भाऊ सागर बोर्डे यांची उपस्थिती होती. आर्थिक परिस्थितीअभावी पुढील शिक्षण घेण्यास रोहिणीला अडचण येत असल्याचे कळाल्याने आमदार चव्हाण यांनी तिला देवगिरी महाविद्यालयात मोफत शिक्षण, सर्व शैक्षणिक सुविधा विनाशुल्क देण्याचे जाहीर केले.

लोकमत औरंगाबाद, सोमवार, दि.२७ ऑगस्ट २०१८ ४

**माजी विद्यार्थ्यांचा उपक्रम: दोन ठिकाणी पार पडला कार्यक्रम**

# वृक्षारोपणासह केरळ पुरग्रस्तांना मदत

लोकमत न्यूज नेटवर्क



परभणी शहरातील जिजाऊ ज्ञानतीर्थ शाळेत वृक्षारोपण करताना माजी विद्यार्थी.

**परभणी:** येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या १९९६ च्या माजी विद्यार्थ्यांनी २५ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करुन केरळ येथील पुरग्रस्तांना ५ हजार रुपयांची मदत देऊ केली आहे.

येथील शिवाजी महाविद्यालयात शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत हा उपक्रम राबविला. या अंतर्गत माजी विद्यार्थी मुरलीधर डाके यांच्या इंडस्ट्रीजमध्ये आणि प्रा.नितीन लोहट यांच्या जिजाऊ ज्ञानतीर्थ शैक्षणिक संकुलात वृक्षारोपण करण्यात आले. तसेच सर्व माजी विद्यार्थ्यांनी केरळ येथील पूरग्रस्तांसाठी मदत केली.

५ हजार रुपयांची ही मदत पुरग्रस्तांना पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. यावेळी अण्णासाहेब सोनवणे, अनिल मोरे, सुनील डाके, अरुण [illegible], दिलीप कदम, अनंत डुकरे, अब्दुल वाजेद, लक्ष्मण पांचाळ, सुरेश वायरे, शिवराम खेडूळकर, अशोक राख, आत्माराम कच्छवे, विलास जैन, बालासाहेब काळे, नितीन मालेवार, इरावती खिल्लारे, रेणुका कदम, सविता डाके, विद्या गायकवाड, दीपाली काळे, विद्या मालेवार, प्रा. प्रदीप काळे, मनोहर सोळंके आदींसह माजी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सुरेश हिवाळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**वृक्षांना बांधल्या राख्या**

- माजी विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केल्यानंतर प्रत्येक झाडांना राख्या बांधून या झाडांच्या संरक्षणासाठी कटीबद्ध असल्याची शपथ घेतली. या उपक्रमामध्ये जिजाऊ ज्ञानतीर्थ शैक्षणिक संकुलातील विद्यार्थी, कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

देशोन्नती
सोमवार, दि. २७ ऑगस्ट २०१८



परभणी : येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी वृक्षारोपन केले. यावेळी सुरेश हिवाळे, बाळासाहेब काळे, मुरलीधर डाके, दिपाली काळे, विद्या मालेवार, अण्णासाहेब सोनवने, विलास जैन, सुनिल डाके, मनोहर सोळंके व इतर.

# वृक्षारोपन व केरळ पुरग्रस्तांना मदत

शहर प्रतिनिधी / २६ ऑगस्ट

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सन १९९६ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी वृक्षारोपन करत केरळ पुरग्रस्तांसाठी ५ हजाराची मदत जमा केली.

शिवाजी महाविद्यालयात शिक्षण घेतलेले माजी विद्यार्थी शनिवार २५ ऑगस्ट रोजी एकत्र आले. फोटोग्राफर ते उद्योजक असा प्रवास करणारे वर्गमित्र मुरलीधर डाके यांच्या सक्सेस कॉटन इंडस्ट्रीमध्ये आणि प्रा. नितीन लोहट यांच्या जिजाऊ ज्ञानतीर्थ शैक्षणिक संकुलात वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी अण्णासाहेब सोनवने, अनिल मोरे, सुनिल डाके, अरुण झांबरे, दिलीप कदम, आनंत डुकरे, अब्दुल वाजेद, लक्ष्मण पांचाळ, सुरेश वावरे, शिवराम खेडुळकर, अशोक राख ,आत्माराम कच्छवे, विलास जैन, बाळासाहेब काळे, नितीन मालेवार, इरावती खिल्लारे, रेणुका कदम, सविता डाके, विद्या गायकवाड, दिपाली काळे, विद्या मालेवार, प्रा. प्रदिप काळे, मनोहर सोळंके, सुरेश हिवाळे यांची उपस्थिती होती.

परभणी
सकाळ
सोमवार,
२७ ऑगस्ट २०१८
४

# 'शिवाजी'च्या माजी विद्यार्थ्यांकडून मदत

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या १९९६ च्या माजी विद्यार्थ्यांनी संकल्प वृक्षारोपणाच्या पूर्ततेसोबत शनिवारी (ता. २५) केरळ पूरग्रस्तांना पाच हजार रुपयांची मदत जमा केली. वर्गमित्र मुरलीधर डाके यांच्या सक्सेस कॉटन इंडस्ट्रीजमध्ये वीस आणि प्रा. नितीन लोहट यांच्या जिजाऊ ज्ञानतीर्थ शैक्षणिक संकुलात वीस झाडे लावली. या वेळी अण्णासाहेब सोनवणे, अनील मोरे, सुनील डाके, अरुण झांबरे, दिलीप कदम, अनंत डुकरे, अब्दुल वाजेद, लक्ष्मण पांचाळ, सुरेश वावरे, आत्माराम कच्छवे, विलास जैन, बालासाहेब काळे, नितीन मालेवार, इरावती खिल्लारे, रेणुका कदम, सरिता

सकाळ
मंगळवार, २८ ऑगस्ट २०१८ | ३

# प्लंबरची मुलगी झाली हवाई सुंदरी

**परभणी, ता. २७ (बातमीदार)** : पेडगाव (ता. परभणी) येथील नळ कारागिराच्या मुलीने उंच आकाशी भरारी घेत हवाई सुंदरीपर्यंत मजल मारली आहे. काजल भगवानसिंह गौतम, असे या हवाई सुंदरीचे नाव असून, सध्या एअर इंडिया कंपनीच्या विमानसेवेत हवाई सुंदरी म्हणून रुजू झाली आहे.


काजल गौतम

**मुलीच्या यशाने ग्रामस्थांसह नातेवाईक, मित्रपरिवारातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. मुलाप्रमाणे मुलीदेखील कुठेच मागे नसतात. हे काजलने सिद्ध करून दाखवले. मुलीचा अभिमान वाटतो.**
**– भगवानसिंह गौतम**

ग्रामीण भागातील विद्यार्थी गुणवंत आणि धाडशी असतात हे काजलने सिद्ध केले आहे. तीचे शालेय शिक्षण पेडगावातीलच जिल्हा परिषद शाळेत झाले; तर महाविद्यालयीन शिक्षण परभणीतील श्री शिवाजी महाविद्यालयात पूर्ण झाले. बालपणापासूनच काजल अभ्यासू, चिकित्सक व धाडसी स्वभावाची असल्याचे तिचे वडील भगवानसिंग सांगतात. वाचनाची आणि भाषणाचीही तिला आवड आहे. हवाईसुंदरी बनण्याचा धाडसी निर्णयही तिचाच.

तिनेच या पदासाठी दोन वर्षांपूर्वी ऑनलाइन अर्ज स्वतः भरला होता. त्यानंतर दिलेल्या परीक्षेत ती उत्तीर्ण होऊन तिची निवड एअर इंडिया कंपनीच्या विमानसेवेत हवाई सुंदरी म्हणून झाली आहे. ती सध्या बंगरूळमधील एलांका एअरपोर्ट येथे प्रशिक्षण घेत आहे.

काजलचे वडील प्लंबरचे अर्थात नळ कारागीरचे काम करतात; तर आई गृहिणी आहे. घरच्यांनी तिच्या या निर्णयाला पूर्ण प्रोत्साहन दिले. तिचे काका प्लंबर गोकूलसिंह पवार व त्यांच्या परिवाराचाही काजलच्या यशात सिंहाचा वाटा असल्याचे भगवानसिंह आवर्जून सांगतात.

पुण्य नगरी
शुक्रवार, ३१ ऑगस्ट २०१८ । परभणी

# महाविद्यालयीन युवकांचा स्वच्छ सर्वेक्षणमध्ये सहभाग



परभणी / प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या पेयजल व स्वच्छता मंत्रालयाच्या वतीने 'स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०१८' हा कार्यक्रम देशभर एकाचवेळी सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर परभणी येथे असणाऱ्या विविध महाविद्यालयातील युवकांनी मोबाईल ॲपव्दारे स्वच्छतेविषयक अभिप्राय नोंदवून आपला सहभाग नोंदविला.

जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन विभागातील कर्मचाऱ्यांनी गुरुवारी (दि.३०) परभणी शहरातील विविध महाविद्यालयातील युवकांना स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण एसएसजी १८ या ॲप्लिकेशनची माहिती सांगितली. यामध्ये श्री शिवाजी महाविद्यालय, ज्ञानोपासक महाविद्यालय, डॉ.प्रफुल्ल पाटील दंत महाविद्यालय, श्री शिवाजी विधी महाविद्यालय, ओंकारेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, परिचारिका प्रशिक्षण केंद्र, ग्रामसेवक ट्रेनिंग सेंटर, श्री शिवाजी इंजिनिअरिंग महाविद्यालय अशा विविध महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमामध्ये अभिप्राय नोंदविण्याची शुक्रवारी (दि.३१) अंतिम तारीख आहे. यावेळी श्री शिवाजी महाविद्यालयातील एकाचवेळी एक हजार युवकांना स्वच्छ सर्वेक्षण कार्यक्रमाबाबत माहिती सांगण्यात आली. याप्रसंगी श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, प्रा.डहाळे, प्रा.रेंगे, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रल्हाद भोपे, स्वच्छ भारत मिशन कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासह महाविद्यालयीन युवकांची उपस्थिती होती. या मोहिमेमध्ये जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक व नागरिकांनी सहभाग नोंदवून आपल्या जिल्ह्याचा सन्मान वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन जि.प.मुख्यकार्यकारी अधिकारी बी.पी.पृथ्वीराज, स्वच्छ भारत मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी एम.व्ही.करडखेलकर यांनी केले आहे.

**देशोन्नती**

शुक्रवार, दि ३१ ऑगस्ट २०१८

# महाविद्यालयीन युवकांचा स्वच्छ सर्वेक्षण मध्ये सहभाग



**शहर प्रतिनिधी / ३० ऑगस्ट**

**परभणी :** केंद्र शासनाच्या पेयजल व स्वच्छता मंत्रालयाच्या वतीने स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०१८ हा कार्यक्रम संबंध देशभर एकाचवेळी सुरु आहे. यासाठी परभणी मध्ये असणाऱ्या विविध महाविद्यालयातील युवकांनी मोबाईल अँप द्वारे स्वच्छते विषयक अभिप्राय नोंदवून आपला सहभाग नोंदविला.

३० ऑगस्ट २०१८ रोजी जिल्हा परिषद, परभणीच्या स्वच्छ भारत मिशन विभागातील कर्मचाऱ्यांनी परभणी मधील विविध महाविद्यालयाच्या महाविद्यालयीन युवकांना स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण एस.एस.जी. १८ या अप्लिकेशनची माहिती सांगितली. यामध्ये श्री शिवाजी महाविद्यालय, ज्ञानोपासक महाविद्यालय, डॉ.प्रफुल्ल पाटील दंत महाविद्यालय, श्री शिवाजी विधी महाविद्यालय, ओंकारेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, परिचारिका प्रशिक्षण केंद्र, ग्रामसेवक ट्रैनिंग सेंटर, श्री शिवाजी इंजिनीअरिंग महाविद्यालय अशा विविध महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमा मध्ये अभिप्राय नोंदविण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०१८ अशी आहे. यावेळी श्री शिवाजी महाविद्यालयातील एकाचवेळी एक हजार युवकांना स्वच्छ सर्वेक्षण कार्यक्रम बाबत माहिती सांगण्यात आली. या प्रसंगी श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, प्रा. डहाळे, प्रा. रेंगै, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख श्री प्रल्हाद भोपे, स्वच्छ भारत मिशन कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासह महाविद्यालयीन युवकांची उपस्थिती होती. या मोहिमेमध्ये ३१ ऑगस्ट २०१८ पर्यंत परभणी जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक व नागरिकांनी सहभाग नोंदवून आपल्या जिल्ह्याचा सन्मान वाढविण्यासाठी चांगले प्रयत्न करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीराज बी.पी.,स्वच्छ भारत मिशनचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी एम.व्ही. करडखेलकर यांनी केले आहे.

दि. ३१ ऑगस्ट २०१८

गोदातीर समाचार

# महाविद्यालयीन युवकांनी ॲपद्वारे नोंदविला स्वच्छता अभिप्राय



**परभणी/प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या पेयजल व स्वच्छता मंत्रालयाच्यावतीने स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण कार्यक्रम सुरु आहे. परभणीमध्ये असणाऱ्या विविध महाविद्यालयातील युवकांनी मोबाईल ॲपद्वारे स्वच्छते विषयक अभिप्राय नोंदवून आपला सहभाग नोंदविला.

जिल्हा परिषद स्वच्छ भारत मिशन विभागातील कर्मचाऱ्यांनी परभणीतील विविध महाविद्यालयीन युवकांना स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण या अप्लिकेशनची माहिती सांगितली. यामध्ये श्री शिवाजी महाविद्यालय, ज्ञानोपासक महाविद्यालय, डॉ.प्रफुल्ल पाटील दंत महाविद्यालय, श्री शिवाजी विधी महाविद्यालय, ओंकारेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, परिचारिका प्रशिक्षण केंद्र, ग्रामसेवक ट्रेनिंग सेंटर, श्री शिवाजी इंजिनीअरिंग महाविद्यालय अशा विविध महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमामध्ये अभिप्राय नोंदविण्याची अंतिम तारीख शुक्रवार (दि.३१) अशी आहे.

यावेळी श्री . शिवाजी महाविद्यालयातील एक हजार युवकांना स्वच्छ सर्वेक्षण कार्यक्रमाबाबत माहिती सांगण्यात आली. याप्रसंगी श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, प्रा.डहाळे, प्रा.रेंगे, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रल्हाद भोपे, स्वच्छ भारत मिशन कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासह महाविद्यालयीन युवकांची उपस्थिती होती.

या मोहिमेमध्ये जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक व नागरिकांनी सहभाग नोंदवून जिल्ह्याचा सन्मान वाढविण्यासाठी चांगले प्रयत्न करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी.पी.पृथ्वीराज, स्वच्छ भारत मिशनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी एम.व्ही. करडखेलकर यांनी केले आहे.

शुक्रवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०१८

पुरोगामी विचाराचे
**एकमत**

# महाविद्यालयीन युवकांचा स्वच्छ सर्वेक्षणमध्ये सहभाग

**परभणी : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या पेयजल व स्वच्छता मंत्रालयाच्या वतीने स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०१८ हा कार्यक्रम संबंध देशभर एकोचवेळी सुरु आहे. यासाठी परभणी मध्ये असणाऱ्या विविध महाविद्यालयातील युवकांनी मोबाईल अँप द्वारे स्वच्छते विषयक अभिप्राय नोंदवून आपला सहभाग नोंदविला.

दिनांक ३० ऑगस्ट २०१८ रोजी जिल्हा परिषद, परभणीच्या स्वच्छ भारत मिशन विभागातील कर्मचाऱ्यांनी परभणी मधील विविध महाविद्यालयाच्या महाविद्यालयीन युवकांना स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण एसएस १८ या अप्लिकेशनची माहिती सांगितली.



यामध्ये श्री शिवाजी महाविद्यालय, ज्ञानोपासक महाविद्यालय, डॉ.प्रफुल्ल पाटील दंत महाविद्यालय, श्री शिवाजी विधी महाविद्यालय, ओंकारेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, परिचारिका प्रशिक्षण केंद्र, ग्रामसेवक ट्रेनिंग सेंटर, श्री शिवाजी इंजिनीअरिंग महाविद्यालय अशा विविध महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमा मध्ये अभिप्राय नोंदविण्याची अंतिम तारीख दि.३१ ऑगस्ट २०१८ अशी आहे.यावेळी श्री शिवाजी महाविद्यालयातील एकाचवेळी एक हजार युवकांना स्वच्छ सर्वेक्षण कार्यक्रम ब्राबत माहिती सांगण्यात आली. या प्रसंगी श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, प्रा. डहाळे, प्रा. रेंगे, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख श्री प्रल्हाद भोपे, स्वच्छ भारत मिशन कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासह महाविद्यालयीन युवकांची उपस्थिती होती.

लोकमत औरंगाबाद, सोमवार, दि. ३ सप्टेंबर २०१८ ४



परभणी शहरातील शिवाजी महाविद्यालयातील सभागृहात शनिवारी भानुदासराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात तपासणीसाठी दाखल झालेले रुग्ण.

सकाळ Today | २

नांदेड, शनिवार, १ सप्टेंबर २०१८

# परभणीत गुडघादुखी उपचार शिबिर

**परभणी, ता. ३१ (बातमीदार) :** भानुदास चव्हाण प्रतिष्ठाण औरंगाबादच्या वतीने (ता. एक व दोन) सप्टेबर रोजी शिवाजी महाविद्यालयात गुडघेदुखीवरील उपचारावर मोफत तपासणीसाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवाजी महाविद्यालयात ता. एक सप्टेबर रोजी सकाळी नऊ ते पाच या वेळेत नावनोंदणी व तपासणी केली जाणार आहे; तर ता. दोन सप्टेबर रोजी कार्यक्रमाचे उद्‌घाटन आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. यानंतर मुंबई येथील प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अब्री तुरब चुनिया व त्यांचे पथक रुग्णांची तपासणी करणार आहे. इच्छुक रुग्णांनी नोंदणीसाठी आधारकार्ड किंवा मतदानकार्ड, ओळखपत्र सोबत ठेवावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

सकाळ Today | २

नांदेड, शनिवार, १ सप्टेंबर २०१८

# परभणीत गुडघादुखी उपचार शिबिर

**परभणी, ता. ३१ (बातमीदार) :** भानुदास चव्हाण प्रतिष्ठाण औरंगाबादच्या वतीने (ता. एक व दोन) सप्टेबर रोजी शिवाजी महाविद्यालयात गुडघेदुखीवरील उपचारावर मोफत तपासणीसाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवाजी महाविद्यालयात ता. एक सप्टेबर रोजी सकाळी नऊ ते पाच या वेळेत नावनोंदणी व तपासणी केली जाणार आहे; तर ता. दोन सप्टेबर रोजी कार्यक्रमाचे उद्‌घाटन आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. यानंतर मुंबई येथील प्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अबी तुरब चुनिया व त्यांचे पथक रुग्णांची तपासणी करणार आहे. इच्छुक रुग्णांनी नोंदणीसाठी आधारकार्ड किंवा मतदानकार्ड, ओळखपत्र सोबत ठेवावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

सकाळ
शनिवार, १ सप्टेंबर २०१८ | ४



परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयातील एकाच वेळी एक हजार युवकांना स्वच्छ सर्व्हेक्षण कार्यक्रमाबाबत माहिती सांगण्यात आली.

# युवकांचा स्वच्छ सर्व्हेक्षणमध्ये सहभाग

**परभणी, ता. ३१ (बातमीदार)** : केंद्र शासनाच्या पेयजल व स्वच्छता मंत्रालयाच्या वतीने स्वच्छ सर्व्हेक्षण ग्रामीण २०१८ हा कार्यक्रम देशभर एकाचवेळी सुरू आहे. यासाठी परभणीमध्ये असणाऱ्या विविध महाविद्यालयांतील युवकांनी मोबाईल ॲपद्वारे स्वच्छता विषयक अभिप्राय नोंदवून आपला सहभाग नोंदविला.

जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन विभागातील कर्मचाऱ्यांनी गुरुवारी (ता. ३०) शहरातील विविध महाविद्यालयांच्या महाविद्यालयीन युवकांना स्वच्छ सर्व्हेक्षण ग्रामीण 'एसएसजी १८' या अप्लिकेशनची माहिती सांगितली. यामध्ये श्री शिवाजी महाविद्यालय, ज्ञानोपासक महाविद्यालय, डॉ. प्रफुल्ल पाटील दंत महाविद्यालय, शिवाजी विधी महाविद्यालय, ओंकारेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, परिचारिका प्रशिक्षण केंद्र, ग्रामसेवक ट्रेनिंग सेंटर, श्री शिवाजी इंजिनिअरिंग महाविद्यालय अशा विविध महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमामध्ये अभिप्राय नोंदविण्याची अंतिम तारीख ता.३१ ऑगस्ट अशी आहे. या वेळी श्री शिवाजी महाविद्यालयातील एकाच वेळी एक हजार युवकांना स्वच्छ सर्व्हेक्षण कार्यक्रमाबाबत माहिती सांगण्यात आली. या प्रसंगी श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रल्हाद भोपे, स्वच्छ भारत मिशन कक्षातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासह महाविद्यालयीन युवकांची उपस्थिती होती.

बुधवार, दि. ५ सप्टेंबर २०१८
epaper.deshonnati.com
२
देशोन्नती

# समाजशास्त्राच्या अभ्यासाने सामाजीक मुल्यांची जोपासना होते - प्रा. डॉ. रामचंद्र भिसे

## शिवाजी महाविद्यालयात अभ्यासमंडळाची सुरुवात

*शहर प्रतिनिधी / ४ सप्टेंबर*

**परभणी :** अधुनिक काळात सामाजिक मुल्यांचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होत आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासाने सामाजिक मुल्यांची जोपासना होते असे प्रतिपादन प्रा. डॉ. रामचंद्र भिसे यांनी केले. ते येथील श्री शिवाजी महाविद्यालयात समाजशास्त्र विभागाच्या वतीने आयोजीत अभ्यास मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, प्रमुख पाहुणे म्हणुन उपप्राचार्या डॉ. विजया नांदापुरकर यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना डॉ. भिसे म्हणाले कि, सामाजिक मुल्यांमुळेच भारतीय समाजाची संस्कृती जगामध्ये आदर्श मानली गेली आहे. यावेळी बी. ए. प्रथम वर्ष व एम. ए. प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्तावीक डॉ. तुकाराम फिसफिसे, सुत्रसंचालन सुनिल लहाने तर आभार विठुकाका भारती यांनी मानले. यशस्वीतेसाठी अहिल्या अंजनडोहकर, प्रा. स्वाती देशमुख, प्रा. अर्चना बंग आदींनी परिश्रम घेतले.



**परभणी :** येथील शिवाजी महाविद्यालयात समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करतांना प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, प्रा. डॉ. रामचंद्र भिसे. या प्रसंगी डॉ. विजया नांदापुरकर, डॉ. तुकाराम फिसफिसे व इतर.

सकाळ
शनिवार, ८ सप्टेंबर २०१८ | ३

# शाळांमध्ये 'लोकराज्य'चे वाचन

## सीईओ पृथ्वीराज बी.पी.; परभणीत वाचक अभियानाला सुरवात

**परभणी, ता. ७ (बातमीदार) :** लोकराज्य हे राज्य शासनाचे मुखपत्र माहिती पूर्ण असून लोकराज्य वाचक अभियानातून जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागाने लोकराज्यच्या अंकाचे वाचन केले जाईल, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी केले.



**परभणी : लोकराज्य वाचक अभियान शुभारंभ व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमाचे उद्घाटन करताना पृथ्वीराज बी. पी., कृष्णकांत उपाध्याय, आण्णासाहेब शिंदे आदी.**

जिल्हा माहिती कार्यालय आणि श्री शिवाजी महाविद्यालय यांच्या वतीने शुक्रवारी (ता. सात) लोकराज्य वाचक अभियान शुभारंभ व स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाला जिल्हा पोलिस अधीक्षक कृष्णकांत उपाध्याय, अतिरिक्त जिल्हाधिकारी अण्णासाहेब शिंदे, जिल्हा माहिती अधिकारी अनिल आलूरकर, प्राचार्य डॉ. बी. यू. जाधव आदी उपस्थित होते. श्री. पृथ्वीराज म्हणाले, "स्पर्धा परीक्षेची तयारी करताना अचूक नियोजन महत्त्वाचे असून स्वत:वरचा विश्वास वाढवतांना पायाभूत विषयांची तयारी महाविद्यालयीन काळात विद्यार्थ्यांनी करावी. स्पर्धा परीक्षा या दीर्घ तयारीच्या मॅरेथॉन स्पर्धासारख्या असून शिस्तबद्ध प्रयत्नांनी नक्की यश मिळेल."

पोलिस अधीक्षक उपाध्याय म्हणाले, "ज्ञान हे चोरी होऊ न शकणारे आणि दुसऱ्यांमध्ये वाटल्याने वाढणारे धन आहे. याची उपासना विद्यार्थ्यांनी केली पाहिजे. श्री.आलूरकर यांनी प्रास्ताविक केले.

देशोन्नती परभणी, शनिवार, दि. ८ सप्टेंबर २०१८

# सर्व शाळात लोकराज्य वाचन उपक्रम राबविणार - पृथ्वीराज बी. पी.

## लोकराज्य वाचक अभियानांची सुरुवात

शहर प्रतिनिधी / ७ सप्टेंबर

**परभणी :** लोकराज्य हे शासनाचे मुखपत्र असून या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरीकांपर्यंत पोहचते. जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागाने लोकराज्य अंकाचे वाचन केले जाईल असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. पी. पृथ्वीराज यांनी केले.

ते जिल्हा माहिती कार्यालय आणि श्री शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत लोकराज्य वाचक अभियान शुभारंभ व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन अभियानात बोलत होते. कार्यक्रमास पोलीस अधिक्षक कृष्ण कांत उपाध्याय, अप्पर जिल्हाधिकारी अण्णासाहेब शिंदे, जिल्हा माहिती अधिकारी अनिल आलुरकर, प्राचार्य डॉ. बी. यु. जाधव यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना पोलीस अधिक्षक कृष्ण कांत उपाध्याय म्हणाले की, विद्या ही दुसऱ्यांना वाटल्याने वाढते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी याची उपासना केली पाहिजे. अप्पर जिल्हाधिकारी अण्णासाहेब शिंदे यांनी आपल्या मार्गदर्शनात सामान्य ज्ञानासाठी लोकराज्याचा कसा उपयोग होतो या विषयी माहिती दिली. प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे सुत्रसंचलन केले. कार्यक्रमास उपप्राचार्या डॉ. विजया नांदापूरकर, प्रा. प्रल्हाद भोपे, किरण वाघ यांची उपस्थिती होती.




परभणी : लोकराज्य वाचक अभियानात मार्गदर्शन करतांना जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीराज बी. पी. व्यासपीठावर पोलीस अधिक्षक कृष्ण कांत उपाध्याय, अप्पर जिल्हाधिकारी अण्णासाहेब शिंदे, जिल्हा माहिती अधिकारी अनिल आलुकर, प्राचार्य डॉ. बी. यु. जाधव व इतर.

लोकमत औरंगाबाद, सोमवार, दि. १० सप्टेंबर २०१८ ४

परभणी येथे मार्गदर्शन कार्यक्रम: कृष्णकांत उपाध्याय यांचे प्रतिपादन

# गुणवत्ता सिद्ध करा, नोकऱ्या मागे लागतील

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी:** विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करताना आपली गुणवत्ता सिद्ध करावी. नोकरीच्या मागे न लागता गुणवत्तेसाठी प्रयत्न करा, नोकऱ्या तुमच्या मागे धावतील, असे प्रतिपादन पोलीस अधीक्षक कृष्णकांत उपाध्याय यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमामध्ये उपाध्याय बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, डॉ.रामानंद व्यवहारे यांची प्रमुख उपस्थिती होती.



स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमाचे उद्घाटन करताना पोलीस अधीक्षक कृष्णकांत उपाध्याय. समवेत प्राचार्य बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. विजया नांदापूरकर, केंद्र समन्वयक डॉ. रामानंद व्यवहारे.

उपाध्याय म्हणाले, सध्याचे युग स्पर्धेचे आहे. अनेक नोकऱ्या उपलब्ध आहेत. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी या नोकऱ्या मिळविल्या पाहिजेत. विद्यार्थी हाच राष्ट्राचे भविष्य आहे. सकारात्मकता, आत्मविश्वास व प्रयत्नांमध्ये सातत्य राखा, अपयश आले तरी घाबरु नका, निराश न होता प्रयत्नशील व्हा, असा सल्ला देत कोणत्याही शिकवणीशिवाय युपीएससी, एमपीएससी परीक्षांमध्ये यश मिळविता येते, असे उपाध्याय यांनी सांगितले. प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रारंभी पोलीस अधीक्षक कृष्णकांत उपाध्याय यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.

मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. रामानंद व्यवहारे यांनी प्रास्ताविक केले. डॉ.तुकाराम फिसफिसे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ
बुधवार, १२ सप्टेंबर २०१८ | ४

# सातत्यामुळे स्पर्धा परीक्षांत यश : उपाध्याय

**परभणी, ता. ११ (बातमीदार) :** सकारात्मक दृष्टिकोण, आत्मविश्वास, संयम आणि सातत्याच्या बळावर स्पर्धा परीक्षांमध्ये चांगले यश मिळविता येते. त्यासाठी प्रयत्नशील रहा, असे सल्ला जिल्हा पोलिस अधीक्षक कृष्णकांत उपाध्याय यांनी दिला.

श्री शिवाजी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे चालविल्या जाणाऱ्या मार्गदर्शन वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव हे होते. या वेळी उपप्राचार्या डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. रामानंद व्यवहारे आदी उपस्थित होते.

सध्याचे युग स्पर्धेचे असून अनेक नोकऱ्याही आहेत. त्या विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून मिळविल्या पाहिजेत. नोकरीच्या मागे न धावता स्वतःला त्यासाठी अधिकाधिक गुणवत्ताप्रधान बनविले पाहिजे. तेव्हा नोकऱ्या तुमच्या मागे धावत येतील. अपयशला घाबरू नका, निराश न होता प्रयत्नशील बना, कोणत्याही कारणाशिवाय यूपीएससी व एमपीएसी परीक्षांत यश मिळविता येते. सध्या ज्ञान मिळविण्यासाठी विविध साधने उपलब्ध आहेत. त्याचा उपयोग घ्या, चारित्र स्वच्छ ठेवा, वाईट गोष्टींच्या नादी लागू नका, असा सल्लाही त्यांनी दिला. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. व्यवहारे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी सूत्रसंचालन केले.



**परभणीः** केंद्राचे उद्घाटन करताना एसपी कृष्णकांत उपाध्याय. प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्या डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. रामानंद व्यवहारे आदी.

३ पुढारी | मंगळवार, १८ सप्टेंबर २०१८



परभणी : भित्तिपत्रकाचे विमोचन करताना प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव. समवेत केशवअण्णा दुधाटे, उपप्राचार्य केशेट्टी आदी.

# महाविद्यालयात भित्तिपत्रक विमोचन

**परभणी :** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त श्री शिवाजी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे विमोचन प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, स्थानिक नियामक मांडळाचे निमंत्रित सदस्य केशवअण्णा दुधाटे,उपप्राचार्य डॉ. एस.एन.केशेट्टी,डॉ. विजया नांदापुरकर आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा.डॉ.तुकाराम फिसफिसे, प्रा.प्रल्हाद भोपे, प्रा.विश्वनाथ सुर्यवंशी उपस्थित होते. या भित्तीपत्रकाव्दारे विद्यार्थ्यांनी मराठवाडा मुक्तीसंग्रामापासुन सद्यस्थितीपर्यंत मराठवाड्यातील विविध क्षेत्रातील यशापयशाचा आढावा घेतला आहे. या भित्तीपत्रकासाठी विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख डॉ. तुकाराम फिसफिसे यांचे मार्गदर्शन लाभले. या भित्तीपत्रकाचे संपादन अक्षय बाणमारे, स्वप्नील वडमारे, किशन चौधरी या बी.ए.व्दितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी केले.

सकाळ

शुक्रवार, २१ सप्टेंबर २०१८ | ३

## 'शिवाजी' त भित्तीपत्रकाचे विमोचन

परभणी, ता.२० : मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त श्री शिवाजी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे विमोचन सोमवारी (ता. १७) करण्यात आले. या वेळी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, स्थानिक नियामक मंडळाचे निमंत्रित सदस्य केशव दुधाटे, उपप्राचार्य डॉ. एस. एन. केशट्टी, डॉ. विजया नांदापूरकर आदी मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. या वेळी प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा. प्रल्हाद भोपे, प्रा. विश्वनाथ सूर्यवंशी उपस्थित होते. या भित्तीपत्रकाद्वारे विद्यार्थ्यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामापासून सद्यस्थितीपर्यंत मराठवाड्यातील विविध क्षेत्रांतील यशापयशाचा आढावा घेतला. या भित्तीपत्रकासाठी विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख डॉ. फिसफिसे यांचे मार्गदर्शन लाभले. या भित्तीपत्रकाचे संपादन अक्षय बाणमारे, स्वप्नील वडमारे, किशन चौधरी या बी. ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी केले.

**देशोन्नती**

शुक्रवार, दि. २१ सप्टेंबर २०१८



**परभणी :** मत्स्यशास्त्र विषयावरील कार्यशाळेचे उदघाटन करतांना डॉ. बबन इंगोले यावेळी प्राचार्य बाळासाहेब जाधव, वामनराव जाधव, डॉ. विश्वास सेंबेकर, प्रा. रोहिदास नितोंडे व इतर.

# मत्स्यशास्त्रात अनेक संधी - डॉ.बबन इंगोले

**परभणी :** मत्स्यशास्त्रात आज व्यवसायाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. तसेच विद्यार्थी व संशोधकांना राष्ट्रीय,अंतरराष्ट्रीय पातळीवर संधी आहेत. या संधींचा लाभ घ्यावा असे आवाहन जेष्ठ शास्त्रज्ञ डॉ.बबन इंगोले यांनी केले.

येथील श्री. शिवाजी महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने बि.एस्सी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, प्रमुख पाहूणे म्हणून प्राचार्य डॉ.वामनराव जाधव, डॉ.विश्वास शेंबेकर, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी,. डॉ. विजया नांदापूरकर, प्रा. डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. जे. एम. गायकवाड, डॉ. सुनिल आहीरराव यांची उपस्थिती होती.

# मराठवाडा

३ सकाळ नांदेड, शुक्रवार, २१ सप्टेंबर २०१८

## शिवाजी महाविद्यालयात आज चर्चासत्र

**परभणी** : येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात शुक्रवारी (ता. २१) सकाळी अकराला 'उच्च शिक्षणातील गुणवत्तेचा ध्यास' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके अध्यक्षस्थानी असतील. मंडळाचे चिटणीस आमदार सतीश चव्हाण उपस्थित राहणार आहेत. डॉ. देवेंद्र कवडे, प्राचार्य आर. टी. देशमुख, हेमंत जामकर आदी मार्गदर्शन करणार आहेत. प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. रोहिदास नितोंडे यांनी ही माहिती दिली.

लोकमत औरंगाबाद, शुक्रवार, दि.२१ सप्टेंबर २०१८

## चर्चासत्राचे आयोजन

परभणी- शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने २१ सप्टेंबर रोजी एक दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील 'उच्च शिक्षणातील गुणवत्तेचा ध्यास' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हे चर्चासत्र महाविद्यालयातील सभागृहात ११ वाजता आयोजित करण्यात आले आहे. चर्चासत्रास डॉ. देवेंद्र कवडे, प्राचार्य आर.टी. देशमुख, हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ.रोहिदास नितोंडे यांची उपस्थिती राहणार आहे.

शनिवार, दि. २२ सप्टेंबर २०१८ पान नं. ४



**उद्घाटन...**परभणी शहरातील शिवाजी महाविद्यालयात शुक्रवारी एक दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मशिप्रचे महाविद्यालय विकास अधिकारी प्राचार्य आर.टी.देशमुख, हेमंत जांमकर, प्राचार्य बाळासाहेब जाधव, केशवअण्णा दुधाटे, रोहिदास नितोंडे, संजय नखाते आदी दिसत आहेत. छाया: श्रीकांत कुलकर्णी,परभणी.

लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि.२५ सप्टेंबर २०१८ ४

**परभणीत कार्यशाळा : इंगोले यांचे प्रतिपादन**

# मत्स्यशास्त्रात करिअरच्या अनेक संधी

लोकमत न्यूज नेटवर्क



**परभणी** : मत्स्यशास्त्रात विद्यार्थ्यांसाठी जागतिक पातळीवर करिअरविषयक अनेक संधी उपलब्ध आहेत. या संधीचा विद्यार्थी व संशोधकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन गोवा येथील राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेचे प्रोफेसर डॉ.बबन इंगोले यांनी केले.

येथील शिवाजी महाविद्यालय आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या वतीने आयोजित कार्यशाळेत इंगोले बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य बाळासाहेब जाधव, प्रमुख पाहुणे म्हणून स्वारातीम विद्यापीठाचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ.वामनराव जाधव, लातूर येथील डॉ.विश्वास शेंबेकर, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास के.शेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर, प्रा.डॉ. रोहिदास नितोंडे, समन्वक डॉ.जे.एम.गायकवाड, संयोजक डॉ.सुनील अहिरराव यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ.इंगोले यांनी अंटार्क्टिका मोहिमेसंदर्भात सविस्तर माहिती दिली. डॉ.विश्वास शेंबेकर म्हणाले, सध्या फिश आणि फिशरीजवर आधारित उद्योग भारतीयांना परकीय चलन मिळवून देण्याचे उत्तम साधन आहे. भारतीय अर्थ व्यवस्थेत या उद्योगांचा मोलाचा वाटा आहे. मत्स्य संवर्धन, उत्पादन व त्यावरील आधारित प्रक्रिया उद्योगासाठी शासनाचे पुरेसे अर्थसहाय्यक उपलब्ध आहे. तरुणांनी या संधीचा फायदा घेऊन व्यवसाय निर्मितीकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

प्राचार्य डॉ.जाधव यांनी अध्यक्षीय समारोप केला. डॉ. जे.एम. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. डॉ.सुनील अहिरराव यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. डॉ.जयंत बोबडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.हनुमंत जगताप यांनी आभार मानले. यशस्वीतेसाठी डॉ.सचिन येवले, प्रा.ओमप्रकाश चिलगर, प्रा.अण्णासाहेब शिंदे आदींनी प्रयत्न केले.

कार्यशाळेस नांदेड, लातूर, हिंगोली व परभणी जिल्ह्यातील प्राध्यापक, मत्स्यशास्त्र अभ्यास मंडळाचे पदाधिकारी, विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमत औरंगाबाद, रविवार, दि.३० सप्टेंबर २०१८ ४

# युवक महोत्सवात शिवाजी महाविद्यालयाचे यश

परभणी / प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वतीने नांदेड येथे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या संहयोग २०१८ आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने उल्लेखनीय यश मिळविले आहे.

महोत्सवात विविध प्रकारात शिवाजी महाविद्यालयाच्या संघांनी पाच पदकं प्राप्त केली आहेत. यात रांगोळी कला प्रकारात मिनल शेटे हिस सुवर्णपदक, कलात्मक जुळवणी कलाप्रकारात मीनल शेटे, रमेश गायकवाड, संकेत गाडेकर, राजेश कंठाळे यास सुवर्णपदक, शास्त्रीय सुरवाद्य कलाप्रकारात कृष्णा शिनगारे यास रजतपदक, पाश्चात्य सुगम गायनात श्वेता साखरे हिस रजत पदक तर शास्त्रीय गायनात मयंक परळीकर यास रजत पदक मिळाले आहे. या

## महाविद्यालयाला विविध प्रकारात पाच पदके

युवक महोत्सवात महाविद्यालयाच्या एकूण १९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. वक्तृत्व, वादविवाद, समूह गायन, कव्वाली, पोवाडा, पोस्टर मेकिंग, आदी कला प्रकारात विद्यार्थ्यांनी कलांचे सादरीकरण केले.

या संघास सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ.जयंत बोबडे, संगीत विभागप्रमुख प्रा.सविता कोकाटे, डॉ.पी.एस.लोखंडे, प्रा.केदार केंद्रेकर, प्रा.ऋतुजा वनकर, प्रा.अंकुश खटिंग, डॉ.गोरख राठोड आदींनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल महाविद्यालयाच्या स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंत जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. एस.एन.केशेट्टी, डॉ.विजया नांदापुरकर, प्रबंधक विजय मोरे आदींनी स्वागत केले.



परभणी : लातुर जिल्ह्यातील बाभळगाव येथे पार पडलेल्या 'विलास २०१९' आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात श्री शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. यावेळी त्यांचा सन्मान करताना हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य श्रीनिवास केशेट्टी, उपप्राचार्या डॉ. विजया नांदापूरकर, प्रबंधक विजय मोरे, डॉ रोहिदास नितोंडे, डॉ. जयंत बोबडे, प्रा. सविता कोकाटे, डॉ दिगंबर रोडे, प्रा. केदार केंद्रेकर, प्रा. अंकुश खटींग, प्रा. ऋतुजा वनकर, बळीराम कौसईतकर, किरण डाके व इतर.

# श्री शिवाजी महाविद्यालयास नऊ पारितोषीके

## यश ▶▶ 'विलास २०१९' आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव

**परभणी : बाभळगाव जि. लातूर येथे संपन्न झालेल्या 'विलास-२०१९' आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात श्री शिवाजी महाविद्यालयास एकूण ९ पारितोषिके मिळाली आहेत.**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय बाभळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने २१ ते २४ संप्टेंबर दरम्यान 'विलास २०१९' युवक महोत्सव संपन्न झाला. या महोत्सवात एकूण ८१ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. श्री शिवाजी महाविद्यालयाने १७ कलाप्रकारांत सहभाग नोंदवला. महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखून आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात घवघवीत यश संपादन करत एकूण ९ पारितोषिके मिळवली. कोलाज कलाप्रकारात संकेत गाडेकर यास सुवर्ण, एकांकिका कलाप्रकारात सांघिक रजत, एकांकिका 'स्त्री' अभिनयास संपत्ती डावरे हिस रजत, एकांकिका दिग्दर्शनासाठी ऐश्वर्या डावरे हिस रजत, सुरवाद्य कलाप्रकारात मयंक परळीकर यास सुवर्ण, समूह गायन भारतीय कलाप्रकारात गौरव जाधव, मनोज कुलकर्णी, वैष्णवी गायकवाड, कीर्ती कोकडवार, सौरभ लोखंडे, प्रियंका ठिरूमलपाड यांना कांस्य, कव्वाली या कलाप्रकारात कांस्य, विडंबन कलाप्रकारात- ऐश्वर्या डावरे, संपत्ती डावरे, पल्लवी चौरंगे, संकेत गाडेकर, अश्विनी महात्मे, मनोज कुलकर्णी यांना प्रथम, भरतनाट्यमसाठी ऐश्वर्या डावरे हिस सुवर्ण पारितोषिक मिळाले. महेश रेंगे, स्वराज पवार आणि युवराज क्षिरसागर यांनीही सहभाग नोंदवला. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या स्थानिक नियामक मंडळाचे प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य श्रीनिवास केशेट्टी, उपप्राचार्या डॉ. विजया नांदापूरकर, प्रबंधक विजय मोरे, डॉ रोहिदास नितोंडे यांनी अभिनंदन केले. या संघास सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. जयंत बोबडे, संघव्यवस्थापिका तथा संगीत विभागप्रमुख प्रा. सविता कोकाटे, संघव्यवस्थापक डॉ दिगंबर रोडे, प्रा. केदार केंद्रेकर, प्रा. अंकुश खटींग, प्रा. ऋतुजा वनकर, बळीराम कौसईतकर, किरण डाके आदींनी मार्गदर्शन केले.

पुण्य नगरी
रविवार, ३० सप्टेंबर २०१८ | परभणी

# शिवाजी महाविद्यालयास युवक महोत्सवात ५ पदके

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी** : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने नांदेड येथे पार पडलेल्या सहयोग २०१८ या अंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने ५ पदके मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.

रांगोळी कला प्रकारामध्ये मिनल शेटे हिला सुवर्ण पदक मिळाले. कलात्मक जुळवणी प्रकारात मीनल शेटे, रमेश गायकवाड, संकेत गाढेकर, राजेश कंठाळे यांना सुवर्णपदक, शास्त्रीय सूरवाद्य कला प्रकारात कृष्णा शिनगारे यास रजत पदक, पाश्चात्य सुगम गायनात श्वेता साखरे हिस रजत तर शास्त्रीय गायनात मयंक परळीकर यास रजत पदक मिळाले. या युवक महोत्सवात १९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. वक्तृत्व, वाद-विवाद, समूह गायन, कव्वाली, पोवाडा, पोस्टर मेकींग आदी कलाप्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. या संघाला सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. जयंत बोबडे, संगीत विभागप्रमुख प्रा. सविता कोकाटे, प्रा. पी.एस. लोखंडे, प्रा. केदार केंद्रेकर, प्रा. ऋतूजा वनकर, प्रा. अंकुश खटींग, डॉ. गोरख राठोड आदींनी मार्गदर्शन केले. विजयी स्पर्धकांचे महाविद्यालयात स्वागत करण्यात आले. यावेळी स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. एस.एन. केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, प्रबंधक विजय मोरे आदींची उपस्थिती होती.



**सत्कार** : नांदेड येथे पार पडलेल्या सहयोग २०१८ आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात श्री शिवाजी महाविद्यालयाच्या पदक विजेत्या विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. एस.एन. केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. जयंत बोबडे, प्रा. सविता कोकाटे, डॉ. पी.एस. लोखंडे आदी.

MY परभणी-हिंगोली

# युवक महोत्सवात श्री शिवाजी महाविद्यालयास पाच पदके



परभणी : विद्यार्थ्यांच्या सत्कारप्रसंगी प्राचार्य डॉ. जाधव व प्राध्यापक.

**परभणी : प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने नुकताच सहयोग-२०१८ आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव नांदेड येथे संपन्न झाला. या महोत्सवात परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने पाच पदके मिळवली आहेत.

रांगोळी कला प्रकारात मीनल शेटे हिस सुवर्णपदक, कलात्मक जुळवणी कलाप्रकारात मीनल शेटे, रमेश गायकवाड, संकेत गाडेकर, राजेश कंठाळे यांस सुवर्णपदक, शास्त्रीय सुरवाद्य कलाप्रकारात कृष्णा शिनगारे यास रजतपदक, पाश्चात्य सुगम गायनात श्वेता साखरे हिस रजत पदक तर शास्त्रीय गायनात मयंक परळीकर यास रजत पदक मिळाले. एकूण १९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी विविध कलांचे सादरीकरण केले. या संघास सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. जयंत बोबडे, संगीत विभागप्रमुख प्रा. सविता कोकाटे, डॉ. पी. एस. लोखंडे, प्रा. केदार केंद्रेकर, प्रा. ऋतुजा वनकर, प्रा. अंकुश खटींग, डॉ. गोरख राठोड आदींनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी त्यांचा सत्कार केला.

MY परभणी-हिंगोली ३ पुढारी | रविवार, ३० सप्टेंबर २०१८

संक्षिप्त



परभणी : शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित चित्रपट रसास्वाद शिबिराचे उद्घाटन करताना दिग्दर्शक विक्रांत बदरखे, प्राचार्य डॉ. जाधव, प्रा. किरण सोनटक्के, रवी पाठक.

## परभणीत चित्रपट रसास्वाद कार्यक्रम

परभणी : येथे शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात शुक्रवारी सायंकाळी चित्रपट रसास्वाद कार्यक्रमाचे १६ वे पुष्प सादर करण्यात आले. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. बी. यू. जाधव, 'ज्ञानसाधना'चे किरण सोनटक्के उपस्थित होते. यावेळी विक्रांत बदरखे दिग्दर्शित द ड्रेनेज़ हा लघुपट दाखविण्यात आला. नवाझुद्दीन सिद्दीकी आणि मुकेश छाब्रा यांची निर्मिती असलेला आणि नंदू माधव यांच्या अभिनयाने संपन्न असलेल्या द ड्रेनेजला अनेक चित्रपट महोत्सवात पुरस्कार मिळालेले असून लघुपटाच्या सादरीकरणानंतर दिग्दर्शकाने लघुपटामागील कलात्मक बाबी व लघुपटाचा एकंदरीत प्रवास प्रेक्षकांसमोर मांडला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन त्र्यंबक वडसकर यांनी केले व प्रास्ताविक रवी पाठक यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अतुल साळवे, ऐश्वर्या डावरे, मृणाल दिघोळकर, सोहम खिल्लारे, चकोर किनगावकर, वैभव जाधव, रोहन पाटील आदींनी मेहनत घेतली.

रविवार, दि. ३० सप्टेंबर २०१८ पान नं. ४

दै.दिलासा
नियमीत वाचा

# स्वत:ला व्यक्त करण्यासाठी सिनेमा करावा

## शिवाजी महाविद्यालयात विक्रांत बदरखे यांचे प्रतिपादन



परभणी,दि.२९(प्रतिनिधी): स्वत:ला व्यक्त करण्याकरिता सिनेमा सारखे चांगले माध्यम नाही, असे मत दिग्दर्शक विक्रांत बदरखे यांनी व्यक्त केलेय

येथील शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात शुक्रवारी सायंकाळी चित्रपट रसास्वाद कार्यक्रमाचे १६ वे पुष्प सादर करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.बी.यु. जाधव,ज्ञानसाधना प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष किरण सोनटक्के हे सुद्धा उपस्थित होते.

या कार्यक्रमात विक्रांत बदरखे दिग्दर्शित द ड्रेनेज हा लघुपट दाखविण्यात आला. खेड्यातील एक माणूस नवीन मोबाईल घ्यायला शहरात येतो आणि त्याने घेतलेला मोबाईल ड्रेनेज मध्ये पडतो. तो मोबाईल त्या ड्रेनेज मधून काढण्यासाठी जी धडपड सुरु होते ती म्हणजे द ड्रेनेज या पंधरा मिनिटांच्या शॉर्ट फिल्ममध्ये एकाच वेळेस मोबाईलच स्टेटस सिंबॉल बनलेल असण, मोबाईल मुळे माणसांच एकमेकांशी तुटलेल असण. आणि माणसाची एकट होतं जाण्याची प्रक्रिया यावर अतिशय छान पध्दतीने भाष्य केलेल आहे.नवाझुद्दिन सिद्दिकी आणि मुकेश छाब्रा यांची निर्मिती असलेला आणि नंदू माधव यांच्या अभिनयाने संपन्न असलेला द ड्रेनेज ला अनेक चित्रपट महोत्सवात पुरस्कार मिळालेले असून लघुपटाच्या सादरीकरणा नंतर दिग्दर्शकाने लघुपटामागील कलात्मक बाबी व लघुपटाचा एकंदरीत प्रवास प्रेक्षकांसमोर मांडला. या लघुपटाला रसिक प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली व मनमोकळेपणाने दिग्दर्शकाशी संवाद साधला.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन त्र्यंबक वडसकर यांनी केले व प्रस्ताविक रवि पाठक यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अतुल साळवे, ऐश्वर्या डावरे, मृणाल दिघोळकर, सोहम खिल्लारे, चकोर किनगावकर, वैभव जाधव, रोहन पाटील आदीनी मेहनत घेतली. या कार्यक्रमास मोठया संख्येने पदाधिकारी व रसिकांची उपस्थिती होती.

दि. ३० सप्टेंबर २०१८

गोदातीर समाचार

# युवक महोत्सवात शिवाजी महाविद्यालयास पाच पदके



परभणी/प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्यावतीने नुकताच आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सव सहयोग-२०१८ नांदेड येथे संपन्न झाला. या युवक महोत्सवात येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने घवघवीत यश संपादन करत पाच पदके मिळवली आहेत.

रांगोळी कला प्रकारात मीनल शेटे हिस सुवर्णपदक, कलात्मक जुळवणी कला प्रकारात मीनल शेटे, रमेश गायकवाड, संकेत गाडेकर, राजेश कंठाळे यास सुवर्णपदक, शास्त्रीय सुरवाद्य कला प्रकारात कृष्णा शिनगारे यास रजत पदक, पाश्चात्य सुगम गायनात श्वेता साखरे हिस रजत पदक तर शास्त्रीय गायनात मयंक परळीकर यास रजत पदक मिळाले. या युवक महोत्सवात महाविद्यालयाच्या १९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. वक्तृत्व, वादविवाद, समूह गायन, कव्वाली, पोवाडा, पोस्टर मेकिंग आदी कला प्रकारात विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.

या संघास सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ.जयंत बोबडे, संगीत विभागप्रमुख प्रा.सविता कोकाटे, डॉ.पी.एस.लोखंडे, प्रा.केदार केंद्रेकर, प्रा.ऋतुजा वनकर, प्रा.अंकुश खटिंग, डॉ.गोरख राठोड आदींनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल महाविद्यालयाच्या स्थानिक संयोजन समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. एस.एन.केशेट्टी, डॉ.विजया नांदापुरकर, प्रबंधक विजय मोरे आदींनी अभिनंदन केले आहे.

देशोन्नती

# श्री शिवाजी महाविद्यालयात बुधवारी कार्यशाळा

*शहर प्रतिनिधी / १ ऑक्टोंबर*

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयात बुधवार ३आक्टोंबर रोजी कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री शिवाजी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार वेगवेगळया क्षेत्रात नौकऱ्या मिळवून देण्यासाठी करिअर कौन्सलींग, ट्रेनिंग ॲड प्लेसमेंट सेल कार्यरत आहे. विद्यार्थ्यांमधील विविध गुण विकसीत करण्यासाठी ३ ऑक्टोंबर रोजी कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयाच्या नविन सास्कृतीक सभागृहात सकाळी १० वाजता. आयोजीत केले आहे. सकाळच्या सत्रात बी.ए.,बी.कॉम.,बी.एस.सी. व सेवटच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तर दुपारी १२.३० वाजता. एम.ऐ., एम.कॉम., एम.एस.सी.,बी.सी.ए.,बीसीएस, बीबीए च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. धनंजय गायकवाड हे मार्गदर्शन करणार असून कार्यशाळेचा फायदा घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.एस.एन.के.सेट्टी, विजया नांदापुरकर, डॉ.हनुमंत जगताप, डॉ.रामानंद व्यवहारे, डॉ.एम.ए.शेख, डॉ.मदन परतुरकर, प्रा.आर.आर.मिस्त्री, प्रा.ए.एम.भंडारे, डॉ.डी.बी.रोडे यांनी केले आहे.

सकाळ

मंगळवार, २ ऑक्टोबर २०१८ | ४



परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघासोबत प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. एस. एन. केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर.

# शिवाजी महाविद्यालयास पाच पदक

**परभणी :** नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या नुकत्याच पार पडलेल्या सहयोग-२०१८ आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने पाच पदके मिळविली आहेत. रांगोळी कला प्रकारात मिनल शेटे सुवर्णपदक, कलात्मक जुळवणी कलाप्रकारात मिनल शेटे, रमेश गायकवाड, संकेत गाडेकर, राजेश कंठाळे यास सुवर्णपदक, शास्त्रीय सुरवाद्य कलाप्रकारात कृष्णा शिनगारे यास रजतपदक, पाश्चात्य सुगम गायनात श्वेता साखरे रजत पदक; तर शास्त्रीय गायनात मयंक परळीकर यास रजत पदक मिळाले.

सकाळ

मंगळवार, २ ऑक्टोबर २०१८ | ३

## 'शिवाजी'त गांधी संस्कार परीक्षा

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयामध्ये राष्ट्रपीता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने गांधी रिसर्च फांउडेशन, जळगाव व श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी यांच्या वतीने मंगळवारी (ता. दोन) गांधी संस्कार परीक्षा घेण्यात आली. या वेळी महत्मा गांधी लिखित ग्रंथावर आधारित वर्गनिहाय परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेमध्ये वर्गनिहाय जिल्ह्यातून प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना गांधी रिसर्च फांउडेशनकडून सन्मानित करण्यात येणार आहे. या परीक्षेकरिता प्राचार्य डॉ. बी. यू. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी परीक्षा समन्वयक म्हणून; तर प्रा. डॉ. डी. बी. रोडे यांनी सहसमन्वयक म्हणून काम पाहीले. परीक्षेसाठी एकूण १३० विद्यार्थी सहभागी झाले होते.

देशोन्नती
मंगळवार, दि. २ ऑक्टोबर २०१८

# शिवाजी महाविद्यालयात शौर्य दिन साजरा

शहर प्रतिनिधी / १ ऑक्टोबर

**परभणी :** शिवाजी महाविद्यालयाच्या एनसीसी एनएसएस आणि जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शौर्य दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अप्पर जिल्हाधिकारी अण्णासाहेब शिंदे हे होते.

शिवाजी महाविद्यालयात घेण्यात आलेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन उपप्राचार्य डॉ. विजया नांदापुरकर, मेजर सुभेदार पाटील, लेफ्टनंट प्रा. प्रशांत सराफ यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्ह्यातील सैन्य दलात कर्तव्य बजावत असतांना शहीद झालेल्या सैनिकांच्या कुटूंबीयांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्तावीक प्रा. प्रशांत सराफ यांनी केले. त्यांनी प्रास्तावीकात शौर्य दिनाचे महत्व, देशनिष्ठा व तरुणांची भुमिका याबाबत मार्गदर्शन केले.

माजी सैनिक सातपुते यांनी सर्जीकल स्ट्राईकची यशोगाथा सांगीतली. यावेळी सर्जीकल स्ट्राईकची माहितीपटही दाखविण्यात आले. सुत्रसंचालन प्रा. प्रल्हाद भोपे यांनी केले.



परभणी : शिवाजी महाविद्यालयात एनसीसी व एनएसएस विभागाच्या वतीने शौर्य दिनानिमित्त शहीद सैनिकांच्या कुटूंबीयांचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी अप्पर जिल्हाधिकारी अण्णासाहेब शिंदे, उपप्राचार्या डॉ. विजया नांदापुरकर, सुभेदार पाटील, लेफ्टनंट प्रशांत सराफ, प्रा. प्रल्हाद भोपे व इतर.

देशोन्नती
मंगळवार, दि. २ ऑक्टोबर २०१८ २
epaper.deshonnati.com

# श्री शिवाजी महाविद्यालयामध्ये गांधी संस्कार परीक्षा संपन्न



**शहर प्रतिनिधी / २ ऑक्टोबर**

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयामध्ये राष्ट्रपीता म.गांधी यांच्या जयंती निमित्ताने गांधी रिसर्च फांउडेशन जळगाव व श्री शिवाजी महाविद्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने गांधी संस्कार परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी म.गांधींच्या मंगलप्रभात, आरोग्याची किल्ली, विधायक कार्यक्रम, पंचायत राज, हिंद स्वराज, संक्षिप्त आत्मकथा, हमारे गाँवो का पुनर्निर्माण इत्यादी म.गाधी लिखित ग्रंथावर आधारित वर्गनिहाय परीक्षा घेण्यात आली. परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना म.गांधींचे विचार कळावेत तसेच ते विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजावेत हा या परीक्षेमागचा उद्देश आहे. या परीक्षेमध्ये वर्गनिहाय जिल्ह्यातुन प्रथम, व्दितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना गांधी रिसर्च फांउडेशन कडून सन्मानित करण्यात येणार आहे. या परीक्षेकरीता प्राचार्य डॉ. बी.यु.जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी परीक्षा समन्वयक म्हणून तर प्रा.डॉ.डी.बी.रोडे यांनी सहसमन्वयक म्हणून काम पाहिले. या परीक्षा दरम्यान उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशट्टी, प्रा.रविशंकर झिंगरे यांची उपस्थिती होती.

या परीक्षेसाठी एकुण १३० विद्यार्थी सहभागी झाले होते. या परीक्षेच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.एस. एल.राठोड, प्रा.डॉ.राजु बडूरे, प्रा.विश्वनाथ सुर्यवंशी, प्रा.वैजनाथ स्वामी आदीनी प्रयत्न केले.

परभणी

पुढारी बुधवार, ३ ऑक्टोबर २०१८

# गांधी संस्कार परीक्षेला प्रतिसाद

**परभणी : प्रतिनिधी**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्ताने गांधी रिसर्च फांउडेशनच्या वतीने गांधी संस्कार परीक्षा घेण्यात आली.

या परीक्षेमध्ये वर्गनिहाय जिल्ह्यातुन प्रथम, व्दितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना गांधी रिसर्च फांउडेशन कडून सन्मानित करण्यात येणार आहे. या परिक्षेकरीता प्राचार्य डॉ.बी.यु.जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.डॉ.तुकाराम फिसफिसे यांनी परीक्षा समन्वयक म्हणून तर प्रा.डॉ.डी.बी.रोडे यांनी सहसमन्वयक म्हणून काम केले आहे. या परिक्षेदरम्यान उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशट्टी, प्रा.रविशंकर झिंगरे यांची केंद्रावर उपस्थिती होती.

परभणी-हिंगोली ३ पुढारी | सोमवार, ८ ऑक्टोबर २०१८

# कौशल्य विकासातून नोकरीची संधी

## परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयाच्या कार्यशाळेत डॉ. धनंजय गायकवाड यांचे प्रतिपादन

**परभणी : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या विविध कौशल्यांच्या विकासातून नोकऱ्या मिळू शकतात. त्याचबरोबर कोणत्याही क्षेत्रात यशस्वी करिअर करता येते, असे प्रतिपादन डॉ. धनंजय गायकवाड यांनी केले.




**परभणी :** मृदू कौशल्य विकास कार्यशाळेस उपस्थित डॉ. धनंजय गायकवाड, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. हनुमंत जगताप, डॉ. मदन परतूरकर, प्रा. लक्ष्मीकांत पोकळे आदी.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात मृदू कौशल्य विकास कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना गायकवाड बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव होते. याप्रसंगी श्री शिवाजी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य बालाजी रेवणवार, करिअर कौन्सिलिंग ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट सेलचे प्रमुख डॉ. हनुमंत जगताप, प्रा. लक्ष्मीकांत पोकळे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. डॉ. गायकवाड म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये विविध प्रकारची कौशल्ये असतात. त्यांचा विकास झाला पाहिजे. म्हणून विद्यार्थ्यांनी सतत चांगल्या गोष्टीचा विचार करायला हवा. सकारात्मकता, आदरणीयता, आपल्यामधील उत्कृष्ट गुणांची जोपासना केली पाहिजे. मोठी स्वप्ने पाहून त्यासाठी नियोजनपूर्वक कष्ट केले पाहिजे. संभाषण कौशल्यांच्या विकासातून, ज्ञान आणि माहितीच्या बळावर नोकऱ्या सहज मिळू शकतात. प्राचार्य डॉ. जाधव म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्यामधील आवडीचे गुण, कला जोपासाव्यात. त्यानुसार महाविद्यालयातर्फे त्यांना प्रोत्साहन दिले जाईल.

महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांला नोकरी मिळून जाईल. यासाठी करीअर कौन्सिलिंग ॲन्ड प्लेसमेंट सेलच्या संपर्कात राहण्याचे आवाहन त्यांनी केले. २ सत्रातील कार्यशाळेत बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., व्ही. बी. ए., एम. ए., एम. एस्सी., एम. कॉम., एम. बी. ए., डी. फार्मसीचे विद्यार्थी सहभागी होते. डॉ. हनुमंत जगताप यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मदन परतुरकर यांनी मृदू कौशल्ये विकास तज्ञ डॉ. धनंजय गायकवाड यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन डॉ. एम. ए. शेख यांनी केले. करीअर कौन्सिलिंग ट्रेनिंग ॲंड प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. रामानंद व्यवहारे यांनी आभार मानले.

दि. ७ ऑक्टोबर २०१८
गोदातीर समाचार

# विद्यार्थ्यांना कौशल्य विकासातून नोकऱ्या मिळू शकतात- डॉ.गायकवाड

**परभणी/प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या विविध कौशल्य विकासातून नोकऱ्या मिळू शकतात. त्याचबरोबर कोणत्याही क्षेत्रात यशस्वी करिअर करता येते, असे प्रतिपादन डॉ.धनंजय गायकवाड यांनी केले आहे.

श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित मृदू कौशल्य विकास कार्यशाळेत डॉ.गायकवाड बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव होते. यावेळी श्री शिवाजी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य बालाजी रेवणवार, करिअर कॉन्सलिंग, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट सेलचे डॉ.हनुमंत जगताप, प्रा. लक्ष्मीकांत पोकळे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.



पुढे मार्गदर्शन करताना गायकवाड म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्य असतात. त्याचा विकास झाला पाहिजे. म्हणून विद्यार्थ्यांनी सतत चांगल्या गोष्टीचा विचार केला पाहिजे. सकारात्मकता, आदरणीयता आपल्यातील उत्कृष्ट प्रवृत्तींची जोपासणा केली पाहिजे. मोठे स्वप्न पाहून त्यासाठी नियोजनपूर्वक कष्ट केले पाहिजे. संभाषण कौशल्याच्या विकासातून ज्ञान आणि माहितीच्या जोरावर नौकरी सहज मिळू शकतात. विविध क्षेत्रात यशस्वी करिअर करता येते असे गायकवाड यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य जाधव यांनी विद्यार्थ्यांनी आपल्यातील आवडीचे गुण, कला जोपासाव्यात. त्यानुसार महाविद्यालयाच्यावतीने त्यांना प्रोत्सहन मिळेल. महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना नोकरी मिळवून दिली जाईल. यासाठी करिअर काउन्सलिंग, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट सेलच्या संपर्कात राहण्याचे आवाहन केले.

दोन सत्रात झालेल्या या कार्यशाळेत अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रास्ताविक डॉ. हनुमंत जगताप यांनी केले. डॉ.मदन परतूरकर यांनी डॉ.गायकवाड यांचा परिचय करुन दिला. सूत्रसंचालन डॉ.एम.ए. शेख यांनी केले. करिअर काउन्सलिंग,ट्रेनिंग ॲड प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ.रामानंद व्यवहारे यांनी आभार मानले.

दैनिक समर्थ दिलासा

रविवार, दि. ०७ ऑक्टोंबर २०१८ पान नं. ४

# कौशल्याच्या विकासातून नोकऱ्या मिळू शकतात

## शिवाजी महाविद्यालयात डॉ.धनंजय गायकवाड यांचे प्रतिपादन

परभणी,दि.०६(प्रतिनिधी): विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या विविध कौशल्यांच्या विकासातून नोकऱ्या मिळू शकतात. त्याचबरोबर कोणत्याही क्षेत्रात यशस्वी करिअर करता येते, असे प्रतिपादन डॉ. धनंजय गायकवाड यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित मृदू कौशल्य विकास कार्यशाळेत डॉ. गायकवाड बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव हे होते. यावेळी श्री शिवाजी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य बालाजी रेवणवार करिअर कॉन्सलिंग, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट सेलचे डॉ. हनुमंत जगताप, प्रा. लक्ष्मीकांत पोकळे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना गायकवाड पुढे म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्य असतात. त्याचा विकास झाला पाहिजे. म्हणून विद्यार्थ्यांनी सतत चांगल्या गोष्टीचा विचार केला पाहिजे. सकारात्मकता, आदरणीयता आपल्यातील उत्कृष्ट प्रवृत्तींची जोपासणा केली पाहिजे. मोठे स्वप्न पाहून त्यासाठी नियोजनपूर्वक कष्ट केले पाहिजे. संभाषण कौशल्याच्या विकासातून ज्ञान आणि माहितीच्या जोरावर नौकरी सहज मिळू शकतात. विविध क्षेत्रात यशस्वी करिअर करता येते. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य बाळासाहेब जाधव यांनी विद्यार्थ्यांनी आपल्यातील आवडीचे गुण, कला जोपासाव्यात, त्यानुसार




महाविद्यालयाच्या वतीने त्यांना प्रोत्सहन मिळून दिले जाईल. महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांना नौकरी मिळवून दिली जाईल, यासाठी करिअर कॉन्सलिंग, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट सेलच्या संपर्कात राहण्याचे आवाहन केले. दोन सत्रात झालेल्या या कार्यशाळेत अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रास्ताविक डॉ. हनुमंत जगताप यांनी केले. डॉ. मदन परतूरकर यांनी डॉ. गायकवाड यांचा परिचय करुन दिला. सूत्रसंचालन डॉ. एम.ए. शेख यांनी केले. करिअर कॉन्सलिंग,ट्रेनिंग ॲड प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. रामानंद व्यवहारे यांनी आभार प्रदर्शन केले.

सकाळ नांदेड, रविवार, ७ ऑक्टोबर २०१८

# ‘कौशल्याच्या विकासातून नोकऱ्या’

**परभणी, ता. ६ (बातमीदार)** : विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या विविध कौशल्याच्या विकासातून नोकऱ्या मिळू शकतात. त्याचबरोबर कोणत्याही क्षेत्रात यशस्वी करिअर करता येते, असे प्रतिपादन डॉ. धनंजय गायकवाड यांनी बुधवारी (ता.तीन) केले.

श्री. शिवाजी महाविद्यालयात आयोजित मृदू कौशल्य विकास कार्यशाळेत डॉ. गायकवाड बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव हे होते. या वेळी श्री शिवाजी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य बालाजी रेवणवार करिअर कॉन्सलिंग, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट सेलचे डॉ. हनुमंत जगताप, प्रा. लक्ष्मीकांत पोकळे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. डॉ. गायकवाड म्हणाले, प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्य असतात. त्याचा विकास झाला पाहिजे. म्हणून विद्यार्थीनी सतत चांगल्या गोष्टीचा विचार केला पाहिजे.

सकारात्मकता, आदरणीयता आपल्यातील उत्कृष्ट प्रवृत्तींची जोपासणा केली पाहिजे. मोठे स्वप्न पाहून त्यासाठी नियोजनपूर्वक कष्ट केले पाहिजे. संभाषण कौशल्याच्या विकासातून ज्ञान आणि माहितीच्या जोरावर नोकऱ्या सहज मिळू शकतात. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य बाळासाहेब जाधव यांनी विद्यार्थ्यांनी आपल्यातील आवडीचे गुण, कला जोपासाव्यात. त्यानुसार महाविद्यालयाच्या वतीने त्यांना प्रोत्सहन मिळून दिले जाईल असे सांगितले. प्रास्ताविक डॉ. हनुमंत जगताप यांनी केले. डॉ. मदन परतूरकर यांनी डॉ. गायकवाड यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन डॉ. एम.ए. शेख यांनी केले. करिअर कॉन्सलिंग,ट्रेनिंग ॲंड प्लेसमेंट सैलचे समन्वयक डॉ. रामानंद व्यवहारे यांनी आभार प्रदर्शन केले.



**परभणी : शिवाजी महाविद्यालयात आयोजित मृदू कौशल्य विकास कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना डॉ. धनंजय देशमुख व्यासपीठावर प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव व अन्य.**

लोकमत औरंगाबाद, रविवार, दि.७ ऑक्टोबर २०१८

## बोबडे यांना संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता

लोकमत न्यूज नेटवर्क



परभणी : येथील शिवाजी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. जयंत बोबडे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने हिंदी विषयाचे संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली आहे.

हिंदी विषयाशी निगडीत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमधून डॉ. बोबडे यांनी अनेक शोधनिबंधकांचे वाचन केले आहे. विद्यापीठाने त्यांना संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली आहे. पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना ते मार्गदर्शन करणार आहेत.

सकाळ

रविवार, ७ ऑक्टोबर २०१८ | ४

## प्रा. बोबडे यांना मार्गदर्शक म्हणून मान्यता



डॉ.जयंत बोबडे

परभणी : येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील हिंदी विषयाचे प्राध्यापक डॉ. जयंत बोबडे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने हिंदी विषयाचे संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली आहे. ते अनेक वर्षांपासून प्रस्तुत महाविद्यालयात अध्यापणासोबत सांस्कृतिक विभागप्रमुख म्हणून कार्य करत असताना विद्यापीठाच्या युवक महोत्सवाचे सल्लागार म्हणून ही काम पाहत आहेत. हिंदी विषयाशी निगडित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदातून विविध शोधनिबंधाचे त्यांनी वाचन केले आहे. या मान्यतेने ते आता पी.एचडी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

परभणी

६ | सोमवार, दि. ८ ऑक्टोबर २०१८

सामना

## प्रा. डॉ. बोबडे यांना संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील हिंदी विषयाचे प्राध्यापक डॉ. जयंत बोबडे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने हिंदी विषयाचे संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली आहे. त्यामुळे ते आता पीएच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या यशाबद्दल विविध स्तरांतून त्यांचे स्वागत होत आहे.

ऑक्टोबर २०

पुण्य नगरी

रविवार, ७ ऑक्टोबर २०१८ | परभणी

## प्रा.डॉ.बोबडे यांना संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता

परभणी / प्रतिनिधी

येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील हिंदी विषयाचे प्राध्यापक डॉ.जयंत बोबडे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने हिंदी विषयाचे संशोधन मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली आहे. त्यामुळे ते आता पी.एचडी.करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरातून त्यांचे स्वागत होत आहे.

सकाळ
शुक्रवार, १२ ऑक्टोबर २०१८ | ३

# प्राध्यापकांचा संप मागे

परभणी, ता. ११ : एम. फुक्टोच्या बैठकीत शासनाच्या सकारात्मक प्रयत्नांची दखल घेऊन गुरुवार (ता. ११) पासून कामबंद आंदोलन मागे घेत श्री शिवाजी महाविद्यालयातील प्राध्यापक कामावर रुजू झाले आहेत. वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या विविध मागण्यांसाठी एम. फुक्टो संघटनेच्या नेतृत्त्वाखाली राज्यातील प्राध्यापक ता. २५ सप्टेंबरपासून कामबंद आंदोलनात सहभागी झालेले होते. या आंदोलनात श्री शिवाजी महाविद्यालयातील १५ प्राध्यापक सहभागी झालेले होते. दरम्यान बुधवारी मुंबईत झालेल्या बैठकीत शासनाने या मागण्या मान्य केल्यामुळे गुरुवारपासून कामबंद आंदोलन मागे घेण्याचे ठरले.

परभणी-हिंगोली ४ पुढारी | शुक्रवार, १२ ऑक्टोबर २०१८

# डॉ. फिसफिसे रासेयोच्या समन्वयकपदी

**परभणी : प्रतिनिधी**

शहरातील शिवाजी महाविद्यालयातील प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयकपदी निवड झाली आहे. त्यांना नुकतेच या निवडीचे पत्र प्राप्त झाले आहे.

समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. फिसफिसे हे मागील आठ वर्षांपासून रासेयोचे कार्यक्रमाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय रासेयोच्या विविध शिबिरात संघ व्यवस्थापक म्हणून सहभाग घेतला. विविध शिबिरांत जनजागृतीपर व्याख्याने दिली आहेत.

२

शुक्रवार, दि. १२ ऑक्टोबर २०१८
epaper.deshonnati.com

देशोन्नती

# फिसफिसे यांची रासेयोच्या विभागीय समन्वयक पदी निवड



**परभणी :** येथील शिवाजी महाविद्यालयातील प्रा.डॉ. तुकाराम फिसफिसे यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक पदी निवड झाली आहे. नुकतेच त्यांना निवडीचे पत्र प्राप्त झाले आहे. फिसफिसे हे समाजशास्त्र विभाग प्रमुख असून मागील आठ वर्षापासून रासेयोचे कार्यक्रमाधिकारी म्हणुन कार्यरत आहेत. त्यांनी राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय रासेयोच्या विविध शिबीरांमध्ये संघ व्यवस्थापक म्हणुन सक्रीय सहभाग घेतला होता. या निवडीबद्दल म.शि.प्र. मंडळचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य हेमंतराव जामकर, प्राचार्य बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य श्रीनिवास केशेट्टी यांनी अभिनंदन केले.

सकाळ

शनिवार, १३ ऑक्टोबर २०१८ | ४

## प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे यांची निवड

**परभणी, ता. १२ (बातमीदार):** येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयकपदी निवड झाली आहे.

डॉ. फिसफिसे हे समाजशास्त्र विभागप्रमुख असून मागील आठ वर्षांपासून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय विविध शिबिरात संघ व्यवस्थापक म्हणून सक्रिय सहभाग घेतला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांची निवड केली आहे.

शनिवार, दि. १३ ऑक्टोंबर २०१८

दैनिक समर्थ दिलासा

## डॉ.फिसफिसे यांची समन्वयकपदी निवड

**परभणी,दि.१२(प्रतिनिधी):** येथील श्री.शिवाजी महाविद्यालयातीलप्रा.डॉ.तुकाराम फिसफिसे यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागीय समन्वयकपदी निवड झाली. गेल्या आठवर्षापासून ते समाजशास्त्र विभागप्रमुख महाविद्यालयात कार्यरत आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी त्यांचे कार्य उत्कृष्ट ठरले आहे. दरम्यान त्यांच्या या निवडीचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य हेमंत जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विद्या नांदापूरकर आदींनी अभिनंदन केले आहे.

पुण्य नगरी

रविवार, १४ ऑक्टोबर २०१८। परभणी

## प्रा.डॉ.फिसफिसे यांची निवड

परभणी - येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील प्रा.डॉ. तुकाराम फिसफिसे यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातंर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयकपदी निवड झाली आहे. त्यांच्या निवडीबद्दल हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.श्रीनिवास केशट्टी यांनी स्वागत केले.

परभणी Next

पुरोगामी विचाराचे एकमत

१०

परभणी सोमवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०१८

फास्ट न्यूज

## विभागीयसमन्वयकपदी प्रा.डॉ.फिसफिसे

परभणी : येथील शिवाजी महाविद्यालयातील प्रा.डॉ. तुकाराम फिसफिसे यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातंर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयकपदी निवड झाली आहे. त्यांच्या निवडीबद्दल हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.श्रीनिवास केशट्टी यांनी स्वागत केले.

लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि.१६ ऑक्टोबर २०१८

# मार्गदर्शन शिबीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी:** येथील श्री शिवाजी महाविद्यालयात एनसीसी विभागाच्या वतीने ११ ऑक्टोबर रोजी सैन्यभरती मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले.

या कार्यक्रमात कर्नल एस.एस. कालिया यांनी जळगाव येथे होणाऱ्या सैन्य भरतीसंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी उपप्राचार्य डॉ.एस.एन. केशेट्टी, एन.सी.सी. प्रमुख प्रशांत सराफ यांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि. १६ ऑक्टोबर २०१८

# एका महाविद्यालयात ३०० नवमतदारांची नोंद

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी:** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सोमवारी शहरातील शिवाजी महाविद्यालयात राबविण्यात आलेल्या मतदार नोंदणी अभियानांतर्गत ३०० नवीन मतदारांची नोंद झाली आहे.

जिल्ह्यात निवडणूक विभागाच्या वतीने मतदारयादी अद्ययावत व शुद्धीकरण करण्याचा विशेष संक्षिप्त पूर्निक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पुढीलवर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने नवीन मतदारांची नोंदणी, अपात्र मतदारांची वगळणी, मतदार याद्रीतील चुकीच्या तपशिलाची दुरुस्ती आदी कार्यक्रम या अंतर्गत राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने सोमवारी शहरातील शिवाजी महाविद्यालयात मतदार नोंदणी कार्यक्रम राबविण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी पी. शिव शंकर, उपजिल्हाधिकारी माधव किरवले, उपविभागीय अधिकारी डॉ.सूचिता शिंदे, तहसीलदार विद्याचरण कडवकर आदींची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी शिवाजी महाविद्यालय हे मतदार नोंदणीसाठी दत्तक घेतले असल्याचे सांगितले. निवडणूक यंत्रणा ही जिल्ह्यातील प्रत्येक महाविद्यालयामध्ये पोहचणार आहे. तरुण व पात्र मतदारांनी यामध्ये नाव नोंदणी करावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

'कॉलेज- नॉलेज- व्हिलेज' ही संकल्पना प्रत्येक महाविद्यालयामध्ये राबविणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी ३०० नवीन मतदारांनी नोंदणी केली. त्यांना २५ जानेवारी २०१९ रोजी नवीन पीव्हीसी मतदान ओळखपत्र वाटप करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी एनव्हीएसपी या पोर्टलवरही ऑनलाईन नोंदणी करावी, असेही आवाहन करण्यात आले. १ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत ही मोहीम राबविण्यात येणार असून यावेळी तहसीलदार व निवडणुकीचे कर्मचारी महाविद्यालयास भेटी देणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी उपप्राचार्या विजया नांदापूरकर, उपप्राचार्य ए.एन.डहाळे यांनीही मनोगत व्यक्त केले. तसेच विद्यार्थ्यांमधून वैष्णवी राठोड, रामेश्वर वाघ या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन चौधरी यांनी केले. यशस्वीतेसाठी नायब तहसीलदार नंदकुमार भातांब्रेकर, अव्वल कारकून अन्नापुरे, डॉ.सय्यद वसीम आक्रम, शिवशरण शिराळे, पोपडे, वानखेडे, डॉ.आर.बी.टेकाळे, प्रा.आंधळे, प्रा.कुकलारे, प्रा.रेंगे, हनवते, स.रहीम स.मुजीब आदी उपस्थित होते.

दि. १६ ऑक्टोबर २०१८

गोदातीर समाचार

# जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नवीन विद्यार्थी मतदारांची नोंदणी

परभणी/प्रतिनिधी

जिल्ह्यातील प्रत्येक महाविद्यालयातील पात्र मतदारांची मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करुन घेण्याचे काम निवडणुक यंत्रणेकडून सुरू आहे. यासाठी कॉलेज-नॉलेज-व्हिलेज संकल्पना महाविद्यालयामध्ये राबविली जाणार असून नोंदणी झालेल्या पात्र मतदारांना २५ जानेवारी २०१९ रोजी नवीन पीव्हीसी मतदान ओळखपत्राचे वाटप करण्यात येईल. विद्यार्थ्यांनी एनव्हीएसपी पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी पी.शिव शंकर यांनी केले आहे.

श्री शिवाजी महाविद्यालयात निवडणूक विभागामार्फत मतदार नोंदणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी महादेव किरवले, उपविभागीय अधिकारी डॉ.सुचिता शिंदे, तहसिलदार विद्याचरण कडवकर, उपप्राचार्या डॉ.विजया नांदापूरकर आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी श्री शिवाजी महाविद्यालय मतदार नोंदणीसाठी दत्तक घेतल्याचे सांगितले. मतदार नोंदणी मोहिम ३१ ऑक्टोबर पर्यंत राबविण्यात येत असून जिल्ह्यातील महाविद्यालयामध्ये उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, निवडणूक कर्मचारी महाविद्यालयास भेटी देऊन नवीन तरुण व पात्र मतदारांची नोंदणी करुन घेणार असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी महाविद्यालयाचे उपप्राचार्य ए.एन.डहाळे यांनी केले. प्रास्ताविक नितिन चौधरी यांनी केले. विद्यार्थी वैष्णवी राठोड व रामेश्वर वाघ यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

परभणी

पुढारी मंगळवार, १६ ऑक्टोबर २०१८

# नवीन विद्यार्थी मतदारांची नोंदणी

परभणी : जिल्हाधिकारी पी.शिवशंकर यांच्या उपस्थितीत शहरातील श्री शिवाजी महाविद्यालय येथे निवडणूक विभागामार्फत मतदार नोंदणी कार्यक्रम घेण्यात आला. उपजिल्हाधिकारी महादेव किरवले, उपविभागीय अधिकारी डॉ.सुचिता शिंदे, तहसिलदार विद्याचरण कडवकर, उपप्राचार्या डॉ. विजया नांदापूरकर आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी शिवाजी महाविद्यालय हे मतदार नोंदणीसाठी दत्तक घेतल्याचे सांगितले. मोहिम १ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर पर्यंत राबविण्यात येत आहे. प्रास्ताविक उपप्राचार्य ए.एन.डहाळे तर प्रास्ताविक नितिन चौधरी यांनी केले. विद्यार्थी वैष्णवी राठोड व रामेश्वर वाघ यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

पुण्य नगरी
मंगळवार, १६ ऑक्टोबर २०१८ । परभणी

# जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नवीन विद्यार्थी मतदारांची नोंदणी

परभणी / प्रतिनिधी

निवडणूक यंत्रणा ही जिल्ह्यातील प्रत्येक महाविद्यालयामध्ये पोहोचून सर्व तरुण व पात्र मतदारांची मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करुन घेणार आहे. कॉलेज-नॉलेज-व्हिलेज ही संकल्पना प्रत्येक महाविद्यालयामध्ये राबविणार असून नोंदणी झालेल्या तरुण व पात्र मतदारांना २५ जानेवारी २०१९ रोजी नवीन पीव्हीसी मतदान ओळखपत्र वाटप करण्यात येईल. विद्यार्थ्यांना एनव्हीएसपी पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी पी. शिव शंकर यांनी केले.

शहरातील श्री शिवाजी महाविद्यालय येथे निवडणूक विभागामार्फत मतदार नोंदणी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी महादेव किरवले, उपविभागीय अधिकारी डॉ.सुचिता शिंदे, तहसीलदार विद्याचरण कडवकर, उपप्राचार्या



डॉ.विजया नांदापूरकर आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी पी.शिव शंकर यांनी परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालय हे मतदार नोंदणीसाठी दत्तक घेतल्याचे सांगितले. मोहिम १ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबरपर्यंत राबविण्यात येत असून परभणी जिल्ह्यातील प्रत्येक महाविद्यालयामध्ये संबंधित उपविभागाचे अधिकारी तसेच संबंधित तहसीलदार व निवडणूक कर्मचारी हे महाविद्यालयास भेटी देऊन नवीन तरुण व पात्र मतदारांची नोंदणी करुन घेतील असेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य ए.एन.डहाळे यांनी केले. वैष्णवी राठोड व रामेश्वर वाघ यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

सकाळ

शुक्रवार, १९ ऑक्टोबर २०१८ | २

# विद्यार्थ्यांची अनाथ आश्रमाला भेट

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील पदव्युत्तर वर्गाच्या विद्यार्थ्यांनी सहकारनगर, जुना पेडगाव येथील बाल सुधारगृह व अनाथ आश्रमात जाऊन तेथील विद्यार्थ्यांची भेट घेतली. या वेळी अनाथाश्रमाला भारतीय संविधान हा ग्रंथ विभागाच्यावतीने भेट देण्यात आला. या वेळी अधीक्षक उद्धव घुगे यांनी विद्यार्थ्यांना विविध कायदे, आश्रमातील विद्यार्थ्यांचे जीवन, त्यांचे संगोपन इत्यादींबाबतीत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रास्तविक प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी केले. सूत्रसंचालन सुनील लहाने याने केले; तर अशोक जाधव याने आभार मानले. या वेळी श्री. साळवे, प्रा. बडगुजर, प्रा. स्वाती देशमुख, प्रा. अहिल्या अंजनडोहकर, प्रा. सारिका शेट्टे, प्रा. अर्चना बंग यांच्यासह विद्यार्थी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

लोकमत औरंगाबाद, रविवार, दि.२८ ऑक्टोबर २०१८ ४

उत्तम बोरसुरीकर



**मार्गदर्शन :** परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित मुप्टाच्या मेळाव्यात मार्गदर्शन करताना प्रा. सुनील मगरे. समवेत प्रा. अरुणकुमार लेमाडे, प्रा. डॉ. पंचशील एकंबेकर, डॉ.किर्तीकुमार मोरे, डॉ.श्यामसुंदर वाघमारे, मुजाहेद सिद्दीकी, समीउल्ला खान आदी.



परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात जिजाऊ मंदिर निर्मिती संदर्भात आयोजित बैठकीत मार्गदर्शन करताना मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष तहसीलदार विद्याचरण कडावकर. समवेत डॉ.जगन सरकटे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, नवनाथ जाधव, नंदा कुऱ्हे आदी.

लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि.२७ नोव्हेंबर २०१८ ४



परभणी येथे शिवाजी महाविद्यालयात आयोजित व्याख्यान प्रसंगी दीपप्रज्वलन करताना डॉ.आनंद नाडकर्णी. समवेत हेमंतराव जामकर, डॉ.पांडुरंग नावंदर, किरण सोनटक्के, प्राचार्य बाळासाहेब जाधव आदी.

# 'शिवरायांनी राष्ट्रीयतेची जाणीव निर्माण केली'

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी:** पहिले नौदल तयार करुन छत्रपती शिवाजी महाराज यांनी राष्ट्रीयतेची जाणीव निर्माण करुन दिली. अशी जाणीव निर्माण करणारे पहिले राजे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय, असे मत डॉ.आनंद नाडकर्णी यांनी व्यक्त केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित 'शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका: आपत्ती व्यवस्थापन' या विषयावर नाडकर्णी यांनी प्रकाश टाकला. कुठल्याही संकटात नीतीधैर्य खचू न देता पर्यायांची व्यवस्था करुन महाराजांनी बलाढ्य शत्रूंशी झुंज दिली. आग्रा येथून सुटकेसाठी महाराजांनी केलेली व्यूहरचना व दाखविलेले धैर्य जगाच्या पाठीवर एकमद्वितीय होते. महाराजांचे आपत्ती व्यवस्थापन त्यांच्या मानसिक खंबीरपणाचे प्रतीक होते, असे मत नाडकर्णी यांनी व्यक्त केले.

यावेळी हेमंतराव . जामकर, कांतराव देशमुख, डॉ.पांडुरंग नावंदर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, प्रा.किरण सोनटक्के, केशव दुधाटे आदींची प्रमुख उपस्थिती होती. रामप्रसाद देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिवाजी महाविद्यालयातील कर्मचारी आणि वेध समितीच्या सदस्यांनी प्रयत्न केले.

लोकमत औरंगाबाद, बुधवार, दि.२८ नोव्हेंबर २०१८ ४

# विचार, भावना, वर्तन म्हणजे शिक्षण

## व्याख्यान : आनंद नाडकर्णी यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

### प्रवासाचा आनंद घेताना मुक्कामाचे भाव ठेवा

◆ जीवन हा एक प्रवास आहे. जीवन जगत असताना जीवनाचा प्रवास केला जातो. त्याचा आनंद नक्की घ्या; परंतु, या प्रवासादरम्यान येणाऱ्या मुक्कामांचे भान ठेवा, असे आवाहन डॉ.नाडकर्णी यांनी यावेळी व्यक्त केले. जीवनात ध्येय साध्य करण्यासाठी स्वत:कडे काय साधने आहेत, ते समजून घेणेही महत्त्वाचे असल्याचे नाडकर्णी यांनी सांगितले.

परभणी :विचार, भावना व वर्तन म्हणजेच शिक्षण होय; परंतु, शिक्षण घेताना अध्ययन, अध्यापन करताना विचार, भावना व वर्तन यांची व्यापकता वाढावी, हाच शिक्षणाचा हेतु आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ डॉ.आनंद नाडकर्णी यांनी केले.

परभणी येथे श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात २५ नोव्हेंबर रोजी शिक्षकांसाठी प्रेरणादायी हृदयसंवाद कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी नाडकर्णी बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी.पी. पृथ्वीराज यांच्या हस्ते उद्घाटन झाले. कार्यक्रमास प्राथमिक शिक्षणाधिकारी आशा गरुड, उपशिक्षणाधिकारी माधव सलगर, विठ्ठल भुसारे, संजय ससाणे यांची उपस्थिती होती. डॉ.दिलीप श्रृंगारपुतळे यांनी नाडकर्णी यांची मुलाखत घेत विविध विषयांना स्पर्श केला. यावेळी नाडकर्णी म्हणाले, ज्ञान साचून राहत नाही. ते प्रवाही आहे, विद्यार्थी प्रवाही आहे. त्यामुळे शिक्षकांनीही प्रवाही असले पाहिजे. शिक्षकी पेशा हा दिसण्याचा भाग नाही तर तो असण्याचा भाग आहे. शिक्षण देत असताना सहजता यावी, ती कमवावी लागते. यासाठी साधनेची आवश्यकता असून कृती आणि वृत्तीची साधना केली तर सहजवृत्ती निर्माण होऊ शकते, असे ते म्हणाले. माध्यम साक्षरता व सक्षमता व्हायला हवी, असे सांगून 'स्क्रीन डिसिप्लीन'ची सुरुवात कुटुंबापासून करावी, असेही ते म्हणाले. कार्यक्रमास शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत

# हॅलो परभणी

औरंगाबाद, सोमवार, दि.३ डिसेंबर २०१८

**विद्यापीठाचे उपकेंद्र :** येत्या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी

# आंतरराष्ट्रीय भाषा अभ्यासक्रमास मंजुरी

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या परभणी येथील उपकेंद्रात पुढील शैक्षणिक वर्षापासून आंतरराष्ट्रीय भाषा अभ्यासक्रमास विद्यापीठाने मंजुरी दिली असल्याची माहिती आ.डॉ.राहुल पाटील यांनी दिली.

परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात स्वारातीम विद्यापीठाचे उपकेंद्र सुरु करण्यात आले आहे. या केंद्रासाठी विविध अभ्यासक्रमास विद्यापीठाने मंजुरी दिली आहे. या अनुषंगाने उपकेंद्रामध्ये २ डिसेंबर रोजी आ.डॉ.राहुल पाटील यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. यावेळी स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.उद्धवराव भोसले, वनामकृविचे कुलगुरु डॉ.अशोक ढवन, ॲड.अशोक सोनी, डॉ.रमजान मुलानी, डॉ.गोविंद कत्तलाकुटे, डॉ.वसंत भोसले, डॉ.बी.यू. जाधव, डॉ.अंबादास कदम, नारायण चौधरी, अरुण पाटील, संजय गाजरे, संजय डाके, संतोष धामणे आदींची उपस्थिती होती.



परभणी येथील वनाम कृषी विद्यापीठात बैठकीत आ.डॉ.राहुल पाटील, कुलगुरु डॉ.उद्धवराव भोसले, कुलगुरु डॉ.अशोक ढवन, ॲड.अशोक सोनी आदी.

या उपकेंद्रामध्ये २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून स्पॅनिश, फ्रेंच भाषा, डिप्लोमा इन जीएसटी, डिप्लोमा इन सायबर, डिप्लोमा इन शेअर मार्केटिंग, ॲग्रोबेस इंडस्ट्रीज प्रमाणपत्र कोर्स, डिप्लोमा इन डिजॅस्टर मॅनेजमेंट, डिप्लोमा इन इन्व्हॉरमेंट सायन्स हे एक वर्षाचे अभ्यासक्रम सुरु करण्यात येत आहेत. तसेच एम.कॉम. इंग्रजी माध्यम आणि एम.ए. प्रशासकीय सेवा हे अभ्यासक्रमही सुरु करण्यात आले आहेत, अशी माहिती बैठकीत देण्यात आली. या अभ्यासक्रमांसाठी लागणारा प्राध्यापकवर्ग, कर्मचारी आणि भौतिक सुविधा देण्याबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेकडे वर्ग करण्यात आला आहे.

सकाळ

बुधवार, १२ डिसेंबर २०१८



परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने विज्ञान प्रदर्शनात यश मिळविल्याबद्दल यशस्वी संघाचा प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## राज्य विज्ञान प्रदर्शनात श्री शिवाजी महाविद्यालयाचे यश

**परभणी :** औरंगाबाद येथील देवगिरी महाविद्यालयात झालेल्या राज्य पातळीवरील विज्ञान प्रदर्शनात येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने सादर केलेल्या प्रकल्पास चौथे पारितोषिक मिळाले. शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने 'मॅग्नो सोलार एनर्जीकार' हा प्रकल्प सादर केला. या प्रकल्पाचे परीक्षकांसह तज्ज्ञांनी कौतुक केले. संघात समीर गिते, आशीष फुलारी, आदित्य शेवाळे, सिद्धी मगर, ऋतिका उजागरे, गायत्री देशमुख यांचा समावेश होता. संघाला प्रा. राजेश म्हस्के, प्रा. डॉ. बापूसाहेब भोसले यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी संघाचा प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

बुधवार, दि. १२ डिसेंबर २०१८ पान नं. ४

दैनिक समर्थ दिलासा

## विज्ञान प्रदर्शनात शिवाजी महाविद्यालयास चौथे बक्षिस

**परभणी,दि.११(प्रतिनिधी):** औरंगाबाद येथील देवगिरी महाविद्यालयातराज्यपातळीवरील विज्ञान प्रदर्शनात येथील शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने सादर केलेल्या मॅग्नो सोलार एनर्जी कार या प्रकल्पास राज्य पातळीवरील चौथे पारितोषिक मिळाले.

या संघामध्ये समीर राजेश गिते, आशिष मंगेश फुलारी, आदित्य बालाजी शेवाळे, सिध्दी राजेश्वर मगर, ऋतिका रमेश उजागरे, गायत्री बाबाराव देशमुख यांचा समावेश होता. त्यांना प्रा.राजेश म्हस्के, प्रा.डॉ.बापूसाहेब भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. यांत संघाने विज्ञान प्रदर्शनात सादर केलेल्या प्रकल्पाचे परिक्षकांसह तज्ञ मंडळींनी कौतूक केले. हजारों व शिक्षकांनी भेटी दिल्या. या यशाबद्दल मंडळाचे अध्यक्ष प्रकाशराव सोळंके, सरचिटणीस आ.सतिश चव्हाण, सहचिटणीस अनिल नखाते, हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य श्रीनिवा केशेट्टी आदीनी अभिनंदन केले.

सकाळ

शनिवार, ८ डिसेंबर २०१८ | ३

अवतीभवती



परभणीः स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व श्री शिवाजी महाविद्यालय यांच्यावतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन गुरुवारी झाले.

# आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

**परभणी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व श्री शिवाजी महाविद्यालय यांच्यावतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन गुरुवारी (ता. सहा) झाले असून, शनिवारी (ता. आठ) समारोप होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्या डॉ. बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते झाले. या वेळी प्राचार्य डॉ. गौतम वाघमारे, प्रा. सतीश मुंडे, प्रा. के. एल. कदम, प्रा. आर. के. देशमुख, प्रा. डॉ. गणेश सोळंके, मदन ठाकूर उपस्थित होते. परभणी, लातूर, उदगीर, नांदेड या चार झोनमध्ये सुरू झालेल्या स्पर्धेचा समारोप (ता. आठ) होणार आहे. उद्घाटन सामन्यात परभणी संघाने उदगीर संघाचा पराभव केला. पंच म्हणून प्रशांत बोराडे, संदीप ठाकूर, बालाजी कदम, अभिषेक चौधरी, मोहन कुलकर्णी हे काम पाहत आहेत. यशस्वितेसाठी प्रा. संतोष कोकीळ, प्रा. राजेसाहेब रेंगे पुढाकार घेत आहेत.

देशोन्नती २
शनिवार, दि. १५ डिसेंबर २०१८
epaper.deshonnati.com

# विद्यार्थ्यांनी नौकरीसाठी सर्व कौशल्य आत्मसात करावेत- प्राचार्य डॉ.जाधव

**शहर प्रतिनिधी / १४ डिसेंबर**

**परभणी :** नोकरी साठी आवश्यक असलेली सर्व कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करावीत असे आवाहन प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी केले. येथील श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजीत करण्यात आलेल्या कौशल्य विकास कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. जाधव बोलत होते. कार्यक्रमात कौशल्य विकास तज्ञ डॉ.धनंजय गायकवाड, मधुकर कुलकर्णी यांची उपस्थिती होती. मार्गदर्शन करतांना डॉ. जाधव पुढे म्हणाले की, महाराष्ट्र सरकारच्या मोठ्या नोकर भरतीमध्ये मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नौकऱ्या मिळाल्या पाहिजेत. त्यासाठी आवश्यक ते सर्व कौशल्य विकास कार्यशाळा आयोजीत करण्यात आल्या आहेत. शनिवारी सकाळी ९ ते ५ पर्यंत चालणाऱ्या या कार्यशाळेचा लाभ विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे. ५ जानेवारी पर्यंत चालणाऱ्या कार्यशाळेचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. कार्यशाळेत डॉ.धनंजय गायकवाड हे मार्गदर्शन करणार आहेत. जानेवारीत विविध कंपन्यांचे प्रतिनिधी प्लेसमेंटसाठी महाविद्यालयात येणार आहेत. कार्यशाळेतील प्रशिक्षणा नंतर विद्यार्थ्यांना नौकऱ्या सहज मिळू शकतील. त्यामुळे अधिका अधिक विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सहभागी व्हावे असे आवाहन देखील प्राचार्य डॉ. जाधव यांनी केले. कार्यशाळेत ७० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. ही कार्यशाळा श्री शिवाजी महाविद्यालयातील करीअर कौन्सलींग ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलमध्ये आयोजीत कार्यशाळेच्या यशस्वीते साठी समन्वयक डॉ.मदन परतुरकर, डॉ.रामानंद व्यवहारे, डॉ. एम.ए.शेख, डॉ.डी.पी.रोडे, प्रा.ए.एम. भंडारे यांनी परिश्रम घेतले.

गोदातीर समाचार
दि. १६ डिसेंबर २०१८

# साडेगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर

परभणी/प्रतिनिधी

येथील श्री. शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक निवासी शिबीर साडेगाव येथे दि. १५ ते २१ कालावधीत संपन्न होणार आहे. शिबीराचे उद्‌घाटन १५ डिसेंबरला दुपारी ३ वाजता जिल्हा परिषद उपाध्यक्ष भावना नखाते यांच्याहस्ते होणार आहे. यावेळी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, म.शि.म. औरंगाबाद तथा स्था.नि.म.श्री. शिवाजी महाविद्यालयाचे प्रमुख हेमंतराव जामकर अध्यक्षस्थानी असणार आहेत. मंचावर कृषिभूषण कांतराव देशमुख, जि.प. परभणीचे आरोग्य अधिकारी डॉ.बी.एन. शिंदे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.आर.डी. खंदारे, डॉ. शंकरराव देशमुख यांच्यासह स्था.नि.मंडळाचे सदस्य प्रताप देशमुख, निमंत्रीत सदस्य अ‍ॅड. स्वराजसिंह परिहार, केशवअण्णा दुधाटे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, साडेगावचे सरपंच शेषराव भांगे आदी उपस्थित राहणार आहे.

शिबीरादरम्यान नेत्ररोग तपासणी, मोफत महिला आरोग्य तपासणी व उपचार शिबीर, नवचेतना योग शिबीर, रक्तगट व रक्तदाब तपासणी शिबीर, वृक्षारोपण, सामुहिक श्रमदान, शोषखड्‌ड्यांची निर्मिती, जलसाक्षरता, सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण इत्यादी समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे.

शिबीराचा समारोप गुरुवारी (दि.२१) दुपारी १ वाजता तहसीलदार विद्याचरण कडवकर, तालुकाकृषि अधिकारी प्रभाकर बनसावडे, स्वा.रा.ती.म. विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ.डी.डी. पवार आदी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ‍ॅड. बाळासाहेब जामकर आहेत. यावेळी मंचावर स्था.नि.मंडळाचे सदस्य संजयराव नखाते, परमेश्वर जाधव आदी उपस्थित असणार आहेत. या शिबीरामध्ये पदवी स्तरातील ३८ मुली व ७५ मुले सहभागी होणार आहेत. गावकऱ्यांनी गावांच्या सर्वांगीण विकासाकरिता प्रत्यक्ष श्रमदानामध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होवून शिबीरार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन प्राचार्य डॉ.बी.यु. जाधव यांमनी केले आहे.

शिबीराच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी प्रा.प्रल्हाद भोपे, प्रा.डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा.डॉ. दिगंबर रोडे, प्रा. सविता कोकाटे, यांच्यासह गावकरी प्रयत्नशील आहेत.

देशोन्नती २
मंगळवार, दि. १८ डिसेंबर २०१८
epaper:-deshonnati.com

# गुलाबी थंडीत बहरली साडेगावात काव्यसंध्या

## श्री शिवाजी महाविद्यालयाचे रासेयो शिबीर



**परभणी : तालुक्यातील साडेगाव येथे श्री शिवाजी महाविद्यालयाच्या रासेयो शिबीरात आयोजित काव्यसंध्या कार्यक्रमात कविता सादर करतांना उध्दव परभणीकर, प्रा. प्रल्हाद भोपे, प्रा. अर्चना बंग, लक्ष्मण नाईक , प्रा. अहिल्या अंजनडोहकर व इतर.**

**शहर प्रतिनिधी / १७ डिसेंबर**

**परभणी :** तालुक्यातील साडेगाव येथे श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर सुरू असून शिबीरात १६ डिसेंबर रोजी गुलाबी थंडीत कवींनी बहारदार कवितांचे सादरीकरण केले.

कवि सम्मेलनात एका पेक्षा एक अशा कविता सादर करण्यात आल्या. यामध्ये

*राब राब राबणारा बाप माझा आत जळतोय,*
*घरादाराच्या सुखासाठी सुर्यसारखा तळपतोय,*
*वॉट्सअप फेसबुकमध्ये वेळ काहींचा जातो,*
*जीवन जगण्याची कला कोण समजून घेतोय ?*

सध्याचे समाजवास्तव उपरोक्त कवीतेतून कवी परभणीकरांनी मांडले.

धनीन घोरान वाकली, साथी कामान थकली
पोटात नाही कण, तान्ही दुधाला मुकली

ही शेतकरी कुटूंबाची वास्तव व्यथा सांगणारी कवीता प्रा.प्रल्हाद भोपे यांनी सादर केली.

संमेलनात कवी लक्ष्मण नाईक, उध्दव परभणीकर, जगाडे, प्रा.अर्चना बंग, प्रा.अहिल्या अंजनडोहकर, सुर्यवंशी, महेश रेंगे यांनीही आपल्या रचना सादर केल्या. यशस्वीतेसाठी प्रा.तुकाराम फिसफिसे, डॉ.दिगांबर रोडे, प्रा.राजेसाहेब रेंगे, प्रा.किर्तीजय गोरे, सरपंच शेषराव भांगे आदिंनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थी, ग्रामस्थांची उपस्थिती होती.

देशोन्नती
सोमवार, दि. १७ डिसेंबर २०१८

# एकजुटीतूनच गावाचा विकास शक्य - सौ. नखाते



शहर प्रतिनिधी / १६ डिसेंबर

**परभणी :** जगभरातील क्रांती युवकांनीच केलेल्या आहेत. तेव्हा तरूणांच्या गावकऱ्यांच्या एकजूट व सहकार्यातूनच गावांचा विकास शक्य होईल असे प्रतिपादन जिल्हा परिषदच्या उपाध्यक्षा सौ. भावनाताई नखाते यांनी केले.

श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षीक शिबीर उदघाटन प्रसंगी सौ. नखाते बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या की, गावपातळीवर विकासासंदर्भात महीलांच्या सहभाग आज वाढताना दिसतो. अनेक गावाच्या सरपंच महिला असल्यामुळे गावामध्ये परिवर्तन होत आहे. यावेळी त्यांनी राजकीय क्षेत्रातील स्वतला आलेले विविध अनुभव विद्यार्थ्यांना सांगून मुलींनी राजकारणात धडसाने यावे असे आवाहन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. स्वराजसिंह परिहार होते. यावेळी मंचावर सरपंच शेषराव भांगे, शंकर भागवत, कल्याण देवडे, सदाशिव नाईक, जगदीश नवले, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य अप्पाराव डहाळे, मुख्याध्यापक विद्यासागर कांबळे, जनार्धन तरवटे, महेश बोरा, आशाताई नखाते आदिंची उपस्थिती होती. प्रास्तावीक प्रा. प्रल्हाद भोपे यानी तर सुत्रसंचालन प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी केले. आभार प्रा. किर्तीजय गोरे यांनी मानले. प्रा. डॉ. दिगंबर रोडे, प्रा. राजेसाहेब रेंगे, सविता कोकाटे, प्रा. सौ. रोडगे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, गावकरी, विद्यार्थी आदिंची उपस्थिती होती.

सकाळ
बुधवार, १९ डिसेंबर २०१८ | ३

## साडेगावला जनजागृती फेरीने वेधले लक्ष

**परभणी, ता. १८ (बातमीदार)** : श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात साडेगाव (ता. परभणी) येथे मंगळवारी (ता. १८) विद्यार्थ्यांनी गावातून जनजागृती फेरी काढली.

स्वयंसेवकांनी बाजार आणि गावातून सामाजिक समस्यांसंबधी विविध घोषणा देत परिसर दणाणून सोडला. यामध्ये 'पाणी अडवा पाणी जिरवा, बेटी बचाओ बेटी पढाओ, मुलगी शिकली प्रगती झाली' आदी घोषणाफलक घेऊन विद्यार्थी यात सहभागी झाले होते. फेरीत सरपंच शेषराव भांगे, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा. डॉ. दिगंबर रोडे, प्रा. राजेसाहेब रेंगे, प्रा. कीर्तीजंय गोरे, मुख्याध्यापक विद्यासागर कांबळे, बाळासाहेब भांगे, अच्युत तरफडे यांच्यासह शिक्षक उपस्थित होते.

सकाळ
बुधवार, १९ डिसेंबर २०१८ | ४

# प्रश्न ज्यांना पडतात, तेच लिहिते होतात...

## डॉ. दासू वैद्य : पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर, सुधीर फडके जन्मशताब्दी वर्षानिमित्त कार्यक्रम

**परभणी, ता. १८ (बातमीदार) :** आजचा काळ भयंकळ अशा निष्क्रियतेचा काळ आहे. विज्ञानाने मानवी जीवन सुखकारक बनविले असेल तर मानवी यंत्रासारखे बनलेले दिसते. सोशल मीडियाच्या जगात खरी सृजनशीलताच मनुष्य हरवून बसला आहे. संतांनी निर्माण केलेले साहित्य आजही अभंग आहे. जे भवताल पाहून अस्वस्थ होतात. प्रश्न ज्यांना पडतात, तेच लिहीते होतात, असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. दासू वैद्य यांनी व्यक्त केले.

सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य, श्री शिवाजी महाविद्यालय यांच्यावतीने साहित्यिक पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगूळकर, संगीतकार सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सोमवारी (ता. १७) एकदिवसीय साहित्य लेखन, काव्य लेखन व संगीत कार्यशाळा महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडली. या वेळी डॉ. वैद्य बोलत होते.

या वेळी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य हेमंतराव जामकर, साहित्यिक मकरंद जोशी, कवयित्री रमा नाडगौडा, रेणुकादास देशपांडे, प्रा. कृष्णराज लव्हेकर, मयुर काकडे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, प्रा. प्रल्हाद भोपे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना वैद्य म्हणाले, ''लिहिणारा हा केवळ एकटाच नसतो. जीवनातील सत्य मांडत तो जग सुंदर करण्याचा प्रयत्न करतो. साहित्यिकांच्या कल्पनेतूनच जगभरातील शोध लागलेले आहेत.'' निर्मिती प्रक्रिया सांगताना लोककथा चिमणी कावळ्याची सांगून तिचे चिरतंनतत्व सांगीतले. या वेळी प्रास्ताविक प्रा. भोपे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रविशंकर झिंगरे यांनी केले. डॉ. आर. एस. बडुरे यांनी आभार मानले. यशस्वितेसाठी डॉ. विजया नांदारपूरकर, डॉ. एल. एस. राठोड, डॉ. सलीम मोहियोद्दीन, डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. सुरेंद्र येणोरकर, प्रा. सविता कोकाटे आदींनी पुढाकार घेतला.



**परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयात एकदिवसीय साहित्य लेखन, काव्य लेखन व संगीत कार्यशाळा महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडली. या वेळी डॉ. वैद्य बोलत होते.**

दैनिक
समर्थ
दिलासा
वर्ष ४ थे अंक २२
बुधवार, दि. १९ डिसेंबर २०१८

# सोशल मिडीयाच्या विश्वात सृजनशिलताच हरवली !

## ज्येष्ठ साहित्यिक दासू वैद्य यांची खंतः साहित्य लेखनावर शिवाजी महाविद्यालयातील कार्यशाळा



**परभणी,दि.१८(प्रतिनिधी):** विज्ञानाने मानवी जीवन सुखकारक बनविले असेल तर मानवी यंत्रासारखे ते दिसते आहे. सोशल मिडियाच्या जगात खरी सृजनशिलताच मनुष्य हरवून बसला आहे, अशी खंत व्यक्त करीत संतांनी निर्माण केलेले साहित्य आजही अभंग आहेत. अशा प्रकारचा अभंग व सदोदीत टिकणार साहित्य निर्माण करण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला तर जग आणि जगणं अतिशय सुंदर होईल, अशी अपेक्षा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभागाचे ज्येष्ठ साहित्यिक डॉ.दासू वैद्य यांनी मंगळवारी(दि.१८) येथे व्यक्त केली.

शिवाजी महाविद्यालयात एक दिवसीय साहित्य लेखन, काव्यलेखन व संगीत कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. वैद्य बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य हेमंत जामकर होते. साहित्यिक मकरंद जोशी (मुंबई), कवियत्री रमा नाडगौंडा (पूणे), रेणुकादास देशपांडे, प्रा.कृष्णराज लव्हेकर, मयूर काकडे, प्राचार्य डा.बाळासाहेब जाधव, कार्यशाळा समन्वयक प्रा.प्रल्हाद भोपे यांची उपस्थिती होती.

साहित्य, गीत, संगीत हे मनाची दुर्बलता नाहीशी करतात. पु.ल.देशपांडे, गदिमा, सुधीर फडके यांची निर्मिती मनाची दुर्बलता नाहिशी करून जगण सुंदर करणारी आहे. जे भवताल पाहून अस्वस्थ होतात, प्रश्न ज्यांना पडतात. तेच लिहते होतात, असेही मत डा.दासू वैद्य यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक प्रल्हाद भोपे यांनी केले. प्राचार्य डा.जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. उद्घाटनानंतर तीन सभागृहामध्ये चार सत्रात संगीत, काव्यलेखन व लेखन कार्यशाळा घेण्यात आली. डॉ.वैद्य व मकरंद जोशी यांनी साहित्य लेखन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना साहित्य लेखानाचे स्वरूप, निर्मिती प्रक्रिया व परंपरा याबाबत संवाद साधला. काव्य लेखनावर रमा नाडगौंडा व रेणुकादास देशपांडे यांनी तर संगीताचे प्रकार, चालभाव आदी बाबत प्रा.लव्हेकर, मयूर काकडे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचलन प्रा.रवीशंकर झिंगरे यांनी केले. डा.आर.एस.बडुरे यांनी आभार मानले. कार्यशाळेत २१६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

देशोन्नती
बुधवार, दि १९ डिसेंबर २०१८



**परभणी :** श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना डॉ. दासू वैद्य. मंचावर प्रा.डॉ. बाळासाहेब जाधव व इतर.

# प्रश्न ज्यांना पडतात तेच लिहिते होतात - डॉ. दासू वैद्य

**शहर प्रतिनिधी / १८ डिसेंबर**

**परभणी :** सोशल मिडीयाच्या जगात खरी सृजनशिलताच मनुष्य हरवून बसला आहे. संतांनी निर्माण केलेले साहित्य आजही अभंग आहे. अशा प्रकारचा अभंग व सदोदित. टिकणारं निर्माण करण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला तर जग आणि जगणं अतिशय सुंदर होईल. जे भवताल पाहून अस्वस्थ होतात. ज्यांना प्रश्न पडतात तेच लिहिते होतात असे प्रतिपादन जेष्ठ साहित्यीक डॉ. दासू वैद्य यांनी केले.

ते श्री शिवाजी महाविद्यालयात पु.लं.देशपांडे, ग.दि. माडगुळकर, सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने सांस्कृतिक कार्य संचालनालय व श्री शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत साहित्य लेखन, काव्य लेखन व संगीत कार्य शाळेत मार्गदर्शन करतांना बोलत होते. उद्घाटकीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हेमंतराव जामकर, मार्गदर्शक साहित्यीक मकरंद जोशी, रमा नाडगौडा, रेणुकादास देशपांडे, प्रा. कृष्णराज लव्हेकर, मयुर काकडे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, प्रा. प्रल्हाद भोपे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते पु.लं.देशपांडे, ग.दि. माडगुळकर, सुधीर फडके यांच्या प्रतिमेचे पुजन करुन दिपप्रज्वलनाने कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. प्रल्हाद भोपे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रवीशंकर झिंगरे तर आभार प्रदर्शन डॉ. आर. एस. बडुरे यांनी केले. कार्यशाळेत सहभागी प्रशिक्षणार्थ्यांस प्रमाणपत्र देण्यात आले. यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, प्रा. प्रल्हाद भोपे, उपप्राचार्या डॉ. विजया नांदापूरकर, प्रा. रवी शंकर झिंगरे, डॉ. एल. एस. राठोड, डॉ. सलीम मोहियोद्दिन, डॉ. आर. एस. बडुरे, डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. सुरेंद्र येनोरकर, प्रा. सविता कोकाटे, डॉ. परिमल सुतवने, प्रा. देविदास रिठे, डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा. रामप्रसाद देशमुख, डॉ. उत्कर्ष किट्टेकर, प्रा. राजेसाहेब रेंगे, डॉ. गौरव राठोड, प्रा. ऋतुजा बनकर, साहेब यल्लेवाड, गणेश गरुड, सुरेश पेदापल्ली, सागर खुने, दासू वैद्य आदींनी परिश्रम घेतले.

बुधवार, दि. १९ डिसेंबर २०१८ २
epaper.deshonnati.com
देशोन्नती

# रासेयो स्वयंसेवकांनी काढली जनजागृतीपर प्रभातफेरी

## साडेगावात श्री शिवाजी महाविद्यालयाचे रासेयो शिबीर

वार्ताहर / १८ डिसेंबर

**साडेगाव :** येथे श्री शिवाजी महाविद्यालयाच्या व जिल्हा परिषद शाळा साडेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेंच्या शिबीराच्या चौथ्या दिवशी गावातून जनजागृती प्रभातफेरी काढण्यात आली.

शिबीराच्या निमित्ताने काढण्यात आलेल्या या प्रभातफेरीत विद्यार्थ्यांनी सामाजीक समस्यांसंबंधी विविध घोषणा देवून परिसर दणाणून सोडला. पाणी आडवा, पाणी जीरवा, बेटी बचाओ, बेटी पढाओ, दारुने झिंगला, संसार भंगला, जगाचा पोशिंदा जगलाच पाहिजे आदी विषयांवर घोषणा देण्यात आल्या. यावेळी उपस्थित गावऱ्यांना व विद्यार्थ्यांना सामुहिक स्वच्छतेची शपथ देण्यात आली. प्रभातफेरीमध्ये सरपंच शेषराव भांगे, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा. डॉ. दिगंबर रोडे, प्रा. राजेसाहेब रेंगे, प्रा. किर्तीजय गोरे, मुख्याध्यापक विद्यासागर कांबळे, बाळासाहेब भांगे, अच्युत तरफडे आदी सहभागी झाले होते.



**साडेगाव :** येथे सुरु असलेल्या रासेयो शिबीरात चौथ्या दिवशी जनजागृतीपर प्रभातफेरी काढण्यात आली.

पुण्य नगरी
गुरुवार,२० डिसेंबर २०१८ । परभणी

# 'प्रश्न ज्यांना पडतात तेच लिहिते होतात'

परभणी / प्रतिनिधी

आजचा काळ भयंकर अशा निष्क्रियतेचा काळ आहे. विज्ञानाने मानवी जीवन सुखकारक बनविले असेल तर मानवी यंत्रासारखे बनलेले दिसत आहे. सोशल मीडियाच्या जगात खरी सृजनशिलताच मनुष्य हरवून बसला आहे. संतांनी निर्माण केलेले साहित्य आजही अभंग आहे, अशा प्रकारचे अभंग व सदोदित टिकणारे निर्माण करण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला तर जग आणि जगणं अतिशय सुंदर होईल. साहित्य, गीत, संगीत हे मनाची दुर्बलता नाहीशी करतात. साहित्यिक पु.ल.देशपांडे, ग.दी.मा., सुधीर फडके यांची निर्मिती मनाची दुर्बलता नाहीशी करून जगणे सुंदर करणारी आहे. जे भवताल पाहून अस्वस्थ होतात, प्रश्न ज्यांना पडतात तेच लिहिते होतात, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यक डॉ. दासू वैद्य यांनी केले.

सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई महाराष्ट्र राज्य व श्री शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी हेमंत जामकर होते. व्यासपीठावर मकरंद जोशी, रमा नाडगौडा, रेणुकादास देशपांडे, प्रा. कृष्णराज लव्हेकर, मयूर काकडे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, प्रा.प्रल्हाद भोपे यांची उपस्थिती होती.

डॉ. प्रल्हाद भोपे म्हणाले, लिहिणारा हा केवळ एकटाच नसतो तर जीवनातील सत्व तो मांडत तो जग सुंदर करण्याचा प्रयत्न करतो. साहित्यिकांच्या कल्पनेतूनच जगभरातील शोध लागलेले आहेत. पुरुषापेक्षा स्त्री ही प्रयोगशील असून खरी कल्पक व सृजनशील ती आहे. तिची प्रत्येक कृती नाविण्यपूर्णच असते. तिची निर्मिती समाजाच्या हिताची असते. म्हणूनच तर तिला घरवाली म्हणतात. पुरुषास घरवाला म्हणत नाहीत. निर्मिती प्रक्रिया सांगताना त्यांनी लोककथा चिमणी कावळ्यांची सांगून तिचे चिरंतन तत्व सांगितले. ज्ञानेश्वरीतील निर्मितीबाबतचे दृष्टांत त्यांनी सांगितले. साहित्य इंद्रिय संवेदना देते. या संवेदना आपणास निसर्ग देतो तेव्हा समस्येचे निराकरण निसर्ग करतो. त्याकडे डोळसपणे पाहायला शिका, असे ते म्हणाले. या संगीत कार्यशाळेत ९१ विद्यार्थी तर काव्यलेखन कार्यशाळेत ७० व लेखन कार्यशाळेत ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ. विजया नांदापूरकर, प्रा.रवीशंकर झिंगरे, डॉ.एल.एस.राठोड, डॉ.सलीम मोहियोद्दिन, डॉ.आर.एस.बडुरे, डॉ. रोहिदास नितोडे, डॉ. सुरेंद्र येणोरकर, प्रा.सविता कोकाटे, डॉ. परिमल सुतवणे, प्रा. देवीदास रिठे, डॉ.तुकाराम फिसफिसे, प्रा.रामप्रसाद देशमुख, डॉ.उत्कर्ष किट्टेकर, प्रा.राजेसाहेब रेंगे, डॉ. गौरव राठोड, प्रा. ऋतुजा बनकर, यल्लेवाड, गणेश गरुड, सुरेश पैदापल्ली, सागर खुणे, दासू वैद्य यांनी पुढाकार घेतला.

देशोन्नती गुरुवार, दि २० डिसेंबर २०१८

# कॅशलेस व्यवहार देशाच्या विकासासाठी महत्वाचे - प्रा.डॉ. भालेराव

## साडेगाव येथे रासेयो शिबीरास प्रतिसाद

**शहर प्रतिनिधी** / १९ डिसेंबर

**परभणी :** तालुक्यातील साडेगाव येथे रासेयो शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा.डॉ. रमेश भालेराव म्हणाले की, आधुनीक काळात शासनाने कॅशलेस व्यवहाराला प्राधान्य दिलेले आहे. असे कॅशलेस व्यवहार देशाच्या विकासासाठी महत्वाचे आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डी.व्ही. आंधळे मंचावर प्रा.पी.एन.मोरे, प्रा.के.एल.कदम, प्रा.दिपक पिराणे, कार्यक्रमाधिकारी तुकाराम फिसफिसे, प्रा.डॉ.दिगंबर रोडे, प्रा.राजेसाहेब रेंगे आदिंची उपस्थिती होती. सुत्रसंचालन आनंद भालेराव तर आभार आकाश बाबर यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांसह गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



**परभणी :** तालुक्यातील साडेगाव येथे रासेयो शिबीरात मार्गदर्शन करतांना प्रा.डॉ. रमेश भालेराव व उपस्थित मान्यवर.

लोकमत औरंगाबाद, शुक्रवार, दि. २१ डिसेंबर २०१८ ४

परभणीत कार्यशाळा : दासू वैद्य यांचे प्रतिपादन

# साहित्य, संगीत मनाची दुर्बलता दूर करतात

लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी : विज्ञानाने मानवी जीवन सुखकर बनविले. असे असताना मानव यंत्रासारखा झाल्याचे दिसत आहे. सोशल मीडियाच्या जगात आपण खरी सृजनशीलता हरवून बसलो आहोत. संतांनी निर्माण केलेले साहित्य आजही अभंग आहे. साहित्य, संगीत हे मनाची दुर्बलता नाहीशी करतात, असे सांगून अशा प्रकारचे सदोदीत टिकणारे साहित्य प्रत्येकाने निर्माण केले तर जग सुंदर होईल, असे प्रतिपादन साहित्यिक डॉ. दासू वैद्य यांनी केले.



ज्येष्ठ साहित्यिक पू.ल. देशपांडे, ग.दि. माडगूळकर, सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई आणि श्री शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने नुकतीच एक दिवसीय कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेत वैद्य मार्गदर्शन करीत होते. अध्यक्षस्थानी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य प्रमुख हेमंतराव जामकर तर प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक मकरंद जोशी, कवयत्री रमा नाडगौडा, रेणुकादास देशपांडे, प्रा. कृष्णराज लव्हेकर, मधुकर काकडे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, प्रा. प्रल्हाद भोपे यांची उपस्थिती होती. प्रारंभी भोपे यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळेच्या उद्घाटनानंतर तीन सभागृहामध्ये संगीत, काव्यलेखन, लेखन कार्यशाळा पार पडली. डॉ. दासू वैद्य, मकरंद जोशी यांनी मार्गदर्शन केले. साहित्य लेखनाचे स्वरुप, निर्मिती प्रक्रिया, परंपरा, प्रशिक्षणार्थींची निर्मिती याबाबत त्यांनी संवाद साधला.

## २१६ प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा कार्यशाळेत सहभाग

◆ शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यशाळेमध्ये एकूण २१६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यात संगीत कार्यशाळेत ९१, काव्यलेखन कार्यशाळेत ७० आणि लेखन कार्यशाळेत ५५ विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यशाळे दरम्यान प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा सादर केला. तसेच शिवाजी महाविद्यालयाला कार्यशाळा घेण्याची संधी दिल्याबद्दल संयोजकांचे आभार मानले.

काव्यलेखन कार्यशाळा कवयत्री रमा नाडगौडा, रेणुकादास देशपांडे यांनी घेतली. संगीत कार्यशाळेत प्रा. कृष्णराज लव्हेकर, मयूर काकडे यांनी गीतांचे प्रकार, चाल, भाव आदी विषयी विद्यार्थ्यांत संगीताबाबत गोडी निर्माण केली. डॉ. आर.एस. बडुरे यांनी आभार मानले. प्रा. रविशंकर झिंगरे यांनी सूत्रसंचालन केले. यशस्वीतेसाठी उपप्राचार्या डॉ. विजया नांदापूरकर, प्रा. रविशंकर झिंगरे, डॉ. एल.एस. राठोड, डॉ. सलीम मोहीयोद्दीन, डॉ. आर.एस. बडुरे, डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. सुरेंद्र यनोरकर, प्रा.कविता कोकाटे, डॉ. परिमल सुतवने, डॉ. देविदास रिठे, डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा. रामप्रसाद देशमुख, डॉ. उत्कर्ष किट्टेकर, प्रा. राजेसाहेब रेंगे, डॉ. गौरव राठोड, प्रा. ऋतूजा वनकर, साहेब यल्लेवाड, गणेश गरुड, सुरेश पेदापल्ली, आदींनी प्रयत्न केले.

परभणी, शनिवार, दि. २२ डिसेंबर २०१८

उपस्थित होते.

वाणिज्य वार्ता



परभणी येथील शिवाजी महाविद्यालयात अनिल नखाते यांचा सत्कार करताना माजी मंत्री प्रकाश सोळंके. समवेत रमेशराव शेरे, नारायण चौधरी, रणजित काकडे, परमेश्वर जाधव, संचालक आनंद पाथरीकर, प्राचार्य शाहीद ठेकिया.

# अनिल नखाते यांचा सत्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** वाल्मिकी बँकेची पद्मभूषण कै. वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी सहकारी बँक या पुरस्कारांसाठी निवड झाली आहे. याबद्दल बँकेचे चेअरमन तथा महाराष्ट्र शिक्षण मंडळाचे सहसचिव अनिल नखाते यांचा माजी मंत्री प्रकाश सोळंके यांच्या हस्ते गुरुवारी सत्कार करण्यात आला.

यावेळी रमेशराव शेरे, नारायण चौधरी, रणजित काकडे, परमेश्वर जाधव, संचालक आनंद पाथरीकर, प्राचार्य शाहीद ठेकिया यांची उपस्थिती होती. यावेळी अनिल नखाते म्हणाले, दी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशन मुंबई यांनी औरंगाबाद विभागातून पद्मभूषण कै. वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी सहकारी बँक पुरस्कारासाठी पाथरी येथील वाल्मिकी बँक को. ऑप. बँकेची निवड केली आहे.

हे यश संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी आणि ग्राहकांचे असून या पुढील काळातही बँकेकडून ग्राहकांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध दिल्या जातील, असे त्यांनी सांगितले.

लोकमत औरंगाबाद, शनिवार, दि.२२ डिसेंबर २०१८ २



ग्रंथ भेट : परभणी येथे शांतीदूत सेवाभावी संस्थेच्या वतीने शिवाजी महाविद्यालयासाठी विविध ग्रंथ व अभ्यासक्रमातील पुस्तके प्राचार्य बाळासाहेब जाधव यांच्याकडे सुपूर्द करताना सुभाषचंद्र सारडा, डॉ. दिनेश भुतडा, प्राचार्य सुरेश नाईकवाडे, केशव सारडा आदी.

# 'शांतीदूत'तर्फे शिवाजी महाविद्यालयास ग्रंथांची भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी** : येथील शांतीदूत सेवाभावी संस्थेच्या वतीने शिवाजी महाविद्यालयाच्या ग्रंथालयास विविध पुस्तके व ग्रंथांची भेट देण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य बाळासाहेब जाधव होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून 'शांतीदूत'चे संस्थापक अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा, सचिव डॉ.दिनेश भुतडा, प्राचार्य सुरेश नाईकवाडे उपस्थित होते. शिवाजी महाविद्यालयातील विविध शाखांच्या विद्यार्थ्यांना उपयोगी असे कला, क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक, विज्ञान, वाणिज्य, अध्यात्मिक तसेच स्पर्धा परीक्षांना उपयोगी असे पुस्तके व ग्रंथ प्राचार्य जाधव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. दिनेश भुतडा यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य बाळासाहेब जाधव यांनी अध्यक्षीय समारोप केला. ग्रंथपाल टेकाळे यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमास वैद्य, केशव सारडा यांच्यासह विद्यार्थी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ
रविवार, २३ डिसेंबर २०१८ २

## शिवाजी महाविद्यालयास ग्रंथदान

परभणी : शहरातील श्री. शिवाजी महाविद्यालयातील ग्रंथालयास शांतिदूत सेवाभावी संस्थेच्या वतीने विविध पुस्तके व ग्रंथ भेट देण्यात आल्याची माहिती शुक्रवारी (ता.२१) दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव होते. शांतिदूतचे संस्थापक अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा, सचिव डॉ. दिनेश भुतडा, प्राचार्य सुरेश नाईकवाडे, केशव सारडा, वैद्य उपस्थित होते. ग्रंथपाल श्री. टेकाळे यांनी प्रास्ताविक केले.

शनिवार, दि २२ डिसेंबर २०१८ ४
epaper.deshonnati.com
देशोन्नती

# शांतीदूतच्या वतीने शिवाजी महाविद्यालयास ग्रंथदान



परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयास शांतीदुतच्या वतीने ग्रंथभेट देण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, सुभाषचंद्र सारडो, दिनेश भुतडा, प्राचार्य सुरेश नाईकवाडे, टेकाळे व इतर.

शहर प्रतिनिधी / २१ डिसेंबर

परभणी : येथील शांतीदुत सेवाभावी संस्थेच्या वतीने वसमत रोडवरील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या ग्रंथालयास विविध पुस्तक व ग्रंथांची भेट देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य बाळासाहेब जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून शांतीदुतचे संस्थापक अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा, डॉ. दिनेश भुतडा, प्राचार्य सुरेश नाईकवाडे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक ग्रंथपाल टेकाळे यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. इनेश भुतडा, वैद्य, केशव सारडा, महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

शनिवार, दि. २२ डिसेंबर २०१८ पान नं. ४
समर्थ दिलासा

## शिवाजी महाविद्यालयास ग्रंथदान



**परभणी,दि.२१(प्रतिनिधी):** येथील शांतीदूत सेवाभावी संस्थेच्या वतीने श्री शिवाजी महाविद्यालयाच्या ग्रंथलयास बिविध पुस्तकांचे व ग्रंथाची भेट देण्यात आली. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब जाधव हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शांतीदूतचे संस्थापक अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा, सचिव डॉ.दिनेश भूतडा, प्राचार्य सुरेश नाईकवाडे उपस्थित होते. शिवाजी महाविद्यालयातील विविध शाखांच्या विद्यार्थ्यांना उपयोगी असे कला, क्रीडा, स्पर्धा, सांस्कृतीक , विज्ञान, वाणिज्य, अध्यात्मीक तसेच स्पर्धा परिक्षांना उपयोगी असे पुस्तक व ग्रंथांच्या संचाचे भेट प्राचार्य जाधव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्तावीक ग्रंथपाल टेकाळे यांनी केले. या कार्यक्रमास डॉ.ईनेश भुतडा, वैद्य, केशव सारडा यांच्यासह विद्यार्थी, ग्रंथालयातील कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

सकाळ
शनिवार, २२ डिसेंबर २०१८ | ४

# युवकांची भूमिका ग्राम विकासात महत्त्वाची

परभणी, ता. २१ : ग्राम विकासातून राष्ट्रविकास घडतो. ग्राम विकासात युवकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन ॲड. बाळासाहेब जामकर यांनी शुक्रवारी (ता. २१) केले.

साडेगाव (ता. परभणी) येथे श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या समारोप कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव होते; तर सरपंच शेषराव भांगे, माजी सरपंच गंगाधरराव मोरे, मुख्याध्यापक विद्याचरण कांबळे, उपप्राचार्य बाबूराव पंतगे, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा. प्रल्हाद भोपे मंचावर उपस्थित होते. या वेळी गोविंद पोंढे यांनी कवितेद्वारे विद्यार्थ्यांनी सात दिवस केलेल्या कार्याचा आढावा घेतला. प्रा. भोपे यांनी प्रास्तावीक केले; तर प्रा. कीर्तीजय गोरे यांनी सूत्रसंचालन केले; तर प्रा. डॉ. दिगंबर रोडे यांनी आभार मानले.

देशोन्नती २
शनिवार, दि. २२ डिसेंबर २०१८
epaper.deshonnati.com



धर्मापुरी : येथून जवळच असलेल्या साडेगांव येथे श्री शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने रासेयो शिबीर समारोप प्रसंगी मार्गदर्शन करतांना ॲड.बाळासाहेब जामकर, मंचावर प्रचार्य डॉ.जाधव, गंगाधर मोरे, विद्याचरण कांबळे, बाबुराव पतंगे, प्रा.डॉ.फिसफिसे, प्रा.प्रल्हाद भोपे आदि

# ग्रामविकासात युवकांची भूमिका महत्वाची - ॲड.बाळासाहेब जामकर

वार्ताहर/ २० डिसेंबर

धर्मापुरी : ग्रामविकासातुन राष्ट्रविकास घडतो या ग्रामविकासात युवकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन ॲड.बाळासाहेब जामकर यांनी केले.

ते साडेगाव येथे श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीराच्या समारोप कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.ते पुढे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरातुन नेतृत्व विकसीत होऊन हेच नेतृत्व गावाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वाचे असते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव होते. सरपंच शेषराव भांगे,माजी सरपंच गंगाधरराव मोरे, मुख्याध्यापक विद्याचारण कांबळे, उपप्राचार्य बाबुराव पंतगे, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.तुकाराम फिसफिसे, प्रा.प्रल्हाद भोपे तसेच ग्रामपंचायत सदस्य मंचावर उपस्थित होते.यावेळी गोविंद पोंढे आणि विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या गटाला व स्वंयसेवकाला मान्यवरांच्या हस्ते बक्षिस देवुन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात सुरुवातीला प्रा.भोपे यांनी सात दिवसातील केलेल्या कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.किर्तीजंय गोरे यांनी केले. तर आभार प्रा.डॉ.दिगंबर रोडे यानी मानले. यावेळी शिक्षक,प्राध्यापक, विद्यार्थी यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.तुकाराम फिसफिसे, प्रा.प्रल्हाद भोपे, प्रा.सविता कोकाटे, प्रा.राजेसाहेब रेंगे, अच्युत तरफडे,दासु मस्के,शेख समद, योगेश देशमुख आदीनी प्रयत्न केले.

# परभणी

पुढारी शनिवार, २२ डिसेंबर २०१८

## शिबिराची सांगता

**आसेगाव : प्रतिनिधी**

परभणीतील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचा साडेगाव येथे समारोप करण्यात आला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव होते. याप्रसंगी सरपंच शेषराव भांगे, माजी सरपंच गंगाधरराव मोरे, मुख्याध्यापक विद्याचरण कांबळे, उपप्राचार्य बाबूराव पंतगे, कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा.प्रल्हाद भोपे मंचावर उपस्थित होते. यावेळी गोविंद पोंढे यांनी या कवितेव्दारे विद्यार्थ्यांनी सात दिवस केलेल्या कार्याचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनीही मनोगत मांडले. सुत्रसंचलन प्रा.किर्तीजंय गोरे तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ. दिगंबर रोडे यांनी केले. शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

नांदेड /शनिवार, दि. २२ डिसेंबर २०१८
देशोन्नती

# शिवाजी महाविद्यालयात अनिलराव नखाते यांचा गौरव

**जिल्हा प्रतिनिधी / २१ डिसेंबर**

**परभणी :** शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयात मशिप्र मंडळांचे अध्यक्ष माजी मंत्री प्रकाश सोळंके यांच्या उपस्थितीत नुकताच गौरव सोहळा घेण्यात आला. वाल्मिक बँकेस पद्मभूषण कै. वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी बँक हा पुरस्कार मिळाल्याबद्दल चेअरमन अनिलराव नखाते यांचा सत्कार करण्यात आला.

या गौरव सोहळयास रमेशराव शेरे, इंजि. नारायण चौधरी, रणजीत काकडे, परमेश्वर जाधव, संचालक आनंद पाथ्रीकर, प्राचार्य शाहिद ठेकिया आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सत्काराला उत्तर देताना अनिलराव नखाते म्हणाले की, १०० कोटी रुपयांच्या ठेवी असलेल्या बँकांना महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोशिएशन तर्फे दिलेल्या जाणाऱ्या कै. वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी बँक पुरस्कारासाठी औरंगाबाद विभागातून निवड केली आहे. हे यश संचालक अधिकारी, कर्मचारी आणि ग्राहकांचे असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ
मंगळवार, २५ डिसेंबर २०१८ | ४

# हमीद - द अनसंग ह्युमनिस्टचे सादरीकरण

## माहितीपटाचा रसिकांनी घेतला रसस्वाद; परभणी फिल्म क्लबचा उपक्रम; सहदिग्दर्शक बर्वे यांनी साधला संवाद

**परभणी, ता. २४ (बातमीदार) :** परभणी फिल्म क्लबच्या चित्रपट रसस्वाद कार्यक्रमात थोर समाजसुधारक हमीद दलवाई यांच्या जीवनकार्यावर आधारित 'हमीद -द अनसंग ह्युमनिस्ट' या माहितीपटाचे सादरीकरण रविवार (ता. २३) करण्यात आले.

कैझन पिक्चर्स,, परभणी, अरभाट फिल्म क्लब,, पुणे, श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी आणि ज्ञानसाधना प्रतिष्ठान,, परभणी यांच्या सयुंक्त विद्यमाने सुरू असलेल्या परभणी फिल्म क्लबचे १८ वे पुष्प रविवारी शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडले.

त्या निमित्ताने प्रमुख पाहुणे कवी प्रा. इंद्रजित भालेराव, प्राचार्य डॉ. बी. यू. जाधव, ज्ञानसाधना प्रतिष्ठानचे शिवसांभ सोनटक्के व हमीद या माहितीपटाचे सहदिग्दर्शक ओमकार बर्वे उपस्थित होते.

प्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ व लेखक रामचंद्र गुहा यांनी हमीद दलवाई यांचा आधुनिक भारताचा शिल्पकार म्हणून उल्लेख केला आहे. तरी सुद्धा हा महानायक जनसामान्यांपर्यंत पोचला नाही, याची खंत प्रा. इंद्रजित भालेराव यांनी व्यक्त केली. तसेच हा माहितीपट जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचावा, अशी अपेक्षासुद्धा व्यक्त केली.

या माहितीपटाद्वारे दिग्दर्शक ज्योती सुभाष यांनी नसिरुद्दीन शहा, अमृता सुभाष, हमीद दाभोळकर, क्षीतिज दाते यांच्या माध्यमातून हमीद दलवाई या थोर समाजसुधारक, लेखक आणि विचारवंतांच्या संपूर्ण जीवनकार्यावर आणि त्यांच्या साहित्यावर प्रकाश टाकला आहे.

माहितीपटाच्या सादरीकरणानंतर सहदिग्दर्शक ओमकार बर्वे यांनी प्रेक्षकांशी मुक्त सवांद साधला व त्यांच्या प्रश्नांची उत्तरे पण दिली. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. भगवान काळे यांनी केले. प्रास्ताविक रवि पाठक यांनी केले. कार्यक्रमासाठी अतुल साळवे, सोहम खिल्लारे, आदर्श कवळीकर, चकोर किनगावकर, गजानन नाल्टे, रोहन पाटील, लखन सोनावणे, ऐश्वर्या डावरे आदींनी मेहनत घेतली.



**परभणी :** हमीद- द अनसंग ह्युमनिस्ट, परभणी फिल्म क्लबच्या कार्यक्रमामध्ये सादरीकरण झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना ओमकार बर्वे, प्राचार्य डॉ. बालासाहेब जाधव, प्रा. इंद्रजित भालेराव, शिवसांभ सोनटक्के, रवि पाठक आदी.

देशोन्नती शुक्रवार, दि २८ डिसेंबर २०१८

# टाटा सर्व्हीसेसच्या प्रशिक्षणासाठी १७० विद्यार्थिनीची निवड

■ श्री शिवाजी महाविद्यालयाचा उपक्रम

■ होतकरु मुलींना मिळणार रोजगार

*जिल्हा प्रतिनिधी / २७ डिसेंबर*

**परभणी :** प्लेसमेंटद्वारे विद्यार्थिनीना नोकरी मिळवून देण्यासाठी टाटा सर्व्हिसेसद्वारे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणासाठी शिवाजी महाविद्यालयाच्या १७० विद्यार्थिनींची निवड करण्यात आली आहे.

मशिप्र मंडळाचे सरचिटणीस आ. सतीश चव्हाण, अध्यक्ष प्रकाश सोळंके, हेमंतराव जामकर आदींच्या पुढाकारातून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. निवड झालेल्या विद्यार्थिनीना टाटा कन्सल्टन्सीचे प्रशिक्षक ऋषिकेश भागवतकर हे प्रशिक्षण देणार आहेत. प्राचार्य बी.यु. जाधव यांच्याहस्ते नुकतेच या प्रशिक्षणवर्गाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य केशव दुधाटे, डॉ.रोहीदास नितोंडे, डॉ. हनुमंत जगताप आदींची प्रमुख उपस्थिती होती. जानेवारी २०१९ मध्ये टाटा कंपनीचे विविध ग्रुप व इतर कंपन्यांही शिवाजी महाविद्यालयात प्लेसमेंटसाठी येणार आहेत. त्यामुळे या प्रशिक्षणात सहभागी विद्यार्थिनींना गुणवत्तेनुसार नोकरीची संधी मिळणार असल्याचे प्राचार्य डॉ. जाधव यांनी सांगितले.

पुण्य नगरी
शुक्रवार, २८ डिसेंबर २०१८ । परभणी- हिंगोली

# विद्यार्थिनींना नोकरीसाठी प्रशिक्षण सुरू

परभणी/ प्रतिनिधी

प्लेसमेंटव्दारे नोकऱ्या मिळवून देण्यासाठी श्री शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थिनींना टाटा कन्सलटन्सी सर्विसेसव्दारे प्रशिक्षण देण्यात येत आहे. महिनाभर दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणात दीडशेहून अधिक विद्यार्थिनींचा सहभाग आहे.

या प्रशिक्षणाचे उद्घाटन प्राचार्य बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. यावेळी केशव दुधाटे, डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. हनुमंत जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रशिक्षणात १७० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला आहे. ऋषीकेश भागवतकर विद्यार्थिनींना प्रशिक्षण देत आहेत. मराठा शिक्षण प्रसारक मंडळाने विविध कंपन्याबरोबर प्लेसमेंटसाठी करार केले आहेत. याचा फायदा विद्यार्थ्यांना होणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी दिली. विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ.हनुमंत जगताप, डॉ.रामानंद व्यवहारे, डॉ.मदन परतुरकर, डॉ.एम.ए.शेख, प्रा.आर.आर.मिस्त्री, प्रा.अभिजित भंडारे, डॉ.दिगंबर रोडे, प्रा.लक्ष्मीकांत पोकळे यांनी केले आहे.

# जिल्हा संस्था महामंडळाची बैठक आज

परभणी / प्रतिनिधी

जिल्हा संस्था महामंडळाची बैठक शुक्रवारी (दि.२८) दुपारी २ वाजता शहरातील जिंतूर रोडवरील महात्मा फुले विद्यालयात आयोजित करण्यात आली आहे. आळंदी येथे नुकत्याच पार पडलेल्या संस्थाचालकाच्या परिषदेत माजी आ. विजय गव्हाणे यांची राज्याच्या समन्वयकपदी निवड झाली आहे. या निवडीबद्दल विजय गव्हाणे यांचा सत्कार बैठीकत करण्यात येणार आहे. याचबरोबर २२ व २३ डिसेंबर रोजी आळंदी येथे झालेल्या बैठकीचा आढावा घेण्यात येणार आहे. संस्थाचालकांच्या विविध समस्यांसंदर्भातही बैठकीत चर्चा होणार आहे. या बैठकीत जिल्ह्यातील सर्व संस्था चालकांसह मुख्याध्यापक, शैक्षणिक क्षेत्रातील विविध संघटनांच्या पदाधिकारी यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा संस्था महामंडळाच्या वतीने डॉ. विवेक नावंदर, उदय देशमुख यांनी केले आहे.

## परभणीचा पारा ११ अंशांवर

परभणी - जिल्ह्यात बुधवारी (दि. २६) तापमानामध्ये किंचीत वाढ झाली होती. तर गुरूवारी (दि.२७) तापमानामध्ये पुन्हा घट झाली. तापमान ११.३ अंशांची नोंद वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील हवामान विभागात करण्यात आली आहे.

लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि.८ जानेवारी २०१९ ४

# शुक्रवारी परभणीत व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी:** येथील प्राचार्य शिवाजी भोसले प्रतिष्ठान आणि श्री शिवाजी महाविद्यालयातील स्वामीं विवेकानंद अभ्यास केंद्राच्या वतीने ११ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त 'नवा साज नवा आवाज' या शिर्षकाखाली २०१६ पासून ही व्याख्यानमाला घेतली जात आहे. यंदाचे हे चौथे वर्ष असून उपक्रमात सातत्य ठेवण्यात आले आहे.

यावर्षी अमरावती येथील डॉ.स्मिता देशमुख यांचे 'घे उंच भरारी' या विषयावर व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

मंगळवार, ८ जानेवारी २०१९ सकाळ

# डॉ. स्मिता देशमुख यांचे व्याख्यान

परभणी, ता. ७ : येथील प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रतिष्ठाण व श्री शिवाजी महाविद्यालयातील स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र यांच्यावतीने शुक्रवारी (ता. ११) महाविद्यालयाच्या सभागृहात सायंकाळी सहा वाजता अमरावती येथील प्राचार्या डॉ. स्मिता देशमुख यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त 'नवा साज... नवा आवाज' या विषयावर डॉ. देशमुख या व्याख्यान देणार आहेत. अमरावती येथील शिवाजी महाविद्यालयाच्या प्राचार्या असलेल्या डॉ. देशमुख यांनी 'मी जिजाऊ बोलतेय' या एकपात्री प्रयोगातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. राजमाता जिजाऊ या ऐतिहासिक मराठी चित्रपटात जिजाऊंची भूमिका साकारत आपल्या अभिनय कौशल्याची छाप पाडली आहे. 'ज्ञानगंगेचे भगीरथ' या डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवन चरित्रावर आधारित मराठी चित्रपटात त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या आई राधामाई यांच्या भूमिकेतून त्या मराठी रसिकांसमोर आल्या आहेत. शुक्रवारी त्यांचे व्याख्यान होत आहे.

सकाळ
बुधवार, ९ जानेवारी २०१९ ४



परभणी : राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत श्री शिवाजी महाविद्यालयाचा संघ प्रथम आल्याबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करतांना प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव. प्रा. डॉ. जयंत बोबडे.

# वादविवाद स्पर्धेत 'शिवाजी'चा संघ प्रथम

**परभणी** : गंगाखेड येथील श्री संत जनाबाई महाविद्यालयाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत श्री शिवाजी महाविद्यालयाचा संघ प्रथम आला. 'आरक्षणामुळे राष्ट्राचा सर्वांगीण विकास होईल किंवा नाही?' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या वादविवाद स्पर्धेत महाविद्यालयाच्या सुदाम भोसले आणि स्वराज पवार यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून श्रोत्यांची मने जिंकून सर्वप्रथम येण्याचा मान पटकावला. या वेळी बक्षीस म्हणून ढाल आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. जयंत बोबडे यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे स्थानिक नियामकप्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. एस. एन केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर , प्रबंधक विजय मोरे आदींनी कौतुक केले.

बुधवार, दि. ९ जानेवारी २०१९ २
epaper.deshonnati.com
देशोन्नती

# राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत शिवाजी महाविद्यालय प्रथम

**जिल्हा प्रतिनिधी / ८ जानेवारी**

**परभणी :** गंगाखेड येथील श्री संत जनाबाई महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत श्री शिवाजी महाविद्यालयाचा संघ प्रथम आला. प्राचार्य डॉ. बी.यु. जाधव यांच्याहस्ते विजेत्या स्पर्धकांचा सत्कार करण्यात आला.

'आरक्षणामुळे राष्ट्राचा सर्वांगीण विकास होईल किंवा नाही' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या वादविवाद स्पर्धेत महाविद्यालयाच्या सुदाम भोसले आणि स्वराज पवार यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून श्रोत्यांची मने जिंकून सर्वप्रथम येण्याचा मान पटकावला. यावेळी बक्षीस म्हणून ढाल आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. जयंत बोबडे यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे स्थानिक नियामक प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. एस एन केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर , प्रबंधक विजय मोरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. जयंत बोबडे यांनी अभिनंदन केले.



परभणी : राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत प्रथम आलेल्या स्पर्धकांचा प्राचार्य डॉ. बी.यु. जाधव यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विभागप्रमुख प्रा.डॉ. जयंत बोबडे व इतर.

पुण्य नगरी
बुधवार, ९ जानेवारी २०१९ । परभणी

HighLights

# शिवाजीराव भोसले प्रतिष्ठान व्याख्यानमाला शुक्रवारी

परभणी - येथील प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रतिष्ठान आणि श्री शिवाजी महाविद्यालयातील स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.११) सायंकाळी ६ वाजता श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. राजामाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त या व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून व्याख्यानमालेचे हे चौथे वर्ष आहे. या कार्यक्रमात 'घे उंच भरारी' या विषयावर अमरावती येथील शिवाजी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.स्मिता देशमुख मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

मंगळवार
दि. १ जानेवारी २०१९

लोकपत्र

# समाज माध्यमांचा उपयोग विवेकी वृत्तीने करावा - डॉ. इंगळे

**परभणी :** समाज माध्यमांचा उपयोग करतांना युवकांनी विवेकी वृत्तीने उपयोग करावा. समाज माध्यमांचा विधायकतेसाठी वापर केल्यास वैश्विक मानवता धर्म विकसीत होईल, असे प्रतिपादन श्री शिवाजी महाविद्यालयातील जनसंवाद आणि वृत्तपत्रविद्या विभागाचे प्रमुख डॉ. सुधीर इंगळे यांनी केले.

तालुक्यातील साडेगाव येथील, राष्ट्रीय सेवा विभागाच्या वतीने आयाजित वार्षिक रासेयो शिबिरात 'समाज माध्यमे आणि युवक' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजेसाहेब रेंगे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मदन परतुरकर, डोगे उपस्थित होते. समाज माध्यमांनी या देशात असंख्य संधी निर्माण केल्या आहेत. सहित्य, चित्रकला, संगीत, वत्कृत्व, चित्रपट, विज्ञान आणि शिक्षण तसेच संधोधन या क्षेत्रात अनेक नव्या चेहऱ्यांनी आपली मोहर अंकीत केली आहे. युवकांच्या तृत्प क्षमता लाखो नव्हे तर करोडो लोकांपर्यंत पोहोचत आहेत. यातून समजात माहिती, समता प्राप्त झाली आहे. असेही विचार इंगळे यांन व्यक्त केले. यावेळी डॉ. मदन परतूरकर यांनी विद्यार्थ्यांना करिअर विषयक मार्गदर्शन केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे डॉ. तुकाराम फिसफिसे, डॉ. रोडे, गोरे आदी उपस्थित होते.

शुक्रवार, ४ जानेवारी २०१९

सकाळ | परभणी

## श्री शिवाजी महाविद्यालय

येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्ताने अभिवादन करण्यात आले. या वेळी सावित्रीबाई फुलेंच्या जीवनकार्यावर लक्ष्मी शिंदे या विद्यार्थिनीने विचार मांडले. तर विशाल काळे या विद्यार्थ्याने 'जिने दिलाय नारी जातीला बहुमान, मला गायाच माय सावित्रीच गान' हे गीत सादर करून सावित्रीबाईनी केलेले कार्य सांगितले. या वेळी कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा. डॉ. डी. बी. रोडे, प्रा. राजेसाहेब रेंगे, प्रा. कीर्तींजय गोरे, शेख सादिक उपस्थित होते.



परभणी : येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

देशोन्नती
शुक्रवार, दि. ४ जानेवारी २०१९

**श्री शिवाजी महाविद्यालय**

**परभणी :** येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमात लक्ष्मी शिंदे हीने विचार मांडले. कार्यक्रमास प्रा. डॉ. तुकाराम फिसफीसे, प्रा. डॉ. डि. बी. रोडे, प्रा. राजेसाहेब रेंगे, प्रा. किर्तीजय गोरे, शेख सादीक आदींची उपस्थिती होती.



**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

पुरोगामी विचाराचे एकमत
परभणी Next »»
१०
परभणी बुधवार दिनांक ९ जानेवारी २०१९

# परभणीत व्याख्यानमालेचे आयोजन

परभणी : प्रतिनिधी

येथील प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रतिष्ठान आणि श्री शिवाजी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद अभ्यासकेंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानमाला 11 जानेवारी रोजी होणार आहे. यंदाचा कार्यक्रम श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी 6 वाजता आयोजित केला आहे.

यंदाच्या व्याख्यानमालेत प्रसिद्ध वक्त्या व अभिनेत्री डॉ. स्मिता देशमुख (अमरावती) यांचे ह्यघे उंच भरारीह या विषयावर व्याख्यान होणार आहे. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमीत्ताने ह्यनवा सोज -नव आवाजह या शिर्षकाखाली 2016 मध्ये सुरू झालेल्या या व्याख्यानमालेचे हे चौथे वर्ष आहे. अमरावती येथील डॉ. स्मिता देशमुख ह्या प्राचार्या असून



त्यांनी ह्यमी जिजाऊ बोलतेयह या एकपात्री प्रयोगातून आपली वेगळी ओळख संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण केली आहे. राजमाता जिजाऊ या ऐतिहासिक मराठी चित्रपटात त्यांनी जिजाऊंची भुमिका साकारलेली आहे.

व्याख्यानमालेस उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक रामप्रसाद देशमुख, कल्याण देशमुख, नारायण चौधरी, रितेश जैन, विजय घोडके, डॉ.पंडीत निर्मळ, डॉ. रोहिदास नितोंडे, विजय मोरे, लक्ष्मण गारकर, डॉ. तुकाराम फिसफिसे, बाळासाहेब काळे, मधुकर नायक आदींनी केले आहे.

दैनिक समर्थ
दिलासा
बुधवार, दि. ०९ जानेवारी २०१९ पान नं. ४

# भोसले प्रतिष्ठान व्याख्यानमालेत डॉ.स्मिता देशमुख यांचे व्याख्यान

**परभणी,दि.०८(प्रतिनिधी):** येथील प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रतिष्ठान आणि श्री शिवाजी महाविद्यालयातील स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी(दि.११) शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी सहा वाजता व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त नवा साज...नवा आवाज या शिर्षखाली २०१६ मध्ये सुरू झालेल्या या व्याख्यानमालेचे है चौथे वर्ष आहे. यावर्षी अमरावती येथील डॉ. स्मिता देशमुख यांचे घे उंच भरारी या विषयावर व्याख्यान होणार आहे. डॉ.देशमुख या अमरावती येथील शिवाजी महाविद्यालयाच्या प्राचार्या असून एक प्रसिध्द वक्तृया आहेत. मी जिजाऊ बोलतेय... या एकपात्री प्रयोगातून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण केली आहे. कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

बुधवार, ९ जानेवारी २०१९ MY परभणी-हिंगोली पुढारी ३

# परभणीत शुक्रवारी भोसले प्रतिष्ठानची व्याख्यानमाला

## डॉ. स्मिता देशमुख यांच्या व्याख्यानाचे आयोजन

**परभणी, प्रतिनिधी :** येथील प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रतिष्ठान आणि श्री शिवाजी महाविद्यालयात स्वामी विवेकानंद अभ्यासकेंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानमाला ११ जानेवारी रोजी होणार आहे. यंदाचा कार्यक्रम श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात सायंकाळी ६ वाजता आयोजित केला आहे.




प्रसिद्ध वक्त्या व अभिनेत्री डॉ. स्मिता देशमुख (अमरावती) यांचे 'घे उंच भरारी' या विषयावर व्याख्यान होणार आहे. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमीत्ताने 'नवा साज -नवा आवाज' या शिर्षकाखाली २०१६ मध्ये सुरू झालेल्या या व्याख्यानमालेचे हे चौथे वर्ष आहे. अमरावती येथील डॉ. स्मिता देशमुख ह्या प्राचार्या असून त्यांनी 'मी जिजाऊ बोलतेय' या एकपात्री प्रयोगाचे सादरीकरण केले तसेच राजमाता जिजाऊ या ऐतिहासिक मराठी चित्रपटातील जिजाऊंची भुमिका साकारलेली आहे. उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक प्रा. रामप्रसाद देशमुख, कल्याण देशमुख, नारायण चौधरी, रितेश जैन, विजय घोडके, पंडीत निर्मळ, डॉ. रोहिदास नितोंडे, विजय मोरे, लक्ष्मण गारकर, डॉ. तुकाराम फिसफिसे आदींनी केले आहे.

लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि.१० जानेवारी २०१९ ४

# 'शिवाजी'चा संघ वादविवाद स्पर्धेत प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी** : गंगाखेड येथील श्री संत जनाबाई महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत श्री शिवाजी महाविद्यालयाचा संघ प्रथम आला आहे.

'आरक्षणामुळे राष्ट्राचा सर्वांगीण विकास होईल किंवा नाही' या विषयावर ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत श्री शिवाजी महाविद्यालाच्या सुदाम भोसले आणि स्वराज पवार यांनी आपल्या भाषणातून श्रोत्यांची मने जिंकली. या संघाला प्रथम पारितोषिक मिळाले आहे. या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.जयंत बोबडे यांचे मार्गदर्शन लाभले. दोन्ही यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.एस.एन. केशेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर, प्रबंधक विजय मोरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.जयंत बोबडे यांच्या उपस्थितीत ढाल व प्रमाणपत्र सुपूर्द करण्यात आले.

दि. १० जानवारी २०१९
गोदातीर समाचार

# राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत शिवाजी महाविद्यालयाचा संघ प्रथम



**परभणी/प्रतिनिधी**
गंगाखेड येथील श्री संत जनाबाई महाविद्यालयाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत श्री शिवाजी महाविद्यालय संघाने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

'आरक्षणामुळे राष्ट्राचा सर्वांगीण विकास होईल किंवा नाही' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या वादविवाद स्पर्धेत महाविद्यालयाच्या सुदाम भोसले आणि स्वराज प्रवार यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून श्रोत्यांची मने जिंकून घेत प्रथम येण्याचा मान पटकावला. यावेळी ढाल आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.जयंत बोबडे यांनी मार्गदर्शन केले.या यशाबद्दल संस्थेचे स्थानिक नियामक प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.एस.एन. केशेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर, प्रबंधक विजय मोरे, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.बोबडे यांनी अभिनंदन केले.

दैनिक समर्थ दिलासा
गुरुवार, दि. १० जानेवारी २०१९ पान नं. ४

# परभणीत आज राज्यस्तरीय एकपात्री अभिनय व काव्य वाचन स्पर्धा

**परभणी, दि.०९(प्रतिनिधी):** राज्य मराठी विकास संस्था या विभागाच्यावतीने नाटककार राम गणेश गडकरी यांच्या स्मृतीशताब्दी, गीतकार ग.दि. माडगुळकर व विनोदी लेखक पु. ल. देशपांडे यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने या तिन्ही साहित्यिकांच्या लेखनावर आधारीत राज्यस्तरीय एकपात्री अभिनय व काव्यवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेची प्राथमिक फेरी येथील शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात दि.१० रोजी सकाळी १० वाजता होणार असून त्यात शालेय गटातील इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार आहे. तसेच महाविद्यालयीन गटात इ. ११ वी ते पदवीचे विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार असून त्यासाठी विजेत्यांना रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत.

या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत शालेय गटात प्रथम येणाऱ्या स्पर्धकास २००० रू.व ग्रंथ, व्दितीय क्रमांकास १८०० रू. व ग्रंथ तर तृतिय क्रमांक प्राप्त करणाऱ्या स्पर्धकास १५०० रू. व ग्रंथ बक्षिस म्हणून देण्यात येणार आहेत. तसेच महाविद्यालयीन गटात विजेत्या ठरणाऱ्या स्पर्धकांना प्रथम ३००० रू.व ग्रंथ, व्दितीय २५०० रू. व ग्रंथ, तृतीय क्रमांकास २००० रू. व ग्रंथ, चौथे पारितोषिक १५०० रू. व ग्रंथ तर पाचवे पारितोषिक १००० रू. व ग्रंथ देण्यात येणार आहे.

याशिवाय सर्व सहभागी स्पर्धकांना शासनाचे सहभागी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. शालेय व महाविद्यालयीन गटातील स्पर्धकांनी राम गणेश गडकरी व ग. दि. माडगुळकर यांच्या प्रकाशीत साहित्यावर काव्यवाचन करावे तर गडकरी व पु. ल. देशपांडे यांच्या प्रकाशित साहित्यावर एकपात्री अभिनय करायचे आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा समन्वय विशाल बांगर ( मो. ७२७६८४०५२५) मराठी विभाग श्री शिवाजी महाविद्यालय यांच्याकडे संपर्क साधावा.

पुण्य नगरी
गुरूवार,१० जानेवारी २०१९ । परभणी

# शिवाजी महाविद्यालयाचे यश

परभणी - गंगाखेड येथील श्री संत जनाबाई महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेत श्री शिवाजी महाविद्यालयाचा संघ प्रथम आला. ''आरक्षणामुळे राष्ट्राचा सर्वांगीण विकास होईल किंवा नाही'' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या वादविवाद स्पर्धेत महाविद्यालयाच्या सुदाम भोसले आणि स्वराज पवार यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून श्रोत्यांची मने जिंकून सर्वप्रथम येण्याचा मान पटकाविला. यावेळी बक्षिस म्हणून ढाल आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.जयंत बोबडे यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे स्थानिक नियामक प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.एस.एन. केशट्टी, डॉ.विजया नांदापूरकर , प्रबंधक विजय मोरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.जयंत बोबडे यांनी कौतुक केले.

पुण्य नगरी
रविवार, १३ जानेवारी २०१९ । परभणी-

# पंखात बळ असल्यास उंच भरारी घेता येते – डॉ. स्मिता देशमुख



परभणी / प्रतिनिधी

प्रत्येक व्यक्ती आयुष्यात यशस्वी होण्याचे स्वप्न पाहत असतो. प्रयत्न केल्याशिवाय स्वप्नांची पुर्तता होत नसते. केवळ धडपड करून यश संपादन करता येत नाही. त्यासाठी नियोजन, निवड आणि आवड यांचा समन्वय साधत आभाळझेप घेण्यासाठी पंख पसरावे लागतात आणि पंखात बळ असल्यासच उंच भरारी घेता येते, असे प्रतिपादन सिनेकलावंत डॉ. स्मिता देशमुख यांनी व्यक्त केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रतिष्ठान आणि स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र यांच्या वतीने जिजाऊ जयंती आणि विवेकानंद जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर डॉ.संप्रिया पाटील, वैशाली देशमुख, रेखा नायक, मेघा झरीकर, पोलीस उपनिरीक्षक सुनील पुंगळे, कांतराव देशमुख, डॉ. अभिजीत चिद्रवार, डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. जयप्रकाश गायकवाड, कल्याण देशमुख आदींची उपस्थिती होती. डॉ. स्मिता देशमुख म्हणाल्या, माँ जिजाऊ यांनी चांगले संस्कार दिले म्हणून शिवाजी सारखा रयतेची कदर करणारा राजा महाराष्ट्राला मिळाला. त्यांचा आदर्श घेत आजच्या महिलांनी संस्कारक्षमपिढी निर्माण करण्याची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली पाहिजे. विवेकानंदचा आदर्श घेत आजच्या तरूण पिढीने आपल्या ज्ञानाची भूक भागविण्यासाठी वाचन संस्कृती जोपासली पाहिजे, असे त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नारायण कणसे यांनी केले. डॉ. पंडित निर्मळ यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. त्र्यंबक वडसकर यांनी सूत्रसंचालन केले. तुकाराम फिसफिसे यांनी आभार मानले.

लोकमत औरंगाबाद, रविवार, दि.१३ जानेवारी २०१९ ४

**व्याख्यान :** स्मिता देशमुख यांचे आवाहन

# नियोजन, निवड, आवडीचा समन्वय घाला

लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी :आयुष्यात यशस्वी होण्यासाठी नियोजन, निवड आणि आवड यांचा समन्वय घालणे आवश्यक आहे. या समन्वयातून आभाळझेप घेण्यासाठी पंख पसरता येतात, असे प्रतिपादन सिने कलावंत डॉ.स्मिता देशमुख यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात आयोजित व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या. प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रतिष्ठान आणि स्वामी विवेकानंद अभ्यासक्रमाच्या वतीने जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त ही व्याख्यानमाला घेण्यात आली.



परभणी शहरातील शिवाजी महाविद्यालयात आयोजित व्याख्यानाच्या उद्घाटन प्रसंगी दीपप्रज्वलन करताना डॉ. स्मिता देशमुख. समवेत डॉ.संप्रिया पाटील, मेघाताई झरीकर, कांतराव झरीकर, वैशाली देशमुख, रेखा नायक, डॉ.बाळासाहेब जाधव, सुनील पुंगळे, डॉ.अभिजीत चिद्रवार, डॉ. जयप्रकाश गायकवाड, प्रा.कल्याण देशमुख .

या प्रसंगी डॉ. संप्रिया पाटील, वैशाली देशमुख, रेखा नायक, मेघाताई झरीकर, कांतराव झरीकर, पोलीस उपनिरीक्षक सुनील पुंगळे, डॉ.अभिजीत चिद्रवार, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, डॉ.जयप्रकाश गायकवाड, कल्याण देशमुख आदींची उपस्थिती होती. देशमुख म्हणाल्या, माँ जिजाऊंनी चांगले संस्कार दिले म्हणून छत्रपती शिवाजी राजेंसारखा रयतेची कदर करणारा राजा महाराष्ट्राला मिळाला. त्यांचा आदर्श घेत आजच्या महिलांनी संस्कारक्षम पिढी निर्माण करण्याची जबाबदारी स्वत:च्या खांद्यावर घेतली पाहिजे. स्वामी विवेकानंदांचा आदर्श घेत आजच्या तरुण पिढीने आपल्या ज्ञानाची भूक भागविण्यासाठी वाचन संस्कृती जोपासली पाहिजे, असे त्या म्हणाल्या. डॉ.नारायण कणसे यांनी प्रतिष्ठानची भूमिका विषद केली. डॉ.पंडित निर्मळ यांनी वक्त्यांचा परिचय करुन दिला. नाट्यकलावंत त्र्यंबक वडसकर यांनी सूत्रसंचालन केले.

डॉ.तुकाराम फिसफिसे यांनी आभार मानले. कार्यक्रमास श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२ पुढारी MY परभणी-हिंगोली मंगळवार, १५ जानेवारी २०१९



परभणी : व्याख्यानमाला उद्घाटनप्रसंगी डॉ.स्मिता देशमुख यांच्यासह उपस्थित डॉ. संप्रिया पाटील, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, वैशाली देशमुख, मेघाताई झरीकर, कांतराव झरीकर आदी.

# पंखात बळ असल्यास उंच भरारी शक्य : डॉ. स्मिता देशमुख

**परभणी, प्रतिनिधी :** आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर प्रयत्न करणे गरजेचे आहे त्याशिवाय स्वप्नांची पूर्तता होत नसते. योग्य नियोजन, निवड आणि आवड यांचा समन्वय साधत आभाळ झेप घेण्यासाठी पंख पसरावेत. पंखात बळ असेल तरच भरारी घेता येते, असे प्रतिपादन प्रसिद्ध वक्त्या व सिनेकलावंत डॉ. स्मिता देशमुख यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात प्राचार्य शिवाजीराव भोसले प्रतिष्ठान आणि स्वामी विवेकानंद अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या. जिजाऊ जयंती व विवेकानंद जयंतीनिमित्त झालेल्या या कार्यक्रमास डॉ. संप्रिया पाटील, वैशाली देशमुख, रेखा नायक, मेघाताई झरीकर, पोलिस निरीक्षक सुनिल पुंगळे, कांतराव देशमुख, डॉ. अभिजीत चिद्रवार, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. जयप्रकाश गायकवाड, कल्याण देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. स्मिता देशमुख म्हणाल्या की, जिजाऊंनी चांगले संस्कार केल्यामुळे शिवरायांसारखा रयतेची कदर करणारा राजा महाराष्ट्राला मिळाला. त्यांचा आदर्श घेत आजच्या महिलांनी संस्कारक्षम पिढी निर्माण करावी. तसेच विवेकानंदांचा आदर्श घेत आजच्या तरूण पिढीने वाचन संस्कृती जोपासून आपल्या ज्ञानाची भूक भागवावी. प्रास्ताविक डॉ. नारायण कणसे यांनी केले.

डॉ.पंडीत निर्मळ यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. सुत्रसंचलन त्र्यंबक वडसकर तर आभार तुकाराम फिसफिसे यांनी मानले.

झुंजार नेता

दिनांक : १५ जानेवारी २०१९

# श्री शिवाजी महाविद्यालयात रक्तदान शिबिर संपन्न

परभणी(प्रतिनिधी)दि.१४:- श्री शिवाजी महाविद्यालयात युवादिन व राष्ट्रमाता जिजाऊ जयंती निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभागाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिरात विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठया उत्साहाने सक्रीय प्रतिसाद दिला. या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी केले. यावेळी प्राचार्यांनी रक्तदात्यांना मार्गदर्शन केले. त्याच बरोबर कनकदंडे यांनी संद्यस्थितीत रक्ताची गरज व रक्तदानाचे महत्व विद्यार्थ्यांना सांगीतले. विशेष म्हणजे या शिबिरात मुली सक्रीय सहभागी राहिल्या. या शिबिरास जिल्हा सामान्य रूग्णालयाचे उध्दवराव देशमुख, सुहास देशमुख, नौशाद हशमी, मारोती सिरगवार यांनी सहकार्य केले.

या शिबिरात एकूण १२७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर, डॉ. आर. एस.िनतोंडे, डॉ.एस.एल.राठोड, प्रा.स विता कोकाटे, ऋतूजा जोशी, डॉ.आर.एस.बडुरे, प्रा.गवळी, प्रा.सुर्यवंशी, प्रा.झुंझारे, प्रा.रविशंकर झिंगरे, डॉ.सुरेंद्र येणोरकर आदींची उपस्थिती होती.

या शिबिरासाठी एन.सी.सी. लेप्टनंट, प्रा.प्रशांत सराफ, एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी प्रा.प्रल्हाद भोपे, डॉ.तुकाराम फिसफिसे, प्रा.डॉ.रोडे, प्रा.राजेसाहेब रेंगे, प्रा.किर्तीजय गोरे, क्रीडा निदेशक प्रा.संतोष कोकीळ, एन.एस.एस.विद्यार्थी प्रतिनिधी शेख समद यांनी शिबिर यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

देशोन्नती मंगळवार, दि. १५ जानेवारी २०१९



परभणी : येथील श्री शिवाजी महाविद्यालयात जिजाऊ जयंती निमित्त रक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी जिल्हा सामान्य रुग्णालयाचे उद्धवराव देशमुख, सुहास देशमुख, नौशाद हाशमी, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापुरकर व इतर.

# रक्तदान शिबीरास प्रतिसाद

**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्रसेना, क्रिडा विभागाच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ जयंती निमित्त रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबीरात १२७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबीरास विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी शिबीरास जिल्हा सामान्य रुग्णालयाचे उद्धवराव देशमुख, सुहास देशमुख, नौशाद हाशमी, मारोती सरसवार यांची उपस्थिती होती. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापुरकर, डॉ. आर. एस. नितोंडे, डॉ. एस. एल. राठोड. प्रा. सविता कोकाटे, ऋतुजा जोशी, डॉ. आर. एस. वडुरे, प्रा. गवळी, प्रा. सुर्यवंशी, प्रा. झुंझारे, प्रा. रविशंकर झिंगरे, डॉ. सुरेंद्र येणोरकर, आदींची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी लेफ्टनंट प्रा. प्रशांत सराफ, प्रा. प्रल्हाद मोरे, डॉ. तुकाराम फिसफिसे, प्रा. डॉ. रोडे, प्रा. राजेसाहेब रेंगे, प्रा. मोरे, क्रिडा निर्देशक प्रा. संतोष कोकीळ, शेख समद आदींनी परिश्रम घेतले.

सकाळ
बुधवार, १६ जानेवारी २०१९
३

## शिबिरात १२७ जणांचे रक्तदान

**परभणी :** येथे युवा दिन व राष्ट्रमाता जिजाऊ जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभागाच्यावतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी केले. या वेळी १२७ जणांनी रक्तदान केले. उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. आर. एस. नितोंडे, डॉ. एस. एल. राठोड, प्रा. सविता कोकाटे, ऋतुजा जोशी, डॉ. आर. एस. बडुरे, प्रा. गवळी आदी उपस्थित होते. यशस्वितेसाठी प्रा. प्रशांत सराफ, प्रा. प्रल्हाद भोपे, प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे, डॉ. रोडे आदींनी पुढाकार घेतला.

लोकमत औरंगाबाद, मंगळवार, दि.१५ जानेवारी २०१९ २

# रक्तदान शिबिरास प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

परभणी : येथील शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना व क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. शिबिरासाठी उद्धवराव देशमुख, सुहास देशमुख, नौशाद हाश्मी, मारोती सिरगवार यांनी सहकार्य केले. या शिबिरात १२७ जणांनी रक्तदान केले. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. आर.एस. नितोंडे, डॉ.एस.एल. राठोड, प्रा. सविता कोकाटे, ऋतुजा जोशी, डॉ. आर.एस. बडुरे, प्रा. गवळी आदींची उपस्थिती होती.

देशोन्नती परभणी, बुधवार, दि. १६ जानेवारी २०१९

# शिवाजीच्या १९ विद्यार्थिनींची टाटा समुहात निवड

## विद्यार्थिनींचा जल्लोष ■ टाटा उद्योग समुहातर्फे कॅम्पस इंटरव्ह्यु

जिल्हा प्रतिनिधी / १५ जानेवारी

**परभणी** : उद्योगिक क्षेत्रातील नामवंत कंपनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टाटा उद्योग समुहातर्फे शिवाजी महाविद्यालयात कॅम्पस् इंटरव्ह्यु घेण्यात आले. यात १९ विद्यार्थिनींची कंपनीने निवड केली आहे. त्यांना वार्षिक दिड ते दोन लाख रुपयांचे पॅकेज मिळणार आहे.

शिवाजी महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यु घेण्यासाठी टाटाचे व्यवस्थापक अर्पित पाठक, सुनिल तावरे हे उपस्थित होते. त्यांनी चार टप्प्यात ७० विद्यार्थिनींच्या मुलाखती घेतल्या. त्यातून गौरी कोठेकर, नंदीका पंडित, अश्विनी राऊत, कोमल शिंदे, मिरा सुर्यवंशी, शारदा थोरात, पुजा बेलोकर, श्वेता मोरे, निकिता भालेराव, सुप्रिया मोगल, ऐश्वर्या पाटील, भाग्यश्री शिंदे, पायल जाधव, प्रणिता गौतम, योगिता सरवदे, पुजा हनवते, मोनाली जाधव, वैभवी देशमुख, मोनिका गंर्धव या विद्यार्थिनींची निवड करण्यात आली. प्रा.डॉ. एच.एस. जगताप, डॉ.मदन परतूरकर, प्रा.डॉ. रामानंद व्यवहारे, डॉ. एम.ए. शेख, प्रा. आर.आर. मिस्त्री, डॉ. डी.बी. रोडे, प्रा. अभिजीत भंडारे यांनी विद्यार्थिनीना प्रशिक्षण दिले.

निवड झालेल्या विद्यार्थिनींचे स्वागत मशिप्र मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, आ. सतीश चव्हाण, हेमंतराव जामकर, प्राचार्य बाळासाहेब जाधव, उप प्राचार्य डॉ. एस.एन. केशेट्टी, डॉ. विजया नांद्रापूरकर, समन्वयक डॉ. रोहिदास नितोंडे आदींनी केले आहे.



परभणी : टाटा उद्योग समुहाच्या परिसर मुलाखतीत यशस्वी झालल्या विद्यार्थिनीच्या चमुसोबत प्राचार्य डॉ. बी.यु. जाधव, डॉ. एच.एस. जगताप, टीसीएसचे अधिकारी अर्पित पाठक, सुनिल तावरे व इतर

# परभणी

६ | सोमवार, दि. १३ जानेवारी २०

## 'व्यवस्थापन क्षेत्रात युवकांना करिअरची संधी'

**परभणी :** आज उद्योग आणि सेवा क्षेत्रांमध्ये खर्च व्यवस्थापनसंदर्भाने करिअरच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्या संधीचे सोनं करून वाणिज्य आणि इतर शाखेतील विद्यार्थ्यांनी आपले करिअर घडवावे, असे प्रतिपादन संभाजीनगर येथील करतज्ज्ञ पराग राणे यांनी केले. द इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाऊंट ऑफ इंडिया संभाजीनगर व वाणिज्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय कार्यशाळा शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयात गुरुवारी आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्या डॉ. विजया नांदापूरकर होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून विभागप्रमुख डॉ. मदन परतूरकर, डॉ. गणेश चालिंदरवार, डॉ.पी.बी. खरात यांची उपस्थिती होती. पराग राणे म्हणाले की, मराठी भाषेचा न्यूनगंड न बाळगता इंग्रजी भाषेवर कसे प्रभुत्व मिळवता येईल याचा विद्यार्थ्यांनी विचार करावा. पदवीचे शिक्षण घेत असताना खर्च आणि व्यवस्थापनसंदर्भातले वेगवेगळे कमी कालावधीचे कोर्सेस पूर्ण करून उद्योग क्षेत्रात संधीचे सोने करावे, असे आवाहन केले. अध्यक्षीय समारोप डॉ. विजया नांदापूरकर यांनी केला. सूत्रसंचालन करून आभार प्रा. अतुल वैराट यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. गोपाळ परांडे, प्रा.अबोली अंकुश, दत्ता वाघमारे, साहेब येलेवाड आदींनी पुढाकार घेतला.

रभणी-हिंगोली पुण्य नगरी

# विज्ञान प्रदर्शनात शिवाजी महाविद्यालयाचे यश

**परभणी / प्रतिनिधी**

औरंगाबाद येथील देवगिरी महाविद्यालयात नुकत्याच पार पडलेल्या ११ व्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या संघास राज्यपातळीवर दुसरे उत्तेजनार्थ बक्षिस प्राप्त झाले आहे. या संघाने बेस्ट फॉम द विस्ट हा प्रकल्प सादर केला. या संघात अजय ठोंबरे, अरमान बरय्या, नितेश राठोड, अंजली राठोड, वैष्णवी टाके, धनश्री चिद्रवार आदींचा समावेश होता. या संघाला राजेश म्हस्के, डॉ.बापुसाहेब भोसले, ए.बी.शिंदे यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल प्रकाश सोळंके, सतीश चव्हाण, हेमंत जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.श्रीनिवास केशट्टी, उपप्राचार्य डॉ.विजया नांदापूरकर, उपप्राचार्य ए.एन.डहाळे, प्रर्यवेक्षक बी.व्ही.आंधळे, विजय मोरे आदींनी स्वागत केले.

गोदातीर समाचार

दि. १६ जानेवारी २०१९

# शिवाजी महाविद्यालयाच्या १९ विद्यार्थीनींची 'टीसीएस' कंपनीत निवड



**परभणी/प्रतिनिधी**

टीसीएस कंपनीकडून घेण्यात आलेल्या परिसर मुलाखतीमध्ये येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या १९ विद्यार्थीनींची निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या विद्यार्थीनींची पुणे येथे ट्रेनि असोसिएट पदावर नियुक्ती झाली आहे. या विद्यार्थीनींना सुरूवातीच्या वर्षात १.५ ते २ लाखांचे वार्षिक पॅकेज असणार आहे.

टीसीएस कंपनीचे पुणे येथील मनुष्यबळ (एच.आर.) व्यवस्थापक अर्पित पाठक व सुनिल तावरे यांनी ७० विद्यार्थिनींच्या मुलाखती घेतल्या होत्या. मुलाखतीसाठी चार टप्प होते. निवड झालेल्या विद्यार्थीनीमध्ये गौरी कोठेकर, नंदिका पंडित, अश्विनी राऊत, कोमल शिंदे, मिरा सुर्यवंशी, शारदा थोरात, पुजा बेलोकर, श्वेता मोरे, निकिता भालेराव, सुप्रिया मोगल, ऐश्वर्या पाटील, भाग्यश्री शिंदे, पायल जाधव, प्रणिता गौतम, योगिता सरवदे, पुजा हनवते, मोनाली जाधव, वैधवी देशमुख व मोनिका गंधर्व यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या भुमिकेतून मंडळाचे सरचिटणीस आ.सतिश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विविध अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहेत. महाविद्यालयातील ट्रेनिंग ॲन्ड प्लेसमेंट सेंटरद्वारे अनेक विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये नियुक्ती होत आहे. या प्रशिक्षणासाठी प्रा.डॉ.एच.एस.जगताप, डॉ.मदन परतूरकर, डॉ.रामानंद व्यवहारे, डॉ.एम.ए.शेख, प्रा.आर.आर.मिस्त्री, डॉ.डी.बी.रोडे, प्रा.अभिजीत भंडारे आदींनी प्रयत्न केले.

म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ.चव्हाण यांच्या प्रयत्नाने या विद्यार्थीनींना टीसीएस कंपनीचे० दिवसांचे मोफत ट्रेनिंगचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संवाद कौशल्य, मुलाखत तंत्र, व्यक्तिमत्व विकास या विषयी प्रशिक्षण देण्यात आले. या ट्रेनिंगचा विद्यार्थीनींना निवड होण्यासाठी फायदा झाला. नियुक्ती झाल्याचे कळताच यशस्वी विद्यार्थीनींनी जल्लोष केला.

यशस्वी विद्यार्थीनींचे म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष श्री.सोळंके, सरचिटणीस आ.चव्हाण, हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.एस.एन.केशट्टी, डॉ.विजया नांदापूरकर,आयक्युएसी समन्वयक डॉ.रोहिदास नितोंडे यांनी अभिनंदन केले आहे.

दि. १६ जानेवारी २०१९

गोदातीर समाचार

पिलाजी कसाब कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

## श्री शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थी संसद गठीत

**परभणी-** श्री शिवाजी महाविद्यालयात शैक्षणिक वर्षे २०१८-१९ करिता संसद पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. यामध्ये अध्यक्ष ज्ञानेश्वर बनसकर, उपाध्यक्ष अमृता कुलकर्णी, कोषाध्यक्ष युवराज कोल्हे, सचिव तथा विद्यापीठ प्रतिनिधी शेख समद, ग्रंथालय प्रतिनिधी कोमल ढगे, उपहार गृह प्रतिनिधी वैष्णवी देशमुख यांची निवड झाली. सर्व नवनिर्वाचित संसद पदाधिकाऱ्यांचे स्वागत प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांच्याहस्ते करण्यात आले. या विद्यार्थी संसदेचे कार्य संसद प्रभारी प्राध्यापक तथा उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशट्टी, डॉ. परिमल सुतवणे, डॉ. सुरेंद्र येणोरकर, प्रा. रविशंकर झिंगरे, डॉ. फिसफिसे टी.आर. प्रा. प्रल्हाद पी.डी. डॉ. आर.एस. बडुरे, प्रा. रिठे देविदास, प्रा. संतोष कोकीळ व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.

देशोन्नती बुधवार, दि. १६ जानेवारी २०१९

# शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थी संसद स्थापन

**परभणी :** श्री शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थी संसदेची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी ज्ञानेश्वर बनसकर याचीं तर उपाध्यक्षपदी अमृता कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. प्राचार्य डॉ. बी. यु. जाधव यांच्या उपस्थित घेण्यात आलेल्या बैठकीत समितीची निवडण्यात आली आहे. उर्वरित समितीमध्ये सचिव शेख समद, ग्रंथालय प्रतिनिधी कोमल ढगे, उपहारगृह प्रतिनिधी वैष्णवी देशमुख यांची निवड करण्यात आले. नूतन विद्यार्थी संसद प्रतिनिधींचा प्राचार्य डॉ. जाधव, उप प्राचार्य केशट्टी, डॉ. परिमल सुतवणे, डॉ. सुरेंद्र येणोरकर, प्रा. रविशंकर झिंगरे, डॉ. फिसफिसे, प्रा. पी.डी. प्रल्हाद, डॉ. आर.एस. बंडूरे, प्रा. देविदास रिठ्ठे, प्रा. संतोष कोकीळ आदींनी स्वागत केले.

WWW.LOKSATTA.COM ५
बुधवार, १६ जानेवारी २०१९
लोकसत्ता | मराठवाडा

# झुंडीच्या विरोधात आवाज उठविण्याची गरज - नीरजा

## परभणीत शब्दसह्याद्री पुरस्काराचे वितरण



परभणीत दरवर्षी होणाऱ्या शब्दसह्याद्री पुरस्कार आणि 'वाटा कवितेच्या' या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन ज्येष्ठ समीक्षक भगवंत क्षीरसागर, कवयित्री नीरजा यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य बी. यू. जाधव, इंद्रजित भालेराव, शब्दसह्याद्रीचे विठ्ठल भुसारे आदी हजर होते.

**वार्ताहर, परभणी**

**बुद्धिप्रामाण्य आणि** स्वतंत्र विचार यांना दडपण्याचे काम सत्ताकारणांद्वारे केले जात आहे. सर्वच विचारी माणसांनी अशा झुंडीच्या विरोधात आवाज उठविण्याची गरज असून व्यक्ती स्वातंत्र्याच्या जपवणुकीसाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवयित्री नीरजा यांनी केले.

येथील शब्दसह्याद्री प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित पुरस्कार वितरण आणि 'वाटा कवितेच्या' या कार्यक्रमप्रसंगी त्या बोलत होत्या. यावर्षीचा शब्दसह्याद्री पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक डॉ. म. सु. पाटील यांच्यावतीने नीरजा यांनी स्वीकारला. शाल, श्रीफळ, मानपत्र व ११ हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याप्रसंगी ज्येष्ठ समीक्षक, अनुवादक प्रा. भगवंत क्षीरसागर, कवी इंद्रजित भालेराव, आसाराम लोमटे, प्रा. भारत काळे, प्राचार्य बी. यू. जाधव, शब्दसह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विठ्ठल भुसारे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना नीरजा म्हणाल्या, आजच्या काळात साहित्याची जबाबदारी वाढली असून साहित्याच्या माध्यमातूनच समाजात विश्वास, सहिष्णुता आणि परस्परांमधील संवाद वाढेल. शब्दसह्याद्री प्रतिष्ठानचा हा उपक्रम म्हणजे शब्दांवरील निष्ठा असणाऱ्या सर्वांचीच एक अक्षर चळवळ आहे, असेही म्हणता येईल.

यावेळी प्रा. क्षीरसागर यांनी डॉ. पाटील यांच्या काव्यसमीक्षेचा आढावा घेऊन त्यांचे योगदान अधोरेखित केले. सर्व प्रकृतीच्या कवींची यथायोग्य नोंद घेऊन त्यांचे मूल्यमापन व चिकित्सा करण्याचे कार्य डॉ. पाटील यांनी केल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलनानंतर नयनतारा सहगल यांचे यवतमाळच्या साहित्य संमेलनात न झालेले उद्घाटकीय भाषण वाचून दाखविण्यात आले. प्रा. भगवान काळे यांनी हे वाचन केले. प्रास्ताविकात कवी केशव खटिंग यांनी आजवरच्या उपक्रमांचा आढावा घेतला. मानपत्राचे वाचन अरुण चव्हाळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश हिवाळे यांनी केले.

### स्त्री जाणिवेच्या कवितांचा जागर

दरवर्षी 'वाटा कवितेच्या' या कार्यक्रमात महाराष्ट्रातले अनेक नामवंत कवी हजेरी लावतात. यंदा नीरजा यांच्या अध्यक्ष[illegible]ली झालेल्या कविसं[illegible]गिनी सातारकर- पांडे, सुचिता खल्लाळ यांनी आपल्या कविता सादर केल्या. या कविसंमेलनाचे सूत्रसंचालन कवी अण्णा जगताप यांनी केले. संमेलनातील सहभागी कवयित्रींनी यावेळी स्त्री जाणिवेचा जागर आपल्या कवितांमधून घडवला.

परभणी- हिंगोली । बुधवार,१६ जानेवारी २०१९

पुण्य नगरी

Parbhani-Hingoli

# परिसर मुलाखतीत १९ विद्यार्थिनींची निवड

परभणी / प्रतिनिधी

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात टाटा कन्सलटन्सी सर्विसेसच्या वतीने शुक्रवारी (दि.११) आयोजित करण्यात आलेल्या परिसर मुलाखतीमध्ये महाविद्यालयाच्या १९ विद्यार्थीनींची निवड करण्यात आली आहे.



यावेळी टीसीएसचे मनुष्यबळ व्यवस्थापक अर्पित पाठक, सुनील तावरे यांनी ७० विद्यार्थीनींच्या चार टप्प्यात मुलाखती घेतल्या. निवड झालेल्या विद्यार्थिनींची ट्रेनी असोसिएट या पदावर पुणे येथे पुढील एक वर्षासाठी नियुक्ती करण्यात येणार आहे. या कालावधीत त्यांचे वार्षिक पॅकेज १.५ ते २ लाख व त्यानंतर २.५ ते ३ लाख असेल. निवड झालेल्या विद्यार्थिनींमध्ये गौरी कोठेकर, नंदिका पंडीत, अश्विनी राऊत, कोमल शिंदे, मीरा सूर्यवंशी, शारदा थोरात, पूजा बेलोकर, श्वेता मोरे, निकीता भालेराव, सुप्रिया मोगल, ऐश्वर्या पाटील, भाग्यश्री शिंदे, पायल जाधव, प्रणिता गौतम, योगिता सरवदे, पूजा हनवते, मोनाली जाधव, वैधवी देशमुख, मोनिका गंधर्व आदींचा समावेश आहे. मंडळाचे सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी डॉ. एच. एस. जगताप, डॉ. मदन परतुरकर, डॉ. रामानंद व्यवहारे, डॉ.एम. ए. शेख, आर. आर. मिस्त्री, डॉ.डी.बी. रोडे, अभिजीत भंडारे आदींनी प्रयत्न केले. परिसर मुलाखतीपूर्वी महाविद्यालयाच्या वतीने प्रशिक्षण व स्थाननिश्चिती कक्षाच्या वतीने त्यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. यात संवाद कौशल्य, मुलाखत तंत्र व व्यक्तिमत्व विकास या विषयी मार्गदर्शन करण्यात आले होते.

गुरुवार, दि. १७ जानेवारी २०१९ पान नं. ४

दैनिक समर्थ दिलासा

# टाटा उद्योग समुहात १९ विद्यार्थ्यांची निवड

## शिवाजी महाविद्यालय: २० दिवस चालणार मोफत ट्रेनिंग



**परभणी, दि. १६ (प्रतिनिधी):** येथील श्री.शिवाजी महाविद्यालयातील १९ विद्यार्थ्यांनीची टाटा कन्सलटन्सी सर्विसेस टीसीएमच्यावतीने घेण्यात आलेल्या परिसर मुलाखतीमध्ये निवड करण्यात आली आहे.

टीसीएसच्यावतीने खास विद्यार्थीनीसाठी ११ जानेवारी रोजी मुलाखतीचे आयोजनकरण्यात आले होते. यावेळी टीसीएसचे मनुष्यबळ विभागचे व्यवस्थापक अर्पित पाठक, व सुनिल तावरे यांची उपस्थिती होती. यावेळी निवड झालेल्या विद्यार्थीनीचे ट्रेनी असोसिएट या पदावर पुणे येथे नियुक्ती झाली आहे. त्यांचा एक वर्षाचा ट्रेनिंग कालावधी असणार आहे. या कालावधीत त्यांचे वार्षिक पॅकेज १.५ ते २ लाखाचे आहे. त्यानंतर २.५ ते ३ लाख असे असणार आहे. यावेळी निवड झालेल्या विद्यार्थ्यांत गौरी कोठेकर, नंदिका पंडीत, अश्विनी राऊत, कोमल शिंदे, मिरा सुर्यवंशी, शारदा थोरात, पुजा बेलोकर, श्वेता मोरे, निकीता भालेराव, सुप्रिया मोगल, ऐश्वर्या पाटील, भाग्यश्री शिंदे, पायल जाधव, प्रणिता गौतम, योगीता सरवदे, पुजा हनवते, मोनाली जाधव, वैधवी देशमुख व मोनिका गंधर्व यांचा यात समावेश आहे.

मंडळात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या भुमिकेतून मंडळाचे सरचिटणीस आ.सतिश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभिनव उपक्रम राबविण्यात येणार आहे. महाविद्यालयात प्रशिक्षण व स्थाननिश्चती कक्षाची स्थापना केली असून याव्दारे विद्यार्थ्यांची कंपन्यामध्ये नियुक्ती होत आहे. या प्रशिक्षणाविषयी प्रा.डॉ.एच.एस. जगताप, समन्वयक डॉ.मदन परतुरकर, डॉ.रामानंद व्यवहारे, डॉ.एम.ए.शेख, प्रा.आर. आर.मिस्त्री, डॉ.डी.बी.रोडे, प्रा.अभिजीत भंडारे आदीनी प्रयत्न केले.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, सरचिटणीस सतिश चव्हाण यांच्या प्रयत्नामुळे या विद्यार्थीनीना टीसीएसचे २० दिवसाचे मोफत ट्रेनिंग आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये संवाद कौशल्य, मुलाखत तंत्र व व्यक्तीमत्व विकास या विषयी प्रशिक्षण देण्यात आले. या ट्रेनिंगचा विद्यार्थीनीना निवड होण्यासाठी फायदा झाला.

यावेळी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, सरचिटणीस सतिश चव्हाण, स्था.नि.मं.चे प्रमुख हेमंत जामकर, प्राचार्य डॉ.बासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.एस.एन.केशेट्टी, डॉ.विजया नांदापूरकर, आयक्युएसी समन्वयक डॉ.रोहिदास नितोंडे यांनी अभिनंदन केले.

दैनिक समर्थ

# दिलासा

शुक्रवार, दि. १८ जानेवारी २०१९ पान नं. ४

## शिवाजी महाविद्यलयात विद्यार्थी संसद गठीत

**परभणी, दि. १७(प्रतिनिधी):** श्री शिवाजी महाविद्यालय परभणी येथे वर्ष २१८ - १९ करीता विद्यार्थी संसदेच्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ही निवड प्राचार्य बाळासाहेब जाधव यांच्या उपस्थितीत झाली. त्यात अध्यक्षपदी ज्ञानेश्वर बनसकर, उपाध्यक्ष अमृता कुलकर्णी, कोषाध्यक्ष युवराज कोल्हे, सचिव तथा विद्यापीठ प्रतिनिधी शेख समंद, ग्रंथालय प्रतिनिधी कोमल ढगे, उपहार प्रतिनिधीपदी वैष्णवी देशमुख यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित सदस्यांचे उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशट्टी, डॉ. परीमल सुतवणे, डॉ. सुरेंद्र येणोरकर, प्रा. रविशंकर झिंगरे आदींनी अभिनंदन केले आहे.

२५/०१/१९

शनिवार,
१९ जानेवारी २०१९ ३

# लघू चित्रपटाच्या पोष्टरचे अनावरण

**परभणी, ता. १८ :** श्री शिवाजी महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी अशोक आघाव याने दिग्दर्शित केलेल्या 'उचलतंगडी' या लघू चित्रपटाच्या पोष्टरचे अनावरण गुरुवारी (ता. १७) महाविद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले. या वेळी डॉ. बी. यू. जाधव, डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. श्रीदेवी कडगे, निर्माते अशोक आघाव यांची उपस्थिती होती. तसेच चित्रपटातील कलाकर प्रा. राम कटारे, राजेंद्र गहाळ, विनोद डावरे, संगीता मोगल, संतोष शहाणे, विश्वजित बांगर, दिशा गिरवलकर, विवेक कटारे, श्रेयस गहाळ, दीपक राके, विलास शिंदे यांचीही उपस्थिती होती. हा चित्रपट (ता. २४) फेब्रुवारीला प्रदर्शित होणार आहे.

दैनिक समर्थ **दिलासा**

शुक्रवार, दि. १८ जानेवारी २०१९ पान नं. ४

# शिवाजी महाविद्यलयात विद्यार्थी संसद गठीत

**परभणी,दि.१७(प्रतिनिधी):** श्री शिवाजी महाविद्यालय परभणी येथे वर्ष २१८ - १९ करीता विद्यार्थी संसदेच्या पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ही निवड प्राचार्य बाळासाहेब जाधव यांच्या उपस्थितीत झाली. त्यात अध्यक्षपदी ज्ञानेश्वर बनसकर, उपाध्यक्ष अमृता कुलकर्णी, कोषाध्यक्ष युवराज कोल्हे, सचिव तथा विद्यापीठ प्रतिनिधी शेख समंद, ग्रंथालय प्रतिनिधी कोमल ढगे, उपहार प्रतिनिधीपदी वैष्णवी देशमुख यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित सदस्यांचे उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशट्टी, डॉ. परीमल सुतवणे, डॉ. सुरेंद्र येणोरकर, प्रा. रविशंकर झिंगरे आदींनी अभिनंदन केले आहे.

दैनिक समर्थ
दिलासा
शनिवार, दि. १९ जानेवारी २०१९ पान नं. ३

आहे.

## उचलबांगडी लघुचित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण

**परभणी,दि.१८(प्रतिनिधी):** येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी दिग्दर्शीत केलेल्या उचलबांगडी या लघुचित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण प्राचार्य बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. हा कार्यक्रम शिवाजी महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी मंचावर उपप्राचार्या डॉ. विजया नांदापुरकर, डॉ. श्रीदेवी कडगे, निर्माते अशोक आघाव यांची उपस्थिती होती. त्यांनी चित्रपटनिमिर्तीविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. उचलबांगडी या चित्रपटाची पटकथा, गीतलेखन अशोक आघाव यांनी केले आहे. यात प्रा. राम कटारे, राजेंद्र गहाळ, विनोद डावरे, संगिता मोगल, संतोष शहाणे, बाल कलावंत विश्वजित बांगर, दिशा गिरवलकर, विवेक कटारे, श्रेयस गहाळ, दिपक राके, विलास शिंदे आदींनी अभिनय केलेला असून ते या कार्यक्रमास उपस्थित होते. त्यांनी चित्रिकरणाच्यावेळी आलेले अनुभव कथन केले. हा लघुचित्रपट २४ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. प्रल्हाद भोपे यांनी केले.

गोदातीर समाचार
दि. १९ जानेवारी २०१९

# 'उचलतंगडी' लघुचित्रपटाचे पोष्टर प्रदर्शीत



**परभणी**-परभणीच्या श्री. शिवाजी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी अशोक आघाव याने दिग्दर्शीत केलेल्या 'उचलतंगडी' या लघुचित्रपटाचे पोष्टर प्रदर्शीत करण्यात आले. श्री. शिवाजी महाविद्यालयाच्या मुख्य सांस्कृतिक सभागृहात महाविद्यालयाचे प्राचार्य बी.यु. जाधव यांच्याहस्ते पार पडलेला हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्यावतीने आयोजीत करण्यात आला होता. 'उचलतंगडी' या लघुचित्रपटाची पटकथा, गीतलेखन अशोक आघाव यांनी केले आहे. याप्रसंगी या लघुचित्रपटात अभिनय केलेले कलावंत प्रा. राम कटारे, राजेंद्र गहाळ,विनोद डावरे, संगीता मोगल, संतोष शहाणे, बाल कलावंत विश्वजीत बांगर, दिशा गिरवलकर, विवेक कटारे, श्रेयस गहाळ, दिपक राके, विलास शिंदे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. प्रल्हाद भोपे यांनी केले तर यावेळी विद्यार्थी व प्रा.डॉ. एस.एल. राठोड, डॉ. संजय जाधव, डॉ. जयंत बोबडे, प्रा. आर.एस. रेंगे, डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. एम.ए. शेख यांची उपस्थिती होती.

# समीक्षेतल्या सात्त्विक अधिकारी व्यक्तिमत्त्वाचा गौरव

## परभणीत प्रा. भगवंत क्षीरसागर यांचे प्रतिपादन

**परभणी, प्रतिनिधी :** मराठी काव्य समीक्षेत व्यासंग, वृत्तीगांभीर्य, साक्षेप महत्त्वाचे असतात. अध्ययन, अभ्यास व लेखन या गोष्टीही प्रधान असतात. डॉ. म. सु. पाटील यांच्यात त्या परिपूर्ण होत्या. म्हणूनच मराठी साहित्य क्षेत्रात समीक्षेतल्या सात्त्विक, अधिकारी व्यक्तिमत्त्वाचा हा गौरव आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी प्रा. भगवंत क्षीरसागर यांनी केले.

येथील शब्दसह्याद्री प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा शब्दसह्याद्री साहित्य पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक डॉ. म.सु. पाटील यांना देण्यात आला. त्यांच्या वतीने त्यांची कन्या डॉ. नीरजा यांनी तो स्वीकारला. या प्रसंगी प्रा. क्षीरसागर बोलत होते. व्यासपीठावर प्रा. इंद्रजित भालेराव, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, कथाकार डॉ. आसाराम लोमटे, डॉ. निरजा, उपशिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, भारत काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.




परभणी : येथे शब्दसह्याद्री प्रतिष्ठानतर्फे आयोजित कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी कवियित्री नीरजा, प्रा. भगवंत क्षीरसागर, इंद्रजित भालेराव, डॉ. आसाराम लोमटे, विठ्ठल भुसारे, डॉ. बाळासाहेब जाधव, बबन आव्हाड.

महाराष्ट्रातील ज्येष्ठ समीक्षक डॉ. म.सु. पाटील यांनी लिहिलेले मनोगत डॉ. निरजा यांनी वाचून दाखविले. ज्येष्ठ लेखिका नयनतारा सहगल यांच्या भाषणाचे वाचन प्रा.भगवान काळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय बाळू मामा जाधव यांनी तर मानपत्राचे वाचन अरुण चव्हाळ यांनी केले. यावेळी रोख ११ हजार रुपये, मानपत्र व सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक केशव खटिंग, सूत्रसंचालन सुरेश हिवाळे तर आभार प्रदर्शन प्रा. चव्हाण यांनी केले.

### एक तप पूर्ण

शब्दसह्याद्री प्रतिष्ठानच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या शब्दसह्याद्री साहित्य पुरस्काराला १२ वर्षे पूर्ण झाली आहेत. आजवर महाराष्ट्रातील अनेक नामवंत समीक्षकांना हा पुरस्कार दिला गेला आहे. आपण कवितेचे काही देणे लागतो. या भावनेतून हा उपक्रम परभणीतील काही ध्येयवेड्या साहित्यिक मित्रांनी राबविला. प्रा. इंद्रजित भालेराव डॉ. आसाराम लोमटे व प्रा. भारत काळे यांच्या मार्गदर्शनाखाली १२ वर्षे पूर्ण झाली आहेत, असे शब्दसह्याद्रीचे अध्यक्ष तथा उपशिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे यांनी यावेळी सांगितले.

सकाळ
मंगळवार,
२९ जानेवारी २०१९
४

# श्री शिवाजी महाविद्यालयात शिबिर

**परभणी** : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व श्री शिवाजी महाविद्यालय यांच्यावतीने एकदिवसीय जिल्हास्तरीय सपोर्ट सिस्टीम स्टूडंट्स स्टार्टअप इंक्युबेशन या विषयावरील शिबिर बुधवारी (ता. ३०) महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. केंद्र शासनाने देशाच्या आर्थिक व औद्योगिक सक्षमीकरणासाठी स्टार्ट अप इंडिया ही योजना सुरू केली आहे. तीचा उद्देश नव विचार कल्पनासाठी मजबूत वातावरण निर्मिती करणे की ज्याचा उपयोग देशातील रोजगार निर्मितीसाठी होऊन देशाच्या आर्थिक विकास वाढीसाठी आहे. त्याकरिता उद्योग, व्यवसाय विकासासाठी सरकार समर्थन व प्रोत्साहन अनुदान उपलब्ध करून देणार आहे. त्या अंतर्गत देशभरात या योजनेच्या अनुसंधान एंव विकास प्रयत्नांच्या वाढीसाठी राष्ट्रीय संस्थामध्ये ३१ केंद्राची स्थापना करणार आहे. या सर्व बाबींवर चर्चा करण्यासाठी श्री शिवाजी महाविद्यालयात शिबिर घेतले जाणार आहे. शिबिरात जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांतील प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी केले आहे.

देशोन्नती

बुधवार, दि. ३० जानेवारी २०१९

# श्री शिवाजी महाविद्यालयात एक दिवशीय शिबीर

***शहर प्रतिनिधी / २९ जानेवारी***

**परभणी :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व श्री शिवाजी महाविद्यालय परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने 'सपोर्ट सिस्टीम स्टूडंन्ट्स स्टार्टअप इन्क्युबेशन' या विषयावर बुधवार ३० जानेवारी रोजी एक दिवशीय जिल्हास्तरीय शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

महाविद्यालयातील मुख्य सभागृहात हे शिबीर होणार असून शिबीरामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी अभिनव केंद्रीय कार्यक्रमांची सुरुवात करण्यात येणार आहे. शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी केले आहे.

दि. २९ जानेवारी २०१९

गोदातीर समाचार

# उद्या शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी शिबीर

**परभणी**-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय जिल्हास्तरीय 'सपोर्ट सिस्टीम स्टुडंटस् स्टार्ट अप इंक्युबेशन' या विषयावरील शिबीर बुधवारी (दि.३०) महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजीत केले आहे. केंद्र शासनाने देशाच्या आर्थिक व औद्योगिक सक्षमीकरणासाठी स्टार्ट अप इंडिया ही योजना सुरु केलेली आहे. तिचा उद्देश नव विचार कल्पनांसाठी मजबुत वातावरण निर्मिती करणे की ज्याचा उपयोग देशातील रोंजगार निर्मितीसाठी होवून देशाच्या आर्थिक विकास वाढीसाठी आहे. त्याकरिता उद्योग, व्यवसाय विकासासाठी सरकार समर्थन व प्रोत्साहन अनुदान उपलब्ध करून देणार आहे. त्याअंतर्गत देशभरात या योजनेच्या अनुसंधान एवं विकास प्रयत्नांच्या वाढीसाठी राष्ट्रीय संस्थांमध्ये ३१ केंद्राची स्थापना करणार आहे. देशभरात सात अनुसंधान पार्कची स्थापना करणार आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीही अभिनव केंद्रीत कार्यक्रमांची सुरुवात करणार आहेत. प्रथम स्टार्ट अपची ओळख करून देण्यासाठी इन्क्युबेटर सेंटर महत्वाची भूमिका निभावणार आहेत. या सर्व बाबीवरची चर्चा करण्यासाठी शिबीर घेण्याची संधी महाविद्यालयास मिळालेली आहे. जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक प्रतिनिधींनी या शिबीरात सहभाग नोंदवावा असे आवाहन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी केले आहे.

# परभणी Next

पुरोगामी विचाराचे एकमत

परभणी ▶ गुरुवार, दिनांक ३१ जानेवारी २०१९

## बेसबॉल संघाची निवड चाचणी

**परभणी :** परभणी जिल्हा ज्युनिअर गट मुले-मुली संघाची निवड चाचणी आज बुधवार, ३० रोजी श्री शिवाजी महाविद्यालयाच्या मैदानावर दुपारी ४ वाजता निवड चाचणी घेण्यात . परभणी जिल्हा बेस बॉल असोसिएशनच्या आणि महाराष्ट्र बेसबॉल असो. वतीने आयोजन करण्यात आले आहे. सोलापूर येथे १ ते ३ फेब्रुवारी दरम्यान होणाठया अंतरजिल्हा राज्य अजिंक्यपद स्पर्धेत परभणी जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करणार आहे. जिल्हा संघाची निवड प्रा. राजेसाहेब रेंगे, रामानंद इंगोले, अमोल भंवर हे सदस्य करणार आहेत. या निवड चाचणीत सहभागी होण्याचे आवाहन राजकुमार भांबरे, शंकर शहाणे, सुहास काळे, संतोष गायकवाड, नारायण शिंदे, वैष्ठलास माने आदींनी केले आहे.

पुढारी MY परभणी-हिंगोली गुरुवार, ३१ जानेवारी २०१९

# भरदुपारी हॅपी बर्थडेचे सादरीकरण



परभणी : चित्रपट रसास्वाद शिबीर उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. बी. यू. जाधव, किरण सोनटक्के, दिग्दर्शक स्वप्नील कापुरे, मेधप्रणव पोवार, रवी पाठक आदी.

**परभणी, प्रतिनिधी :** परभणी फिल्म क्लबच्या चित्रपट रसास्वाद कार्यक्रमात मंगळवारी (दि. २९) भर दुपारी व हॅपी बर्थडे या दोन लघुपटांचे सादरीकरण करण्यात आले.

कैझन पिक्चर्स परभणी, अरभाट फिल्म क्लब पुणे, श्री शिवाजी महाविद्यालय परभणी आणि ज्ञानसाधना प्रतिष्ठान परभणी यांच्या सयुंक्त विद्यमाने सुरू असलेल्या परभणी फिल्म क्लबचे १९ वे पुष्प मंगळवारी शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडले.त्यानिमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ.बी.यु. जाधव, ज्ञानसाधना प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष किरण सोनटक्के, दोन्ही लघुपटांचे दिग्दर्शक स्वप्नील कापुरे व मेधप्रणव पोवार उपस्थित होते.

दोन्ही लघुपटांना २०१८ चा राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला असून त्यांच्या सादरीकरणानंतर दिग्दर्शक स्वप्नील कापूरे आणि मेधप्रणव पोवार यांनी प्रेक्षकांशी मुक्त सवांद साधला व त्यांच्या प्रश्नांची उत्तरे पण दिली. तसेच फिल्म मेकींग ची प्रकिया पण समजावून सांगितली. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन त्र्यंबक वडसकर यांनी केले.

प्रास्ताविक रवि पाठक यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अतुल साळवे, सोहम खिल्लारे, आदर्श कवळीकर, चकोर किनगावकर, गजानन नाल्टे, राधिका पिंगळकर, ऐश्वर्या डावरे आदीनी मेहनत घेतली.

सकाळ
बुधवार, ६ फेब्रुवारी २०१९
४

# 'ग्रंथालय' माहिती केंद्र बनले : प्राचार्य डॉ. जाधव

**परभणी, ता. ५ (बातमीदार)** : आजच्या काळात तंत्रज्ञानामध्ये झपाट्याने होत असलेले बदल लक्षात घेऊन ग्रंथालयांनी सुद्धा बदल स्वीकारणे गरजेचे असून, आज ग्रंथालय हे माहिती केंद्र बनले आहे. त्यमुळे ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी आपले अंगभूत असलेले गुण नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकसित करून उत्तम दर्जाची सेवा वाचकांना देण्यात यावी, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी रविवारी (ता. तीन) केले.

परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, ग्रंथालय व माहितीशास्त्र दोनदिवशीय शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी ते मार्गदर्शन करीत होते.

व्यासपीठावर प्रा. के. बी. तुपे, डॉ. एस. बी. टेळके, प्रा. डॉ. नंदकिशोर पठाडे, डॉ. संतोष कदम, डॉ. कल्याण टेकाळे, डॉ. त्रिमूर्ती सोमवंशी, बी. एम. चव्हाण, डॉ. रामदास टेकाळे यांची उपस्थिती होती. तसेच या वेळी महाविद्यालयातील केंद्रावरील माजी विद्यार्थी ज्यांची उच्च पदावर निवड झाली व पीएच. डी. प्राप्त झालेल्याचा प्राचार्य डॉ. जाधव यांच्या हस्ते सत्कार करून गौरव करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. रामदास टेकाळे यांनी केले. सूत्रसंचालन संदीप चव्हाण यांनी; तर प्रा. डॉ. त्रिमूर्ती सोमवंशी यांनी आभार मानले. या वेळी ग्रंथालय व माहितीशास्त्र अभ्यासकांची बहुसंख्येने उपस्थिती होती. यशस्वितेसाठी व्ही. के. पाटील, बाळकृष्ण पोखरकर, बालासाहेब बारहाते, विकास बाहेकर, के. पी. धन्वे, के. आर. होनराव, डी. एल. सपाटे यांनी केले आहे.

देशोन्नती
बुधवार, दि. ६ फेब्रुवारी २०१९

# नविन बदल ग्रंथालयांनी स्वीकारावे - प्राचार्य डॉ. जाधव

*शहर प्रतिनिधी / ५ फेब्रुवारी*

**परभणी :** आजच्या काळात तंत्रज्ञानामध्ये झपाट्याने बदल होत आहेत. हे बदल लक्षात घेवून ग्रंथालयांनी सुध्दा बदल स्वीकारणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, ग्रंथालय व माहिती शास्त्र या विषयावरील दोन दिवशीय शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. जाधव बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. के.बी. तुपे, प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. एस.बी. टेकाळे, प्रा.डॉ. नंदकिशोर पठाडे, डॉ. संतोष कदम, डॉ. कल्याण टेकाळे, डॉ. त्रिमुर्ती सोमवंशी, बी.एम. चव्हाण, ग्रंथपाल डॉ. रामदास टेकाळे यांची उपस्थिती होती.

सूत्रसंचालन संदिप चव्हाण, प्रास्ताविक डॉ. रामदास टेकाळे तर आभार प्रा.डॉ. त्रिमुर्ती सोमवंशी यांनी मानले. यशस्वीतेसाठी व्ही.के. पाटील, बाळकृष्ण पोखरकर, बालासाहेब बारहाते, विकास बाहेकर, के.पी. धनवे, के.आर. होनराव, डी.एल. सपाटे यांनी परिश्रम घेतले.

२ पुढारी MY परभणी-हिंगोली गुरुवार, ७ फेब्रुवारी २०१९

# ग्रंथालयातूनच माणूस घडतो : जाधव

**परभणी :** ग्रंथालय हा महाविद्यालयाचा आत्मा असून ग्रंथालयातूनच माणूस घडतो, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी केले. रविवारी (दि. ३) श्री शिवाजी महाविद्यालयातील ग्रंथालय विभागातर्फे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिकतर्फे दोन दिवशीय शिबिराचे उद्घाटन जाधव यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.के.बी. तुपे होते. याप्रसंगी डॉ. एस.बी. टेळके, प्रा.नंदकिशोर पठाडे, डॉ.संतोष कदम, डॉ.कल्याण टेकाळे, डॉ. त्रिमुर्ती सोमवंशी, बी.एम.चव्हाण, ग्रंथपाल डॉ.रामदास टेकाळे यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण व डॉ. एस.आर.रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. महाविद्यालयातील केंद्रावरील माजी विद्यार्थी ज्यांची उच्च पदावर निवड झाली व पीएच.डी. प्राप्त झालेल्यांचा प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

पुण्य नगरी
गुरूवार,७ फेब्रुवारी २०१९। परभणी

# ग्रंथालयातूनच माणूस घडतो – डॉ.बाळासाहेब जाधव

परभणी / प्रतिनिधी

आजच्या काळात तंत्रज्ञानात झपाट्याने बदल होत आहे. ग्रंथालयांनी हे बदल स्वीकारणे आवश्यक आहे. ग्रंथालये माहिती केंद्रे बनली आहेत. यामुळे ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी अंगभूत गुण नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विकसित करून उत्तम दर्जाची सेवा वाचकांना दिली पाहिजे असे सांगून ग्रंथालय हा महाविद्यालयाचा आत्मा असून ग्रंथालयातूनच माणूस घडतो, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव यांनी केले.

शहरातील श्री शिवाजी महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयावरील दोन दिवसीय शिबिराचे उद्घाटनप्रसंगी जाधव यांनी मार्गदर्शन केले. यावेळी के बी. तुपे, एस. बी. टेळके, डॉ. नंदकिशोर पठाडे, डॉ. संतोष कदम, डॉ. कल्याण टेकाळे, डॉ. त्रिमुर्ती सोमवंशी, बी. एम.चव्हाण, डॉ. रामदास टेकाळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमात महाविद्यालयातील केंद्रावरील माजी विद्यार्थी ज्यांची उच्च पदावर निवड झाली व पीएच. डी. प्राप्त झालेल्यांचा प्राचार्य डॉ. जाधव यांच्याहस्ते गौरव रण्यात आला. प्रास्ताविक डॉ. त्रिमुर्ती सोमवंशी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी व्ही. के पाटील, बाळकृष्ण पोखरकर, बालासाहेब बारहाते, विकास बाहेकर, के पी. धन्वे, के आर. होनराव, डी. एल. सपाटे आदींनी पुढाकार घेतला.

लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि. ७ फेब्रुवारी २०१९ ४

# ग्रंथालयातूनच घडतो बुद्धिजीवी माणूस

## शिबीर : बाळासाहेब जाधव यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** सध्याच्या युगात तंत्रज्ञानामध्ये झपाट्याने होत असलेले बदल लक्षात घेऊन ग्रंथालयांनी सुद्धा हे बदल स्वीकारणे गरजेचे आहे. ग्रंथालय हा महाविद्यालयाचा आत्मा असून ग्रंथालयातूनच माणूस घडतो, असे प्रतिपादन प्रा.डॉ.बाळासाहेब जाधव यांनी केले.

परभणी शहरातील शिवाजी महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथालय व माहितीशास्त्र या दोन दिवसीय शिबिराचे ३ फेब्रुवारी रोजी उद्घाटन झाले. या प्रसंगी प्रा.डॉ.जाधव बोलत होते. अध्यक्षस्थानी के.बी.तुपे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.एस.बी.टेकाळे, प्रा. डॉ. नंदकिशोर पठाडे, डॉ.संतोष कदम, डॉ.कल्याण टेकाळे, डॉ. त्रिमूर्ती सोमवंशी, बी.एम.चव्हाण, ग्रंथपाल रामदास टेकाळे उपस्थित होते. संदीप चव्हाण यांनी संचालन केले. यशस्वीतेसाठी व्ही.के.पाटील, बाळकृष्ण पोखरकर, बाळासाहेब बारहाते, विकास बाहेकर, के.पी.धनवे, के.आर.होनराव, डी.एल.सपाटे आदींनी प्रयत्न केले.

लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि. १४ फेब्रुवारी २०१९ ४

उत्तम बोरसुरीकर



**कार्यशाळा...** परभणी येथे औरंगाबाद येथील आयकर विभागाच्या वतीने शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात बुधवारी टीडीएस आयकर कपाती संदर्भात कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी कार्यशाळेचे उद्घाटन करताना अप्पर आयकर आयुक्त हेमंतकुमार लेऊवा. समवेत आयकर अधिकारी एस.एस. हिरप, निरिक्षक वसंत सुताने, प्राचार्य बाळासाहेब जाधव आदी.

शनिवार, १६ फेब्रुवारी २०१९ ४

सकाळ

# 'शिवाजी'त आज चर्चासत्र

**परभणी, ता. १५ (बातमीदार):** श्री शिवाजी महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्यावतीने विद्यापीठा अनुदान आयोग नवी दिल्ली व सीपीई पुरस्कृत एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र शनिवारी (ता. १६) आयोजित करण्यात आले.

'भारतीय लोकशाही व्यवस्थेची विद्यमान स्थिती, आव्हाने आणि संधी' हा चर्चासत्राचा मुख्य विषय असून नांदेड येथील पीपल्स महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. व्ही. एन. इंगोले यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन सकाळी साडेदहा वाजता होणार आहे. अध्यक्षस्थानी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माजी मंत्री प्रकाश सोळंके राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठातील डॉ. जी. रामा रेड्डी, डॉ. अविनाश येळीकर, हेमंतराव जामकर उपस्थित राहणार आहेत. देशभरातील ३०० संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित राहणार असल्याची माहिती समवन्यक डॉ. वृषाली फुके यांनी दि[illegible]ी.

गोदातीर समाचार

दि. १६ फेब्रुवारी २०१९

# आज शिवाजी महाविद्यालयात राज्यशास्त्र राष्ट्रीय चर्चासत्र

परभणी/प्रतिनिधी

श्री. शिवाजी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाच्यावतीने विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली व सी.पी.ई. पुरस्कृत एक दिवसीय चर्चासत्राचे शनिवारी (दि.१६)आयोजन करण्यात आले आहे.

भारतीय लोकशाही व्यवस्थेची विद्यमान स्थिती: आव्हाने आणि संधी हा चर्चा सत्राचा विषय असून नांदेड येथील पिपल्स महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. व्ही.एन. इंगोले यांच्याहस्ते चर्चासत्राचे उद्घाटन होईल. अध्यक्षस्थानी प्रकाश सोळंके उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून हैद्राबाद येथील उस्मानिया विद्यापीठातील राज्यशास्त्राचे प्रोफेसर डॉ.जी. रामा रेड्डी, म.शि.प्र. मंडळाचे कोषाध्यक्ष डॉ. अविनाश येळीकर, हेमंतराव जामकर उपस्थित राहणार आहेत. दुपारी ४.३० वाजता समारोप कार्यक्रमास सेलू येथील नुतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी उपस्थित राहणार आहेत. चर्चासत्राचे संयोजक प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव अध्यक्षस्थानी असतील. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य रामभाऊ घाटगे, प्रताप देशमुख, संजय नखाते, केशवअण्णा दुधाटे, स्वराजसिंह परिहार, परमेश्वर जाधव,डॉ. अफजान उर रहेमान खान, आय.क्यु.सी.चे समन्वयक डॉ. रोहीदास नितोंडे यांची प्रमुख उपस्थिती आहे.

चर्चासत्रात संशोधन पत्रिका प्रसिध्द केली जाणार असून देशभरातून ३०० संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित राहणार असल्याचे चर्चासत्राचे समन्वयक डॉ. वृषाली फुके यांनी सांगितले. चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी राज्यशास्त्र विभागाचे डॉ. प्रकाश लोखंडे, उपप्राचार्य ए.एन. डहाळे, प्रा.व्ही.एन. स्वामी, प्रा.एस.डी. घोबाळे, प्रा.व्ही.बी. भोसले आदी परिश्रम घेत आहेत.

लोकमत औरंगाबाद, रविवार, दि. १७ फेब्रुवारी २०१९ ४



उद्घाटन : परभणी शहरातील शिवाजी महाविद्यालयात आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी राज्यशास्त्राचे विचारवंत माजी प्राचार्य डॉ. व्ही.एन. इंगोले, मशिप्र मंडळाचे कोषाध्यक्ष डॉ. अविनाश येळीकर, हेमंतराव जामकर, प्रा. डॉ. जी. रामारेड्डी, प्राचार्य आर.टी. देशमुख, प्रा. रामभाऊ घाटगे, केशवअण्णा दुधाटे, प्राचार्य बाळासाहेब जाधव, रोहिदास नितोंडे, डॉ. वृषाली फुक्के

# ग्रामीण विद्यार्थीच देश घडवितील

## गुणवंतांचा सत्कार : गणेश शिंदे यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड ऊर्जा व गुणवत्ता आहे. प्रतिकूल परिस्थितीत आव्हाने पेलण्याची जिद्दही आहे. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थीच देश घडवू शकतात, असे प्रतिपादन हिंगोली येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य गणेश शिंदे यांनी केले.

परभणी येथील शिवाजी महाविद्यालयात आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमात शिंदे बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या विकास समितीचे अध्यक्ष हेमंतराव जामकर तर प्रमुख पाहुणे म्हणून केशव अण्णा दुधाटे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्या डॉ. विजया नांदापूरकर, विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर बनकर यांची उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. जाधव प्रास्ताविकात म्हणाले, यावर्षी दुष्काळी परिस्थिती असल्याने आम्ही स्नेहसंमेलन रद्द करून हा निधी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये जमा करणार आहोत. सामाजिक बांधिलकी जोपासत ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थिनींच्या पासेससाठी महाविद्यालयाने अर्धा खर्च केला आहे. महाविद्यालयात उपलब्ध सुविधांचा फायदाही विद्यार्थ्यांनी आपले भविष्य घडविण्यासाठी करून घ्यावा, असे आवाहन डॉ. जाधव यांनी केले.

कार्यक्रमात महाविद्यालयातील एनएसएस, एनसीसी, सांस्कृतिक विभाग, आविष्कार, इंद्रधनुष्य, आव्हान या कार्यक्रमांबरोबरच विविध विभागांच्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी काश्मीर येथे शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रा. डॉ. जयंत बोबडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. प्रल्हाद भोपे यांनी आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत औरंगाबाद, शनिवार, दि.१६ फेब्रुवारी २०१९ ४

# शनिवारी राज्यशास्त्र विषयाचे राष्ट्रीय चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली व सीपीई पुरस्कृत राज्यशास्त्र विषयाचे एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र १६ फेब्रुवारी रोजी येथील श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित केले आहे.

'भारतीय लोकशाही व्यवस्थेची विद्यामान स्थिती: आव्हाने आणि संधी' हा चर्चासत्राचा मुख्य विषय असून, माजी प्राचार्य डॉ. व्ही.एन. इंगोले यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्‌घाटन होणार आहे. या प्रसंगी माजी मंत्री प्रकाश सोळंके, हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठातील राज्यशास्त्राचे प्रो. डॉ. जी.रामारेड्डी, मशिप्र मंडळाचे कोषाध्यक्ष डॉ. अविनाश येळीकर, हेमंतराव जामकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सायंकाळी ४.३० वाजता होणाऱ्या समारोप कार्यक्रमास प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती राहील. प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्र होणार असून, यावेळी रामभाऊ घाडगे, प्रताप देशमुख, संजय नखाते, केशव दुधाटे, स्वराजसिंह परिहार, परमेश्वर जाधव, डॉ. अफवान उर रहेमान खान, डॉ. रोहिदास नितोंडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या चर्चासत्रास देशभरातून ३०० संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित राहणार असल्याची माहिती समन्वयक डॉ. वृषाली फुके यांनी दिली. यशस्वीतेसाठी डॉ. प्रकाश लोखंडे, ए.एन डहाळे, प्रा. व्ही.एन. स्वामी, प्रा. घोबाळे आदी परिश्रम घेत आहेत.

रविवार, १७ फेब्रुवारी २०१९
४
सकाळ » TODAY

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येच उर्जा, गुणवत्ता : प्राचार्य शिंदे

## शिवाजी महाविद्यालयात गुणवंतांचा कौतुक सोहळा


**परभणी, ता. १६ (बातमीदार) :** आपल्या देशातील ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांत प्रचंड ऊर्जा व गुणवत्ता आहे. प्रतिकूल परिस्थितीत आव्हाने पेलत यश मिळविण्याची जिद्द आहे, हीच जिद्द देश घडविण्यासाठी उपयोगाची ठरणार आहे. ग्रामीण विद्यार्थीच देश घडवेल, असे प्रतिपादन हिंगोली जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य गणेश शिंदे यांनी व्यक्त व्यक्त केले.




**परभणी : श्री शिवाजी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थी कौतुक सोहळ्याचे उद्‌घाटन करताना प्राचार्य गणेश शिंदे, स्थानिक विकास समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर, केशवअण्णा दुधाटे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव आदी.**

श्री शिवाजी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थी कौतुकसोहळा शुक्रवारी (ता. १५) पार पडला. या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या विकास समितीचे अध्यक्ष हेमंतराव जामकर होते; तर मंचावर प्रमुख उपस्थिती म्हणून सदस्य केशवअण्णा दुधाटे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. विजया नांदापूरकर, विद्यार्थी संसद अध्यक्ष ज्ञानेश्वर बनकर हे होते. प्रास्ताविकपर भाषणात प्राचार्य डॉ. जाधव म्हणाले, ''महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या सर्व सोयीसुविधांचा फायदा विद्यार्थ्यांनी आपला करियर घडविण्यासाठी आणि देशाचे भवितव्य घडविण्यासाठी करावा.'' याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयातील एनएसएस, एनसीसी, सांस्कृतिक विभाग, अविष्कार, इंद्रधनुष्य, आव्हान तसेच विविध विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेत पारितोषिक मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरवातीस कश्मीर येथे हुतात्मा झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. डॉ. जयंत बोबडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. तुकाराम फिसफीसे यांनी; तर आभार प्रा. प्रल्हाद भोपे यांनी मानले.

लोकमत औरंगाबाद, सोमवार, दि. १८ फेब्रुवारी २०१९




**परीक्षा :** परभणीत रविवारी राज्यसेवा पूर्वपरीक्षा पार पडली. श्री शिवाजी महाविद्यालयाच्या केंद्रावर परीक्षेनंतर घेतलेले विद्यार्थ्यांचे छायाचित्र.

# ग्रामीण विद्यार्थीच देश घडवेल : प्राचार्य शिंदे

## श्री शिवाजी महाविद्यालयातील गुणवंतांचा कौतुक सोहळा

**परभणी, प्रतिनिधी :** आपल्या देशातील ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांत प्रचंड ऊर्जा व गुणवत्ता आहे. प्रतिकूल परिस्थितीत आव्हाने पेलत यश मिळविण्याची जिद्द आहे, हीच जिद्द देश घडविण्यासाठी उपयोगाची ठरणार आहे. ग्रामीण विद्यार्थीच देश घडवेल, असे प्रतिपादन हिंगोली जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य गणेश शिंदे यांनी व्यक्त व्यक्त केले.

ते श्री शिवाजी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थी कौतुक सोहळ्यात बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या विकास समितीचे अध्यक्ष हेमंतराव जामकर होते. तर मंचावर सदस्य केशवअण्णा दुधाटे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.विजया नांदापूरकर, विद्यार्थी संसद अध्यक्ष ज्ञानेश्वर बनकर हे होते.



परभणी : गुणवंत विद्यार्थी कौतुक सोहळ्याचे उद्‌घाटन करताना प्राचार्य गणेश शिंदे. समवेत हेमंतराव जामकर, केशवअण्णा दुधाटे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ.विजया नांदापूरकर.

प्रास्ताविकपर भाषणात प्राचार्य डॉ. जाधव म्हणाले की यावर्षी दुष्काळी परिस्थिती असल्याने आम्ही स्नेहसंमेलन रद्द करून ती रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये जमा करणार आहोत. सामाजिक बांधिलकी जोपासत अनेक खेडेगावातून महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थिनींच्या पासेससाठी अर्धा खर्च केला आहे. महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या सर्व सोयी-सुविधांचा फायदा विद्यार्थ्यांनी आपला करियर घडविण्यासाठी आणि देशाचे भवितव्य घडविण्यासाठी करावा. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयातील एन.एस.एस., एनसीसी, सांस्कृतिक विभाग, अविष्कार, इंद्रधनुष्य, आव्हान तसेच विविध विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेत पारितोषिक मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस काश्मीर येथे शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. तुकाराम फिसफीसे यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. जयंत बोबडे यांनी केले. तसेच आभारप्रदर्शन प्रा. प्रल्हाद भोपे यांनी केले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.

सकाळ
मंगळवार, १९ फेब्रुवारी २०१९
३

# राज्यशास्त्रातील राष्ट्रीय परिषदेचा समारोप

**परभणी :** लोकशाही ही केवळ राजकीय प्रक्रिया नसून ती जीवनपद्धती आहे. तिच्या अधिकाधिक यशस्वितेसाठी सर्वांगिण विकासासाठी आपण सर्वांनी जागरूक राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केले. श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित 'भारतीय लोकशाही व्यवस्थेची सद्यःस्थिती : आव्हाने आणि संधी' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शरद कुलकर्णी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव होते. या वेळी व्यासपीठावर प्रा. डॉ. सुनील शिंदे, परिषदेच्या समन्वयक डॉ. वृषाली फुके यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. कुलकर्णी म्हणाले, "भ्रष्टाचार, नक्षलवाद, दहशदवाद यासारखी अनेक आव्हाने भारतीय लोकशाहीसमोर असली तरी ती नागरिकांनी जागरूकता दाखविल्यास सहज दूर करता येऊ शकतील. नागरिकांनीआपली कर्तव्ये चोखपणे पार पाडली पाहिजेत. यामध्ये लोकशाहीचे यश सामावलेले आहे. नागरिकांनी एकत्रित येऊन सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवावा." अध्यक्षीय समारोपप्रसंगी प्राचार्य डॉ. जाधव यांनी लोकशाही सक्षम आणि यशस्वी करण्याची जबाबदारी नागरिकांची असल्याचे प्रतिपादन केले. त्यासाठी राज्यशास्त्राचे प्राध्यापक, संशोधक, अभ्यासकांनी पुढे येण्याचे आवाहन केले. या वेळी डॉ. सुनील शिंदे यांनीही विचार मांडले. परिषदेच्या यशस्वी संयोजनाबद्दल डॉ. वृषाली फुके, डॉ. प्रकाश लोखंडे, प्रा. व्ही. एन. स्वामी, प्रा. एस. डी. घोगाळे, प्रा. व्ही. बी. भोसले यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. उत्कर्ष किट्टेकर यांनी केले.

दि. १९ फेब्रुवारी २०१९

# गोदातीर समाचा

## लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी नागरिकांनी जागरूक रहाण्याची गरज – प्राचार्य डॉ. कुलकर्णी

### श्री शिवाजी महाविद्यालयात राज्यशास्त्रातील राष्ट्रीय परिषदेचा समारोप

परभणी-लोकशाही ही केवळ राजकीय प्रक्रिया नसून ती जीवनपध्दती आहे. तिच्या अधिकाधिक यशस्वीतेसाठी सर्वांगिण विकासासाठी आपण सर्वांनी जागरूक राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी यांनी केले आहे.

श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित 'भारतीय लोकशाही व्यवस्थेची सद्यस्थिती : आव्हाने आणि संधी' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ.कुलकर्णी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव होते. यावेळी व्यासपीठावर प्रा.डॉ. सुनिल शिंदे, परिषदेच्या समन्वयक डॉ. वृषाली फुके यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्राचार्य डॉ. कुलकर्णी म्हणाले, भ्रष्टाचार, नक्षलवाद, दहशदवाद यासारखी अनेक आव्हाने भारतीय लोकशाहीसमोर असली तरी ती नागरिकांनी जागरूकता दाखविल्यास सहज दुर करता येऊ शकतील, नागरिकांनी आपली कर्तव्ये चोखपणे पार पाडली पाहिजेत. यामध्ये लोकशाहीचे यश सामावलेले आहे. नागरिकांनी एकत्रित येवून सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवावा, अशी अपेक्षा त्यांनी मांडली.

अध्यक्षीय समारोपप्रसंगी प्राचार्य डॉ. जाधव यांनी लोकशाही सक्षम आणि यशस्वी करण्याची जबाबदारी नागरिकांची असल्याचे प्रतिपादन केले. त्यासाठी राज्यशास्त्राचे प्राध्यापक, संशोधक, अभ्यासकांनी पुढे येण्याचे आवाहन केले. यावेळी डॉ. सुनिल शिंदे यांनीही विचार मांडले. परिषदेच्या यशस्वी संयोजनाबद्दल डॉ.वृषाली फुके, डॉ. प्रकाश लोखंडे, प्रा.व्ही.एन.स्वामी, प्रा.एस.डी.घोगाळे, प्रा.व्ही.बी.भोसले यांचा प्रमुख पाहुण्यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. उत्कर्ष किट्टेकर यांनी केले. डॉ.वृषाली फुके यांनी आभारप्रदर्शन केले.

समर्थ
दिलासा
मंगळवार, दि. १९ फेब्रुवारी २०१९ पान नं. ४

# सुपरमेन ऑफ मालेगावने प्रेक्षकांना खिळवून ठेवले

## परभणी फिल्म क्लबः चित्रपट रसास्वाद कार्यक्रम



परभणी,दि.१८(प्रतिनिधी): कुठल्याही प्रकारचे आर्थिक, तांत्रिक सहाय्य नसतांना, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून चित्रपट निर्मिती करणाऱ्या मालेगावच्या चित्रपटसृष्टी बद्दल माहिती देणारा सुपरमेन ऑफ मालेगाव ने प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

कैझन पिक्चर्स परभणी, अरभाट फिल्म क्लब पुणे, श्री शिवाजी महाविद्यालय परभणी व ज्ञानसाधना प्रतिष्ठान परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु करण्यात आलेल्या परभणी फिल्म क्लबच्या चित्रपट रसास्वाद कार्यक्रमाचे २० वे पुष्प रविवारी सादर करण्यात आले.त्या निमित्ताने प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.बी.यु.जाधव, ज्ञानसाधना प्रतिष्ठानच्या सचिव सौ. शीतल सोनटक्के तसेच लेखक मोहम्मद फरोग जाफरी यांची उपस्थिती होती. मालेगावच्या चित्रपटांचे लेखक फरोग जाफरी यांनी मनोगताद्वारे मालेगावच्या चित्रपट निर्मितीचा इतिहास प्रेक्षकांसमोर मांडला. तसेच तरुणांना मार्गदर्शन करतांना ते म्हणाले, परिणामांचा विचार न करता, न घाबरता पाऊल उचलायला पाहिजे तरच यश मिळवता येते. प्रेक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांना जाफरी यांनी दिलखुलासपणे उत्तरे पण दिली.प्राचार्य डॉ.बी.यु.जाधव व सौ.शीतल सोनटक्के यांनी प्रेक्षकांना फिल्म क्लब मध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवि पाठक यांनी केले. सुत्रसंचालन व आभार अरविंद सगर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अतुल साळवे, लखन सोनावने, आदर्श कवळीकर, गजानन नाल्टे, ऐश्वर्या डावरे, सोहम खिल्लारे, संदीप राठोड यांनी मदत केली.

लोकमत औरंगाबाद, सोमवार, दि. २८ फेब्रुवारी २०२२

धामोणीच्या सखाराम मुळे यांचे यश : उपजिल्हाधिकारीपदी निवड

# एमपीएससीत शेतकऱ्याच्या मुलाची झेप

लोकमत न्यूज नेटवर्क

**परभणी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेतलेल्या परीक्षेमध्ये सोनपेठ तालुक्यातील धामोनी येथील शेतकरी प्रकाशराव मुळे यांचा मुलगा सखाराम राज्यात पाचवा आला आहे. सखाराम मुळे यांची उपजिल्हाधिकारी म्हणून निवड झाली आहे.

जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर आपण ध्येय प्राप्त करू शकतो, असे सखाराम मुळे यांनी या यशानंतर सांगितले. सोनपेठ तालुक्यातील धामोणी या छोट्या गावातून सखाराम मुळे यांनी माध्यमिक आश्रम शाळेत दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले. त्यानंतर परभणीतील शिवाजी महाविद्यालयातून बारावी आणि पुढे सांगली येथे अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण केले. सुरुवातीपासूनच स्पर्धा परीक्षेकडे ओढा असल्याने या परीक्षेच्या तयारीसाठी पुणे गाठले. वडील शेतीचा व्यवसाय करतात. मुलाची शिक्षणाची ओढ लक्षात घेऊन त्यांनीही सखाराम यांना सर्वतोपरी मदत केली. विशेष म्हणजे २०१७ मध्येच झालेल्या परीक्षेत सखाराम मुळे यांनी यश मिळविले. या परीक्षेतून जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारीपदी त्यांची निवड झाली आहे. एवढ्यावर न थांबता त्यांनी एमपीएससीची तयारी सुरूच ठेवली होती. २०१८ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली. या परीक्षेत त्यांनी राज्यातून पाचवा क्रमांक पटकावला असून, उपजिल्हाधिकारी पदावर निवड झाली आहे. सखाराम मुळे यांच्या यशामुळे आई, वडिलांचे स्वप्न साकार झाले असून, सखाराम मुळे यांचे हे यश ग्रामीण भागातील युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



## योग्य मार्गदर्शन आवश्यक

स्पर्धा परीक्षेची तयारी करताना विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे गरजेचे आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी अशा परीक्षांमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे अनुभव जाणून घेतले पाहिजेत. त्यानंतर दररोज अभ्यासातील सातत्य, अभ्यासाचे योग्य नियोजन आणि परिश्रमपूर्वक मेहनत घेण्याची तयारी ठेवली तर ते या परीक्षेत निश्चित यशस्वी होतील, असे सखाराम मुळे यांनी सांगितले.

देशोन्नती
बुधवार, दि. २० फेब्रुवारी २०१९




**परभणी :** हिंदी विषया संदर्भात आयोजीत व्याख्यान मालेत मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. शिवदत्ता वावळकर, व्यासपीठावर डॉ. संजय जाधव, डॉ. शेषराव राठोड, प्रा.डॉ. जयंत बोबडे दिसत आहेत.

लोकमत औरंगाबाद, गुरुवार, दि. २१ फेब्रुवारी २०१९ ४

# हिंदी भाषेत रोजगाराच्या संधी

## व्याख्यान : शिवदत्ता वावळकर यांचे प्रतिपादन

लोकमत न्यूज नेटवर्क




**परभणी :** हिंदी भाषा ही जागतिक भाषा असून, ती साहित्यापुरती मर्यादित न राहता बाजाराची भाषा बनली आहे. त्यामुळे या भाषेच्या क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत, असे प्रतिपादन प्रा. डॉ. शिवदत्ता वावळकर यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या वतीने आयोजित व्याख्यानात वावळकर बोलत होते. या प्रसंगी प्रा. डॉ. संजय जाधव, विभागप्रमुख डॉ. शेषराव राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. वावळकर म्हणाले, मुद्रण शोधक, बँक, पोस्ट, अनुवाद, जाहिरात, धारावाहिक, सिनेमा, स्टेनो, शुद्धलेखन या क्षेत्रामध्ये हिंदी अभ्यासक्रम पूर्ण कणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. हिंदी विषय हा फक्त पारंपरिक शिक्षक किंवा प्राध्यापक होण्यासाठी शिकविला जाऊ नये तर देश, आंतरराष्ट्रीय पातळीवर या विषयात असलेल्या संधी लक्षात घेऊन तो अभ्यासला जावा, असेही मत वावळकर यांनी व्यक्त केले. या प्रसंगी प्रा. डॉ. संजय जाधव, डॉ. शेषराव राठोड यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. जयंत बोबडे यांनी सूत्रसंचालन केले. मुजावर अमीन यांनी आभार मानले. व्याख्यानास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोदातीर

दि. २५ फेब्रुवारी २०१९

## श्री शिवाजी महाविद्यालयात भित्तीपत्रक स्पर्धेस प्रतिसाद



**परभणी** - येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भित्तीपत्रक स्पर्धेत विद्यार्थ्यांनी भीतीपत्रकांच्या माध्यमातून विविध विषयांना न्याय देत आपले विचार शब्द रूपाने मांडले. 'हिंदीची वैश्विक स्थिती', 'संत साहित्य', 'आधुनिक साहित्य', 'हिंदी मध्ये करिअरच्या संधी', 'कम्प्यूटर मध्ये वापरात येणारी हिंदी' इत्यादी विषयावरील भीतीपत्रके तयार करून विद्यार्थ्यांनी हिंदी विषयाची आवड आणि कुतूहल सादर केले. हिंदी विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण विकसित करण्याच्या संदर्भाने हा उपक्रम राबवण्यात आला होता. यावेळी विभागाच्या वतीने निबंध स्पर्धा ही आयोजित करण्यात आली. विजेत्या विद्यार्थ्यांना मा.प्राचार्य डॉ बाळासाहेब जाधव यांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेत बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना विभागप्रमुख डॉ शेषेराव राठोड, डॉ संजय जाधव व डॉ जयंत बोबडे यांनी मार्गदर्शन केले. या सर्धेत गोपाळ तनपुरे, पंकज पाटील, ज्ञानेश्वर पवार, मयुरी जवंजाळ, मुजावर अमीन, गंगा घुले, आकाश साबणे,शीतल कुलकर्णी, जोगदंड मीनाक्षी,प्रियांका पाटील, येटेवाड आरती, जोगदंड अश्विनी आदींनी सहभाग नोंदवला.

देशोन्नती शनिवार, दि २३ फेब्रुवारी २०१९

# प्रा. भोपे यांना पुरस्कार



**परभणी :** श्री शिवाजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रल्हाद भोपे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा रासेयो उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्कार जाहीर झाला आहे. मागील आठ वर्षांपासून ते राष्ट्रीय सेवा योजनेत कार्य करत आहेत. पुरस्काराचे वितरण कुलगुरु डॉ. उध्दव भोसले यांच्या हस्ते होणार आहे. पुरस्काराबद्दल माजी मंत्री प्रकाश सोळंके, आ. सतिश चव्हाण, अविनाश येळीकर, हेमंतराव जामकर, केशव अण्णा दुधाटे, रामभांऊ घाटगे, स्वराजसिंह परिहार, प्राचार्य आर. टी. देशमुख, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. श्रीनिवास केशेट्टी, डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. रोहिदास नितोंडे, डॉ. डि. डी. पवार, डॉ. सुरेश भालेराव, डॉ. तुकाराम फिसफीसे आदींनी अभिनंदन केले आहे.

गुरूवार, दि. २८ फेब्रुवारी २०१९ पान नं. ४

समर्थ दिलासा

# सैन्यात भरती झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**परभणी, दि. २७ (प्रतिनिधी):** येथील श्री.शिवाजी महाविद्यालयातील एनसीसी व सैनिक शास्त्र विभागातील विद्यार्थी अमोल सुकरे, मुंजाजी आव्हाड, महेश शिराळे, मुकेश राऊत, नवनाथ खनपटे, रणजीत कोकरे या विद्यार्थ्यांची सैन्य दलात भरती झाली असून या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डहाळे, एनसीसी विभागप्रमुख ले.प्रशांत सराफ, डॉ.सी.बी.भांगे आदीची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांच्या भविष्यातील वाटचालीबद्दल शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.



**सत्कार...**येथील श्री.शिवाजी महाविद्यालयातील एनसीसी व सैनिक शास्त्र विभागातील विद्यार्थी अमोल सुकरे, मुंजाजी आव्हाड, महेश शिराळे, मुकेश राऊत, नवनाथ खनपटे, रणजीत कोकरे या विद्यार्थ्यांची सैन्य दलात भरती झाली असून या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ.बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डहाळे, एनसीसी विभागप्रमुख ले.प्रशांत सराफ, डॉ.सी.बी.भांगे आदी

देशोन्नती शनिवार, दि.२ मार्च २०१९

# शिवाजी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव सप्ताह साजरा

**परभणी** : श्री शिवाजी महाविद्यालयात मराठी विभागाच्यावतीने २१ ते २७ फेब्रुवारी दरम्यान मराठी भाषा गौरव सप्ताह साजरा करण्यात आला.

या सप्ताहातंर्गत वक्तृत्व, निबंध, सुंदर हस्ताक्षर, काव्य वाचन, मराठी म्हणी भित्तीपत्रक आदी स्पर्धा घेण्यात आल्या. राष्ट्र घडणीत युवकांचे योगदान या विषयावर आयोजित वक्तृत्व स्पर्धेस विद्यार्थ्यांचा चांगलाच प्रतिसाद मिळाला. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना २७ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्याहस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. याप्रसंगी कमलताई जामकर महिला महाविद्यालयातील प्रा. अरुण पडघन यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी विभागप्रमुख डॉ. श्रीदेवी कडगे, प्रा. प्रल्हाद भोपे, डॉ. राजू बडुरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. सुत्रसंचालन निकिता हुडके हीने तर आभार कोमल पांचाळ हीने मानले.

कार्यक्रमास प्राध्यापकवृंद, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशोन्नती
गुरुवार, दि. २८ फेब्रुवारी २०१९

# सैन्यात भरती झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान

**शहर प्रतिनिधी** / २७ फेब्रुवारी

**परभणी :** येथी श्री शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थी भारतीय सैन्यदलात भरती झाले आहेत. या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

नोव्हेंबर २०१८ मध्ये जळगाव येथे झालेल्या भरती मेळाव्यात महाविद्यालयातील अमोल सुकरे, मुंजाजी आव्हाड, महेश शिराळे, मुकेश राऊत, नवनाथ खनपटे, रणजीत कोकरे हे विद्यार्थी सैन्यात भरती झाले आहे. या विद्यार्थ्यांचा प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डहाळे, प्रशांत सराफ, डॉ. सी. बी. भांगे आदींनी अभिनंदन केले.



**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयात विद्यार्थी भारतीय सैन्यदलात दाखल झाल्याने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्राचार्य बाळासाहेब जाधव, डॉ. सी. बी. भांगे, प्रशांत सराफ व इतर.

देशोन्नती
नांदेड / शुक्रवार, दि. ८ मार्च २०१९



**परभणी :** शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या बेमुदत संपात श्री शिवाजी महाविद्यालय येथे अध्यक्ष किशोर लोणीकर, उपाध्यक्ष बी. के. बलाला, ई. जी. देवकर, रामभाऊ रेंगे व इतर सहभागी शिक्षक दिसत आहेत.

# सलग तिसऱ्या दिवशीही महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याचा संप सुरुच

## अन्यायकारक निर्णय रद्द करण्याची मागणी

**शहर प्रतिनिधी / ७ मार्च**

**परभणी :** जिल्ह्यातील विविध महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी महासंघाच्या वतीने मंगळवार ५ मार्च पासुन आंश्वासीत योजना पुर्ववत सुरु ठेवावी आणि ७ डिसेंबर व १६ फेब्रुवारी रोजी घेतलेला शासन निर्णय रद्द करावा या मागणीसाठी बेमुदत संप सुरु केला आहे. या संपाचा आज तिसरा दिवस आहे. त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मोठा त्रास होत आहे.

सध्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षाचे दिवस आहेत. त्या निमित्त हॉलतिकिट व इतर कागदपत्रांसाठी शिक्षंकेत्तर कर्मचाऱ्यांशी मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांचा संपर्क येतो. परंतु मागील दोन ते तीन दिवसापासुन शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी शासन धोरणा विरोधात बेमुदत संप पुकारल्याने महाविद्यालयीन तरुणाना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या संपात जिल्ह्यातील मोठ्या संख्येने महाविद्यालयाचा समावेश आहे. परभणी शहरातील ज्ञानोपासक महाविद्याल, शारदा महाविद्यालय, श्री शिवाजी महाविद्यालय, संत तुकाराम महाविद्यालय आदीसह जिल्ह्यातील महाविद्यालयांचा समावेश आहे. या संपाची मुख्य मागणी १२ व २४ वर्षाची आश्वाशित प्रगती योजना शासनाने २००९ मध्ये सुरु केली होती ती बंद करुन नविन अन्यायकारक योजना राबविली आहे. सदरील निर्णयामध्ये अनुदानीत महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना दिलेल्या लाभ परत घेण्याचा हालचाली सुरु आहेत. त्यासाठी ७ डिसेंबर व १६ फेब्रुवारी रोजी घेतलेला शासन निर्णय रद्द करुन ही योजना पुर्ववत चालु करण्याची मागणी महासंघाने केली आहे. निदेनावर अध्यक्ष विजय निकम, सरचिटणीस डॉ. आर. बी. सिंह यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या संपात श्री शिवाजी महाविद्यालयात संघटना अध्यक्ष किशोर लोणीकर, उपाध्यक्ष बी. के. बलाला, ई. जी. देवकर, ग्रुप प्रमुख रामभाऊ रेंगे आदीसह इतर कर्मचारी सहभागी आहेत.

दैनिक समर्थ
दिलासा
मंगळवार, दि. ०५ मार्च २०१९

# शिवाजी महाविद्यालयात मराठी भाषा दिन

परभणी,दि.०४(प्रतिनिधी): परभणी,दि.०१ (प्रतिनिधी): येथील श्री शिवाजी महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने दि. २१ ते २७ फेब्रुवारी दरम्यान मराठी भाषा गौरव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. दि. २७ रोजी कुसुमाग्रजांचा जन्मदिवस मराठी गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमात प्रा. अरूण पडघन यांनी मराठी भाषा व साहित्य याविषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. यु. बी. जाधव हे होते. सप्ताहातंर्गत वक्तृत्व, निबंध, सुंदर हस्ताक्षर, मराठी म्हणी, भित्तीपत्रक स्पर्धा आदी उपक्रम घेण्यात आले. वक्तृत्वासाठी ङ्गराष्ट्र घडणीत युवकांचे योगदान ङ्घ हा विषय दिला होता, त्यात १९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. हस्ताक्षर स्पर्धेत ६८ विद्यार्थ्यांनी तर निबंध स्पर्धेत ७० विद्यार्थी सहभागी झाले होते. निबंध स्पर्धेसाठी शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे व उपाय हा विषय देण्यात आला होता. तसेच मराठी म्हणी या विषयावर भित्तीपत्रक स्पर्धा घेतली त्यात २० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या स्पर्धेतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना दि. २७ रोजी मराठी भाषा दिनाच्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. यावेळी प्रा. पडघन यांनी विद्यार्थ्यांनी साहित्यलेखन व वाचनाचा व्यासंग करावे असा सल्ला दिला.

शुक्रवार, ८ मार्च २०१९
सकाळ
२

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे परभणी, जिंतूरला आंदोलन



परभणीः शहरातील शिवाजी महाविद्यालयासमोर धरणे आंदोलन करताना राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे पदाधिकारी, कर्मचारी आदी.

**परभणी, ता. ७ (बातमीदार)** : महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाच्या वतीने गुरुवारी (ता. सात) श्री. शिवाजी महाविद्यालयासमोर धरणे आंदोलन केले. कर्मचारी बेमूदत संपावर गेले आहेत.

शासन निर्णय ता. सात डिसेंबर २०१८ चा शासन निर्णय अन्यायकारक आहे. ते रद्द केलेला नाही. त्यातच १६ फेब्रुवारी २०१९ रोजी एकांकी पदाचा शासन निर्णय नव्याने निर्गमित केला आहे. हे अन्यायकारक शासन निर्णय निर्गमित झाला नसल्यामुळे कर्मचाऱ्यांची असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. म्हणून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपाची नोटीस देत संप सुरू केला आहे. राज्यात सर्वत्र आंदोलन सुरू असून राज्य संघटनेच्या आवाहानुसार हे कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत. संघटनेचे सरचिटणीस डॉ. आर. बी. सिंह, अध्यक्ष विजय निकम यांच्या स्वाक्षऱ्या निवेदनावर आहेत.

### जिंतूरमध्ये दुसऱ्या दिवशीही संप

जिंतूर : शासनाने काढलेले अन्यायकारक निर्णय रद्द करण्याच्या मागणीसाठी येथील ज्ञानोपासक महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी बुधवार (ता. सहा) पासून सुरू केलेला बेमुदत संप दुसऱ्या दिवशीही गुरुवारी (ता. सात) सुरूच होता. सदरचा शासन निर्णय रद्द होत नाही, तोपर्यंत संप मागे घेणार नसल्याचे कर्मचाऱ्यांच्या स्थानिक संघटनेचे अध्यक्ष बालासाहेब जाधव, सचिव श्याम देशपांडे, कार्यालय अधीक्षक चंद्रकांत पत्तेवार यांनी सांगितले.

संपात पी. एम. शेळके, ए. आर. खंदारे, बी. जी. गिरी, बी. टी. हातागळे, श्रीमती एस. के. मुटकुळे, डी. एन. पवार, एस. के. थिटे, एस. डी. राऊत, एन. के. सोनवणे, के. एम. नागरे यांच्यासह सर्व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले आहेत.

आलेल्या चिमुकल्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

## शिवाजी महाविद्यालयामध्ये महिला दिन

परभणी : येथील श्री शिवाजी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग व समाजशास्त्र विभाग यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव होते, तर उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशेट्टी. डॉ. विजया नांदापूरकर, डॉ. श्रीदेवी कडगे, डॉ. वृषाली फुके, डॉ. सबिया, प्रा. सविता कोकाटे, प्रा. अहिल्या अंजनडोहकर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. तुकाराम फीसफिसे यांनी; तर सूत्रसंचालन विशाल बाबर व आरती पांडे यांनी केले. आभार आरती पांडे हिने मानले. या वेळी कार्यक्रमाला डॉ. संजय जाधव. डॉ. जयंत बोबडे, प्रा. प्रल्हाद भोपे, प्रा. डॉ. राजू बडुरे, डॉ. किटेकर, प्रा. राजेसाहेब रेंगे, प्रा. गोरख राठोड उपस्थित होते. यशस्वितेसाठी प्रा. विश्वनाथ सूर्यवंशी, प्रा. स्वाती देशमुख, प्रा. अर्चना बंग, प्रा. सारिका शेट्टे, श्री. देवकर, सादिक शेख, श्री. स्वामी आदींनी पुढाकार घेतला.

पुण्य नगरी
शनिवार, ९ मार्च २०१९ । परभणी- हिंगोली

# विद्यार्थ्यांनी नाविण्यपूर्ण समाजपयोगी संशोधन करावे –डॉ. जाधव

**परभणी / प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी तंत्रशिक्षण घेत असतांना गुणवत्तेची कास धरून प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता सिध्द करणे आवश्यक आहे. कारण तंत्रज्ञानातील वेळोवेळी होणारे बदल लक्षात घेवून कौशल्यपूर्ण गुणवत्ता प्राप्त करून विद्यार्थ्यांनी नाविण्यपूर्ण समाजपयोगी संशोधन करावे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी व्यक्त केले.

येथील श्री शिवाजी अभियांत्रिकी महाविद्यालयात गुरूवारी (दि.७) टेक्रोस्पीरीट २०१९ प्रकल्प स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी गोविंद नांदापूरकर, डॉ. सुरेश सदावर्ते, आनंद पाथ्रीकर, प्राचार्य शाहीद ठेकिया यांची उपस्थिती होती. यावेळी आनंद पाथ्रीकर यांनी मार्गदर्शन केले. अभियांत्रिकीचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या कौशल्यांना




वाव देण्यासाठी तसेच तंत्रज्ञानामध्ये होत असलेले नाविन्यपूर्ण बदल आणि तंत्रशिक्षणातील स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी स्पर्धा आयोजन केल्याचे पाथ्रीकर यांनी सांगितले. या स्पर्धेसाठी ५१ हजार रूपयांची रोख पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. यात रोबो रेस, रोबा सॉकर, एन.एफ एस., ऑनलाईन टेक्निकल टेस्टे, पोस्टर प्रझेंटेशन, प्रोजेक्ट प्रदर्शन आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरविंद सूर्यवंशी यांनी केले. प्राची शिंदे, नियती शहा यांनी सूत्रसंचालन केले. विपीन वांगीकर यांनी आभार मानले.

देशोन्नती शनिवार, दि.९ मार्च २०१९

# विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी संशोधन करावे - डॉ. जाधव

**शहर प्रतिनिधी / ८ मार्च**

**परभणी :** विद्यार्थ्यांनी तंत्रशिक्षण घेत असतांना गुणवत्तेची कास धरुन प्रत्येक टप्प्यावर गुणवत्ता सिध्द करणे गरजेचे आहे. कारण तंत्रज्ञानातील वेळोवेळी होणारे बदल लक्षात घेवून कौशल्यपूर्ण गुणवत्ता प्राप्त करुन विद्यार्थ्यांनी नाविण्यपूर्ण समाजोपयोगी संशोधन करावे असे मत प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी व्यक्त केले.

श्री शिवाजी अभियांत्रीकी महाविद्यालयात ७ फेब्रुवारी रोजी आयोजित टेक्रोस्पिरीट २०१९ प्रकल्प स्पर्धा कार्यक्रमाम मार्गदर्शन करतांना डॉ. जाधव बोलत होते. कार्यकमाची सुरुवात सरस्वती पूजन करुन भारतरत्न ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन दिपप्रज्वलनाने करण्यात आली. व्यासपीठावर गोविंदराव नांदापूरकर, डॉ. सुरेश सदावर्ते, डॉ. बाळासाहेब जाधव, आनंद पाथरीकर, प्राचार्य शाहीद ठेकिया यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना संचालक आनंद पाथरीकर यांनी टेक्रोस्पिरीट विषयी माहिती दिली. सदरील स्पर्धेसाठी ५१ हजार रुपयांचे बक्षीस ठेवण्यात आले आहे. या दरम्यान विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. अरविंद सूर्यवंशी, सूत्रसंचालन कु. प्राची शिंदे, नियती शहा यांनी केले. प्रा. विपीन वांगीकर यांनी आभार मानले.



**परभणी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयात टेक्रोस्पिरीट कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, गोविंदराव नांदापूरकर, डॉ. सुरेश सदावर्ते, डॉ. बाळासाहेब जाधव, आनंद पाथरीकर, प्राचार्य शाहीद ठेकिया व इतर.

४ पुढारी MY परभणी-हिंगोली शनिवार, ३० मार्च २०१९



परभणी : येथे राष्ट्रवादीचे नेते आ.सतीश चव्हाण यांनी जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष दीपकराव देशमुख यांच्या निवासस्थानी भेट दिली असता त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी अॅड.रामजी चव्हाण, अॅड. एस.टी.धुळे, अॅड.आर.बी.वांगीकर, सुनील देशमुख, माजी नगरसेवक संजयराव देशमुख आदी.